

# जनमाध्यम





e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १४ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


# मातृभाषेला प्राधान्य देणं हेच आमच्या सरकारचं धोरण- अमित शाह

**मुंबई/प्रतिनिधी** : ''मातृभाषेला प्राधान्य देणं, हे आमच्या सरकारचं धोरण आहे. मातृभाषेमुळे मोठा प्रश्न किंबहुना कोणताही संघर्ष उद्भवेल, असं मला मुळीच वाटत नाही. राज्यांकडे अनुभवी नेतृत्व असून, या सर्व संघर्षांवर नक्कीच योग्य उपाय शोधला जाईल. काही लोक मुद्दाम संघर्ष पेटवण्याचा किंवा तो उकळण्याचा प्रयत्न करत असतात. मात्र, राज्य पातळीवरील नेतृत्व या सर्व गोष्टींवर योग्य तो उपाय काढायला पूर्णपणे सक्षम आहे'', असा ठाम विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईतील पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला.

यावेळी बोलताना अमित शाह म्हणाले की, २०१४ च्या आधी देश भ्रष्टाचार, घराणेशाही आणि जातिवाद यामुळे ग्रस्त झाला होता. मात्र, २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशानं यातून मार्ग काढून मोठी प्रगती केली आहे. गेल्या काही वर्षांत २५ कोटी लोकांनी गरिबीवर मात केली असून, १६ कोटी लोकांना स्वतःचं घर मिळालं आहे. तसंच, १६ कोटी शेतकऱ्यांना 'किसान सन्मान निधी' योजनेतून प्रत्येकी ६००० रुपये मिळाले असून, ११ कोटी लोकांना 'उज्वला' योजनेतून गॅस जोडणी मिळाली आहे. याचसोबत, ७ कोटी लोकांना वीज मिळाली असून, देशभरात रस्ते आणि रेल्वेचे मोठे पायाभूत (इन्फ्रास्ट्रक्चर) जाळं निर्माण झालं आहे. या सर्व



विकासकामांच्या जोरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशानं मोठा विकास साधला आहे, तसंच आपण नक्षलवादावरही पूर्णपणे अंकुश आणला आहे. यावेळी ते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासन प्रमुख म्हणून २५ वर्षांची कारकीर्द पूर्ण केली आहे. आधी ते गुजरातचे मुख्यमंत्री होते, तर आता देशाचे पंतप्रधान आहेत. सलग २५ वर्षे प्रमुख म्हणून काम करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंद झाला आहे. त्या निमित्तानं भाजपाच्या वतीनं १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर असा महिनाभर सेवा संकल्प अभियान राबवण्यात येणार आहे. याचबरोबर 'जेन झी' आंदोलनाविषयी बोलताना अमित शाह यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले की, आपण सर्व जण एका महान लोकशाही देशामध्ये राहत आहोत. भारतीय लोकशाही आणि लोकशाही मूल्यांविषयी आमच्या मनामध्ये प्रचंड आदर आहे. ☞(पान २ वर)

# आजपासून सलाईन, पाणी, उपचार सर्व बंद

## आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारताच मनोज जरांगे आक्रमक



**मुंबई/प्रतिनिधी** :मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलंच तापलं आहे. अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या बेमुदत उपोषणावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. दरम्यान, मनोज जरांगेंच्या १९ सप्टेंबरच्या आंदोलनालाही मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. यावरून मनोज जरांगे पाटलांनी संताप व्यक्त केला आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम २०२५ चा नियम भंग करणार असल्याची खात्री आहे, असं म्हणत मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे पाटलांना आंदोलनासाठी परवानगी नाकारली. दरम्यान, दोनच दिवसांपूर्वी मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही असा निर्णय उच्च न्यायालयानं दिला होता. त्यामुळे सरकार न्यायदेवतेचा अपमान करत आहे, असं मनोज जरांगे म्हणाले.

'आंदोलन करण्याआधीच आम्ही नियमभंग करणार आहोत, असं त्यांना का वाटत आहे? कोणत्या कायद्याने राज्य चालवत आहात? कशाला असते राज्यकर्ता. ही काय अस्थिरता आहे. स्थिर सरकार ठेवायचं आहे की नाही?' असे विविध संतप्त प्रश्न आज मनोज जरांगे पाटलांनी उपस्थित केले.ते पुढे म्हणाले, ☞(पान २ वर)

# ओमान किनारपट्टीवर भारतीय व्यापारी जहाजावर हल्ला; १३ खलाशांची सुटका

## परराष्ट्र मंत्रालयाकडून हल्ल्याचा तीव्र निषेध

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** ओमानच्या किनारपट्टीजवळ 'एमटी अल गैया' या व्यापारी जहाजावर रविवारी झालेल्या हल्ल्याचा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या जहाजावर एकूण १४ भारतीय खलाशी तैनात होते. त्यापैकी १३ भारतीयांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून, एका लापता भारतीय नागरिकाचा शोध सध्या सुरू आहे.

या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता असलेल्या एका भारतीय नागरिकाचा शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. ओमानमधील भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून



ओमानच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहे. व्यापारी जहाजे, खलाशी, नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांवरील हल्ले अस्वीकार्य असल्याचे नमूद करत, भारताने तणाव कमी करण्यासाठी☞(पान २ वर)

# नागपूर हादरले! जादूटोण्याच्या संशयातून सासऱ्याने केला सुनेचा कुऱ्हाडीने निर्घृण खून

**नागपूर/प्रतिनिधी :** : जादूटोण्याच्या संशयातून सासऱ्याने सुनेची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. लक्ष्मी रविशंकर पाली (४२) असे मृत सुनेचे नाव असून नथुलाल भगवान पाली (७०) असे आरोपी सासऱ्याचे नाव आहे. सुनेचा खून केल्यानंतर आरोपी सासऱ्याने विहिरीत उडी घेऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने विहिरीतून बाहेर काढून मेयो रुग्णालयात दाखल केले असून, त्यांची प्रकृती गंभीर आहे.

**जादूटोण्याच्या संशयातून भयंकर कृत्य-** मुलावर जादूटोणा करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत असल्याच्या संशयातून सासऱ्याने हे कृत्य केले. मृत लक्ष्मी यांच्या पतीचे २०१९ मध्ये निधन झाले होते. त्यानंतर मुलावर जादूटोणा केल्याचा संशय घेत नथुलाल यांचा सुनेसोबत

## हत्या केल्यानंतर आरोपी सासऱ्याचा विहिरीत उडी घेऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न; प्रकृती चिंताजनक



वारंवार वाद होत होता. शनिवारी दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. या वादातून नथुलाल यांनी कुऱ्हाडीने लक्ष्मी यांच्या डोक्यावर वार केला, यामध्ये तिचा जागीच मृत्यू झाला. सुनेचा खून केल्यानंतर आरोपी सासऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने विहिरीतून बाहेर काढून मेयो रुग्णालयात दाखल केले असून, त्यांची प्रकृती गंभीर आहे. या घटनेची ☞(पान २ वर)

# पश्चिम बंगालमध्ये २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश

## १०० हून अधिक मदरसांना 'कारण दाखवा' नोटीस

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील मदरसांवर मोठी कारवाई केली आहे. तब्बल २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, सुमारे १०० इतर मदरसांना कारण दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. राज्यभरात केलेल्या सर्वेक्षणानंतर हा आदेश देण्यात आला आहे. या सर्वेक्षणात अशा अनेक संस्थांकडे आवश्यक मंजुरी आणि मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी आज (दि. १३ सप?टेंबर) दिली. अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागाचे मंत्री क्षुदीराम टुडू यांनी स्पष्ट केले की, ज्या मदरसांकडे आवश्यक मंजुरी आहे, ते पूर्ववत सुरू राहतील.



**विभागाने प्रत्यक्ष पातळीवर केले होते सर्वेक्षण**

जूनच्या सुरुवातीपासून पश्चिम बंगालमधील सर्व जिल्ह्यांमध्ये सरकारी आणि खाजगी मदरसांच्या पायाभूत सुविधा, मंजुरीची स्थिती आणि व्यवस्थापन प्रणालीचे मूल्यांकन करण्यासाठी विभागाने प्रत्यक्ष पातळीवर सर्वेक्षण केले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ज्या मदरसांना कारण दाखवा नोटीस देण्यात आली आहे, त्यांच्या उत्तरांची तपासणी केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

**वारंवार तक्रारीनंतर कारवाई-** ☞(पान २ वर)

### २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश

विविध जिल्ह्यांतील अधिकृत आणि अनधिकृत मदरसांची संख्या शोधण्यासाठी मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्या निर्देशानंतर हे काम सुरू करण्यात आले होते, असे टुडू यांनी सांगितले. मंत्री पुढे म्हणाले, '२५२ मदरसे बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तर इतर १०० मदरसांना आवश्यक मंजुरी आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.'

# बेस्ट बसला भररस्त्यात आग, मुंबईत मोठा अनर्थ टळला!

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या बेस्ट बसचे सातत्याने अपघात होत असताना बसचालकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे. मुंबईतील चेंबूर कॅम्प परिसरातील मोनोरेल स्टेशनजवळ रविवारी सकाळी ८ वाजण्याच्या बेस्टच्या एका इलेक्ट्रिक बसला आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. ही बस भाडेतत्वांतर्गत असून, देवणार डेपोमधून 'श्री मारुती ट्रॅव्हल्स'



(डागा ग्रुप) कडून चालवली जात होती. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं.

**केबिनमधून धूर अन्‌ …**

बस मार्ग क्रमांक ए-३६५ वरून महुल गाव ते ट्रॉम्बे अशी जात असताना चालकाला केबिनच्या खालून धूर निघत असल्याचं लक्षात आलं. तपासणी केली असता बॅटरी बॉक्समध्ये ठिणगी पडून शॉर्ट सर्किट झाल्याचं समोर आलं, यामुळे ही आग भडकली. बसमधील कर्मचाऱ्यांनी गाडीत उपलब्ध असलेल्या तिन्ही अग्निशामक सिलिंडरचा वापर करून अवघ्या १५ मिनिटांत आगीवर । ☞(पान २ वर)

# विहिरीतल्या पाण्याला लागली आग

## चक्क पाटातून उडाला ज्वाळांचा भडका

**उमदी (जि. सांगली)** : विहिरीतून पाटाला सोडलेल्या पाण्याने अचानक पेट घेतला अन् शेतात ज्वाळांचा भडका उडाला. हा धक्कादायक प्रकार उमदी (ता. जत) येथे नगर-विजयपूर महामार्गालगत पवार वस्ती परिसरात घडला. विहिरीच्या पाण्यात ज्वलनशील पदार्थ मिसळत असल्याचा संशय व्यक्त होत असून, महसूल प्रशासनाने याठिकाणी पाहणी सुरू केली आहे.



विहिरीच्या पाण्याला पेट्रोलसारखा वास येत असल्याने काही नागरिकांनी त्याची चाचपणी केली असता पाण्याने पेट घेतला. ही बाब समजताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. शेतातील पाण्याच्या पाटातून आगीच्या ज्वाळा भडकल्या होत्या. काही तरुणांनी हे पाणी बाटलीत भरून पाहिले तर त्याचा रंग पिवळसर दिसून आला. घटनेची माहिती मिळताच उमदी महसूल मंडळ अधिकारी सैफन जातगार व ☞(पान २ वर)







# खत टाकताना अचानक वाघाची झडप

## शेतकऱ्याचा थरकाप उडवणारा सामना

**गडचिरोली /वृत्तसंस्था-:** हातात खताची पोती घेऊन शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याला अवघ्या काही फुटांवर दबा धरून बसलेला वाघ दिसलाही नाही. अचानक वाघाने झडप घातली आणि काही क्षणांतच शेतात थरार उडाला. प्रसंगावधान राखत शेतकऱ्याने आरडाओरड केल्याने परिसरातील नागरिक धावून आले आणि वाघाने तेथून पळ काढला. या हल्ल्यात शेतकरी जखमी झाला असून, रविवारी (१३ सप्टेंबर) दुपारी पोर्ला परिसरात ही घटना घडली.

भाऊराव भगवान म्हशाखेत्री (४२) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. पोर्ला-पोटेश्वर मार्गालगत असलेल्या जाबुंरगाटा आणि निबांचासर परिसरातील शेतशिवारात ही घटना घडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये कमालीची दहशत निर्माण झाली आहे. रविवारी दुपारी सुमारे १२ ते १ वाजण्याच्या दरम्यान भाऊराव म्हशाखेत्री शेतात खत टाकण्याचे काम करीत होते. शेतात काम सुरू असतानाच जवळच दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. वाघाच्या झडपेमुळे ते जखमी झाले. मात्र, त्यांनी घाबरून न जाता आरडाओरड करण्यास सुरुवात केली. आवाज ऐकून जवळील नागरिक घटनास्थळी धावून आले. माणसांची चाहूल लागताच वाघाने तेथून धूम ठोकली.

**शेतात जाण्यापूर्वीच धाकधूक**



या घटनेनंतर पोर्ला परिसरातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाळ्यात शेतीची विविध कामे सुरू असताना शेतकऱ्यांना वारंवार शेतात जावे लागते. निंदणी, खत टाकणे, बांध-बंदिस्तीची कामे, पाळे साफ करणे यासह ई-पीक पाहणीसाठीही शेतात जाणे आवश्यक असते. मात्र, शेतशिवारात वाघाचा वावर असल्याने आता प्रत्येक वेळी शेतात पाऊल ठेवताना जीव मुठीत घेऊन जावे लागत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. विशेषतः झुडपे, उंच गवत आणि पिकांच्या आड वाघ दबा धरून बसण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे वनविभागाने केवळ वाघाचा शोध घेण्यापुरती कारवाई न करता परिसरात त्याचा वावर नेमका कुठे आहे, याची पाहणी करून ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

**वाघाचा तातडीने बंदोबस्त** ☞(पान २ वर)




# राष्ट्रीय लोक अदालतीत ४,५९१ प्रकरणांचा निपटारा

## -दाखलपूर्व २,४६०, तर प्रलंबित न्यायालयीन २,१३१ प्रकरणे निकाली

### १४.४८ कोटींच्या तडजोडी





**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार शनिवारी (१२ सप्टेंबर) अमरावती जिल्ह्यात आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत एकूण ४,५९१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमध्ये १४ कोटी ४८ लाख ७३ हजार ९९१ रुपयांची तडजोड झाली. लोक अदालतीच्या माध्यमातून विविध वाद सामोपचाराने मिटविल्याने संबंधित पक्षकारांना दिलासा मिळाला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावतीसह जिल्ह्यातील विविध तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती प्रविण एस. पाटील यांनी जिल्ह्यातील विविध तालुका न्यायालयांना भेटी दिल्या. चांदूर बाजार येथे आयोजित लोक अदालतीचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी न्यायालयीन अधिकारी, अधिवक्ता आणि पक्षकारांशी संवाद साधून लोक अदालतीच्या कामकाजाची माहिती घेतली. तसेच सामोपचारातून वाद मिटविण्यासाठी पक्षकारांना प्रोत्साहित केले.

**१९ हजारांहून अधिक दाखलपूर्व प्रकरणे-**

राष्ट्रीय लोक अदालतीत संपूर्ण जिल्ह्यातून १९,१०१ दाखलपूर्व (प्री-लिटिगेशन) प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी २,४६० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. त्याचप्रमाणे न्यायालयात प्रलंबित असलेल्या १०,२०४ प्रकरणांपैकी २,१३१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. अशाप्रकारे दाखलपूर्व आणि न्यायालयीन प्रलंबित अशा एकूण ४,५९१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमध्ये एकूण १४,४८,७३,९९१ रुपयांची तडजोड झाली.

**विशेष मोहिमेत १,३०७ प्रकरणे निकाली-**

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ७ ते ११ सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत (Special Drive) १,३०७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या मोहिमेमुळे राष्ट्रीय लोक अदालतीपूर्वी प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती मिळाली. मोटार अपघात प्रकरणात ५६ लाखांची तडजोड जिल्हा मुख्यालयातील लोक अदालतीत मोटार अपघात नुकसानभरपाईच्या (MACP) एका प्रकरणात उल्लेखनीय तडजोड झाली. पक्षकारांमध्ये सामोपचाराने समझोता झाल्यानंतर संबंधित विमा कंपनीकडून ५६ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. ही तडजोड प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यावेळी जिल्हा न्यायाधीश-१ ए. जी. जोशी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय ता. सहारे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हरिश शेंडे तसेच जिल्हा न्यायाधीश-८ गिरीश देशमुख यांच्या पॅनेलची उपस्थिती होती. राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून झालेल्या या निपटाऱ्यांमुळे न्यायालयीन प्रकरणांची प्रलंबितता कमी होण्यास मदत झाली. तसेच पक्षकारांचा वेळ, खर्च आणि न्यायालयीन प्रक्रियेचा ताण कमी होऊन सामोपचारातून वाद निकाली काढण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली.

लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी, अधिवक्ता, जिल्हा वकील संघ, सरकारी वकील, पोलीस विभाग, न्यायालयीन कर्मचारी, विधी स्वयंसेवक, बँका, विमा कंपन्या, पक्षकार तसेच डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

# डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावर नाशिक जिल्ह्यात व्याख्यान

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाचे आयोजन









**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन कार्याचा व त्यांच्या कर्तुत्वाचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या वतीने नाशिक जिल्ह्यात विविध ठिकाणी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर महोत्सवी जयंतीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती यांनी प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पाच व्याख्यानाचे आयोजन नाशिक जिल्ह्यामध्ये केले होते. यामध्ये प्रथम व्याख्यान एच. एल .श्री. मुरलीधर स्वामी कृषी व उद्यानविद्या महाविद्यालय मालेगाव येथे आयोजित करण्यात आले होते. दुसरे व्याख्यान डॉ. हितेंद्र आर. आहेर, प्राचार्य कर्मवीर रामरावजी आहेर कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय देवळा ,जिल्हा नाशिक ,येथे व तिसरे व्याख्यान डॉक्टर सुभाष निकम सर प्राचार्य एम. एस .सी. कॉलेज मालेगाव नाशिक व चौथे व्याख्यान डॉ. विनायक कदम सर, प्राचार्य स्वामी मुक्तानंद कॉलेज येवला ,जिल्हा नाशिक व पाचवे व्याख्यान डॉक्टर बी. एस .पगार प्राचार्य कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय कालवण, जिल्हा नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते. या पाच महाविद्यालयांमध्ये भाऊसाहेबांच्या कार्यावर व्याख्यान देण्याकरिता महाविद्यालयातून प्रा. विलास ठाकरे, प्रमुख वक्ते प्रा. के.जी .देशमुख, प्रा. जे.डी .सांगोडे यांनी या विविध महाविद्यालयामध्ये जाऊन भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक शैक्षणिक व कृषी विषयक कार्य सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण व भाऊसाहेबांनी त्या काळामध्ये सांगितलेले कृषी विषयक विचार यामध्ये कशी सांगड घालता येईल आणि हे नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना कसे उपयुक्त ठरेल या संदर्भात या पाचही महाविद्यालयांमध्ये भाऊसाहेबांचे कार्य आणि भविष्यामध्ये होणारे बदल याविषयी माहिती आणि भाऊसाहेबांचे राज्यघटना निर्मिती त्याचप्रमाणे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवाजी शिक्षण संस्था अमरावती येथे १९३२ मध्ये स्थापन करून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दार उघडे करून दिले होते.अशाप्रकारे भाऊसाहेबांच्या कार्य कर्तुत्वाचा लेखाजोखा नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयामध्ये जाऊन सांगितला.

# १ व १० वरील उर्वरित

## मातृभाषेला प्राधान्य देणं

लोकशाही देशामध्ये राहत आहोत. भारतीय लोकशाही आणि लोकशाही मूल्यांविषयी आमच्या मनामध्ये प्रचंड आदर आहे. काँग्रेस पक्षाप्रमाणे आम्ही कोणत्याही प्रकारे 'इमर्जन्सी माईंडसेट'चे (आणीबाणीच्या मानसिकतेचे) मुळीच नाही आहोत. त्यामुळे देशातील जनतेला असलेल्या आंदोलनाच्या अधिकाराचा आम्ही नेहमीच पूर्ण आदर करतो. लोकशाही मार्गाने होणाऱ्या कोणत्याही आंदोलनाचा आवाज दडपण्याचा आमचा प्रयत्न नसतो.

## 'आजपासून सलाईन,

'म्हणे मिरवणुका काढता येणार नाहीत. गणेश उत्सवाच्या मिरवणुका निघणार नाहीत का? कोणतं हिंदुत्व? मी १९ ला मुंबईला जाणारच. पोलिसांच्या परवानगीबाबत वकील बांधव ठरवतील.'

'१९ सप्टेंबरला आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करायचं ठरवलं आहे, ते होणारच. न्यायदेवतेचे नियम आम्ही पाळणारच. न्यायदेवता म्हणतेय की कोणालाही आम्हाला रोखता येणार नाही, पण हे आम्हाला रोखत आहेत. म्हणजे मी सांगितलेलं षडयंत्र ते हेच ना. राज्य अस्थिर कोण करत आहेत?' असं मनोज जरांगे म्हणाले.

१५ सप्टेंबर रोजी आम्ही इथून निघणार आणि मुंबई जाऊन शांततेत उपोषण आणि आंदोलन करणार. त्यांना परवानगी द्यायची की नाही ते त्यांनी ठरवायचं. १९ ला आझाद मैदानावर लोकशाही मार्गाने शांततेत बेमुदत उपोषण होणार. आजपासून सलाईन-पाणी सर्व सोडलं. आता डॉक्टरांना सांगितलं होतं की या सलाईन लावायला. पण आता सलाईन, पाणी, उपचार सर्व बंद करत आहे', असं मनोज जरांगे म्हणाले.

## ओमान किनारपट्टीवर भारतीय

त्वरित पावले उचलण्याचे तसेच संवाद व मुत्सद्देगिरीचा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. तसेच, या भागातील आंतरराष्ट्रीय जलमार्गावरून मुक्त व सुरक्षित नौकानयन आणि व्यापाराची वाहतूक पूर्ववत करण्याचे आवाहनही भारताने केले.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, ही घटना घडताच मस्कत येथील भारतीय दूतावासाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. दूतावास ओमानच्या स्थानिक प्रशासनासोबत सतत संपर्कात असून शोध आणि बचाव कार्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

भारतीय नागरिकांच्या सुटका मोहिमेत मोलाचे सहकार्य केल्याबद्दल भारताने ओमान प्रशासनाचे आभार मानले आहेत. बेपत्ता खलाशाचा शोध घेण्यासाठी बचावकार्य अधिक वेगाने राबवले जात आहे.

## नागपूर हादरले! जादूटोण्याच्या

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक युनूस चांद शेख यांनी दिली.

## पश्चिम बंगालमध्ये २५२ मदरसे

राज्याचे पंचायत राज मंत्री दिलीप घोष यांनी सांगितले की, मदरसांबाबत अनेक विवाद झाले आहेत आणि अनेक प्रकरणांमध्ये टोकाच्या (कट्?टरपंथी) हालचालींमध्ये कथित सहभागाबद्दल अटक करण्यात आलेले लोक अशा काही संस्थांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे आढळून आले आहे. मदरसांच्या विरोधात वारंवार तक्रारी येत होत्या. मदरसांमधून देशविरोधी कृत्य करणाऱ्या लोकांची प्रकरणे समोर आली आहेत.'

## बेस्ट बसला भररस्त्यात आग

नियंत्रण मिळवलं. आग आटोक्यात आल्यानंतर मुंबई अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून बॅटरीची जोडणी तोडली आणि ती बसमधून बाहेर काढली. या घटनेनंतर स्थानिक पोलीस, बेस्टचे अधिकारी आणि महानगरपालिकेच्या वॉर्डचे कर्मचारीही तातडीने घटनास्थळी पोहोचले.

## विहिरीतल्या पाण्याला

तलाठी राजू इंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याबाबत प्रांताधिकारी यांनाही माहिती देण्यात आल्याचे सांगण्यात आले. विहिरीच्या पाण्यात आढळणारा ज्वलनशील पदार्थ नेमका कोणता आहे आणि तो कुठून येत आहे, हे अद्याप अधिकृत तपासणीत स्पष्ट झालेले नाही. पाण्याचे नमुने आणि भूमिगत इंधन टाक्यांची तपासणी झाल्यानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## खत टाकताना अचानक

**करा**

वाघाच्या हल्ल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी वनविभागाने तातडीने पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे. वाघाचा वावर असलेल्या भागात नियमित गस्त वाढवावी, आवश्यक ठिकाणी कॅमेरे लावावेत आणि वाघाच्या हालचालींचा मागोवा घ्यावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, जखमी भाऊराव म्हशाखेत्री यांना योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत तसेच नियमानुसार शासनाची आर्थिक मदत मिळावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन वनविभाग आणि महसूल प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

## शिक्षक मतदारसंघाच्या रणधुमाळीत

देशमुख यांच्या कन्या आहेत. त्यामुळे राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचा वारसा त्यांना लाभला आहे. लहानपणापासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणाचा अनुभव मिळाल्याने विविध प्रश्नांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. याच पार्श्वभूमीवर शिक्षक मतदारसंघातील त्यांची संभाव्य उमेदवारी चर्चेचा विषय ठरली आहे.

**उच्चशिक्षित जमेची बाजू-** अदिती पोहरे यांची शैक्षणिक पार्श्वभूमीही लक्षवेधी आहे. त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथून एम.ई. स्ट्रक्चरल डिझाईन हे पदव्युत्तर शिक्षण विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले आहे. तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून एम.ए. मानसशास्त्र हे शिक्षणही विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले आहे. त्यापूर्वी त्यांनी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, बडनेरा येथून बी.ई. सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी प्राप्त केली आहे. फोर्ट कॉन्व्हेंट, मुंबई आणि होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, अमरावती येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले आहे.

**राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता-** अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघात अनेक इच्छुकांकडून निवडणुकीची तयारी सुरू असतानाच अदिती पोहरे यांच्या उमेदवारीची चर्चा पुढे आल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. उच्चशिक्षित पार्श्वभूमी, अध्यापनाचा अनुभव, शिक्षण क्षेत्राशी असलेला संबंध आणि राजकीय वारसा या चारही बाबी त्यांच्या उमेदवारीला वेगळी धार देऊ शकतात.

## शहानुर धरणात ६२.९५ टक्के

पाणी साठा पातळी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यातील पाणी पुरवठ्याबाबत दिलासादायक स्थिती राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, पावसाळ्याच्या उत्तरार्धात धरणातील साठा ६२ टक्क्यांवर पोहोचल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पुढील पावसावर धरण भरण्याची प्रतीक्षा प्रशासनासह शेतकऱ्यांना लागली आहे.

## ३१ ठाण्यांत एकाचवेळी 'हाय बीम'

**कारवाईपेक्षा जनजागृतीवर भर-**

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या मोहिमेचा उद्देश केवळ दंडात्मक कारवाई करणे नाही. रात्रीच्या वेळी रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करणे, वाहनचालकांना वाहतूक शिस्तीची जाणीव करून देणे आणि रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता वाढविणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व अंमलदार, जिल्हा वाहतूक शाखा आणि अचलपूर वाहतूक शाखेने केली. ३१ ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी झालेल्या या मोहिमेमुळे रात्रीच्या वेळी नियमबाह्य प्रकाशझोत वापरणाऱ्या वाहनचालकांना स्पष्ट इशारा मिळाला आहे. पुढील काळातही अशा तपासण्या सुरू राहणार असल्याने 'हाय बीम'चा गैरवापर करणाऱ्यांची झगमगाटी बेफिकिरी आता पोलिसांच्या रडारवर राहणार आहे.

## गणेशोत्सवासाठी अमरावती

आक्षेपार्ह गाण्यांवर पोलिसांचे विशेष लक्ष राहणार आहे.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि गणेशोत्सव शांततेत साजरा करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी केले आहे.

## गणपती बाप्पांच्या मूर्ती खरेदीसाठी

झाला होता.अनेक ठिकाणी नागरिकांना पायदळ चालणे सुद्धा अशक्य होते .यामुळे अनेक दुकानाकडे गणपती मूर्ती साठी नागरिक न फिरकल्याने नाराजीचा सूर उमटला. लाखो रुपयांची गुंतवणूक करून सुद्धा अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे गणपती बाप्पांच्या मूर्ती ची विक्री करणाऱ्या दुकानदाराचे मोठे नुकसान झाले.याबाबत अचलपूर नगर परिषद प्रशासनातील अधिकारी यांनी ही दखल घेतलेली नाही .यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर अचलपूर नगर परिषद प्रशासनाने पर्यायी उपाययोजना का राबविली नाही ? हा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे.यामुळे सण,उत्सवाच्या काळात स्थानिक प्रशासन म्हणून अचलपूर नगर परिषद प्रशासनाची तयारी किती असते ? हे या वरून स्पष्ट झाले आहे. परतवाडा शहरातील नेहरू मैदान परिसरात नागरिकांची गणपती बाप्पांच्या मूर्तीच्या खरेदीसाठी विविध दुकानात मोठी गर्दी असते. मात्र परिसर हा चिखलमय झाल्याने नागरिकांसह दुकानदारांना विविध अडचणीचा सामना करावा लागला.याबाबत अचलपूर नगर परिषद प्रशासनाने ठोस उपाय योजना पूर्वीच राबविली पाहिजे होती.

**-पंजाब बेदरकर ,अचलपूर.**

पावसामुळे नेहरू मैदान परिसरात चिखल झाल्याने नागरिकांनी गणपती बाप्पांच्या मूर्तीच्या खरेदीसाठी अनेक दुकानाकडे पाठ फिरवली आहे.लाखो रुपयाची गुंतवणूक करूनही प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नागरिकांनी गणपती बाप्पांच्या मूर्तीच्या खरेदीसाठी पाठ फिरवल्याने आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**-उद्धव मगरे,दुकानदार ,नेहरू मैदान,परतवाडा.**

## गोवंशासह ८.८० लाखांचा मुद्देमाल

दाखल करण्यात आला आहे.

गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मोर्शी पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक तुषार चव्हाण यांच्या नेतृत्वातील पथकाने पेठे पेट्रोल पंप परिसरात सापळा रचला. संशयास्पद दोन वाहने एकामागोमाग येताच पोलिसांनी ती थांबवून पंचांसमक्ष झडती घेतली.

पहिल्या एमएच १५ डीके ४२२९ क्रमांकाच्या अशोक लेलँड वाहनात दोन गोवंश आढळले. या वाहनाची किंमत पाच लाख रुपये, तर जनावरांची किंमत ४८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दुसऱ्या एमएच ४३ एडी ९८२६ क्रमांकाच्या टाटा एस वाहनातून तीन गोवंश मिळून आले. वाहनाची किंमत तीन लाख, तर जनावरांची किंमत ३२ हजार रुपये आहे. वाहनांची तपासणी करताना जनावरांना आखूड दोरखंडाने बांधून कोंबण्यात आल्याचे तसेच त्यांच्या चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे फारुख खॉं अफसर खॉं पठाण (३०), सैयद जुनेद सैयद युनुस (२२) आणि जितेंद्र वासुदेवराव शिरसागर (४०) यांच्याविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देण्यास प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम आणि बीएनएसच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, जप्त करण्यात आलेली जनावरे येरळा येथील गोरक्षण संस्थेत दाखल करण्यात आली. पशुधन विकास अधिकाऱ्यांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून उपचार केले.

# भर पावसात २७ दिवसांनी राजेशचा मृतदेह काढला बाहेर

## राजेश बेठेकरच्या मृत्यूचे गूढ उकलणार?

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील वादग्रस्त महर्षी पब्लिक स्कूल आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी राजेश बाबू बेठेकर याच्या मृत्यूला तब्बल २७ दिवस उलटल्यानंतर शनिवारी सायंकाळी भर पावसात त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. चिखलदरा पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. या कारवाईमुळे राजेशच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

१६ ऑगस्ट रोजी राजेश बाबू बेठेकर या विद्यार्थ्याचा मृत्यू शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचा आरोप त्याच्या पालकांनी केला होता. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्नातून विषबाधा झाल्याचाही आरोप करण्यात आला होता. या गंभीर प्रकरणानंतर



शाळा प्रशासनाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते.

घटनेनंतर तब्बल २७ दिवसांनी पोलिसांनी मृतदेह बाहेर काढण्याची कारवाई केली. शनिवारी सायंकाळी सुरू असलेल्या मुसळधार पावसाची पर्वा न करता ही कारवाई करण्यात आली. मृतदेह बाहेर काढल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी चिखलदरा तहसीलदार, चिखलदरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार तसेच चिखलदरा तालुका वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच मृत विद्यार्थ्याचे नातेवाईक आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मृतदेह बाहेर काढण्यात येणार असल्याची माहिती मिळताच गावातील नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती.

दरम्यान, या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, निवास व्यवस्था, शालेय गणवेश व कपडे तसेच औषधोपचाराच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्याचे प्रशासनाच्या पाहणीत समोर आले होते. अमरावतीचे अपर आदिवासी विकास विभागाचे आयुक्त संदीप गोलाईत यांनी महर्षी पब्लिक स्कूल आदिवासी आश्रमशाळेची पाहणी केली होती. या पाहणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या भोजनासह पिण्याचे पाणी, निवास, गणवेश आणि आरोग्य सुविधांबाबत अनेक त्रुटी आढळल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने शाळेतील खानावळीला टाळे ठोकले होते. राजेश बेठेकर यांच्या मृत्यू प्रकरणी त्यांच्या पालकांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर संबंधित घटनेची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी पोलिसांना दिले होते.

आता २७ दिवसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात आल्याने या प्रकरणाच्या तपासाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे. शवविच्छेदन अहवालात काय निष्पन्न होते आणि राजेशच्या मृत्यूमागचे नेमके कारण काय होते, हे अहवालानंतर स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून महर्षी पब्लिक स्कूलच्या संचालकांविरोधात गुन्हे दाखल करावेत आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राजेश बेठेकरच्या कुटुंबीयांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित या गंभीर प्रकरणात प्रशासनाने दिरंगाई न करता तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही कुटुंबीयांनी केली आहे.

## तब्बल दीड वर्षानंतर सापडला

सादीक शेखच्या हालचालींबाबत माहिती मिळविण्यात आली. यवतमाळातील ताजनगर परिसरात आरोपी असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने त्याला शोधून काढले. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याला संबंधित गुन्ह्यात अटक करण्यात आली. त्याच्या अटकेमुळे दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणाच्या तपासातील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलिस अधिकारी गिरीष ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किरण औटे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोउपनि. स्वप्नील रणखांब, पोहेकॉ युवराज मानमोठे, पवन अलोने, पोकॉ संदेश चव्हाण आणि यशवंत काळे यांनी आरोपीला पकडण्याच्या कारवाईत सहभाग घेतला. जुन्या गुन्ह्यांतील फरार आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या शोधमोहीमेत सादीक शेखची अटक महत्त्वाची मानली जात असून, आता त्याच्याकडून गुन्ह्याबाबत पुढील माहिती मिळविण्याकडे तपासाचे लक्ष आहे.

## 'ऑपरेशन कवच'मध्ये रेती

गंगाधर कृष्णाजी कवडेती याच्याकडे चौकशी केली. ट्रकमध्ये रेती असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी रॉयल्टी आणि वाहतुकीचा परवाना मागितला. मात्र, कोणताही वैध परवाना नसल्याचे समोर आले. ट्रकसोबत असलेल्या राजेश अंतुस उईके याचीही चौकशी करण्यात आली. रेती कोठून आणली आणि कोणाच्या सांगण्यावरून वाहतूक केली, याबाबत विचारणा केली असता ट्रक मालक दिपक काळे याच्या सांगण्यावरून रेतीची वाहतूक केल्याचे चालकाने सांगितल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

या कारवाईत पोलिसांनी सात ब्रास पांढरी रेती, किंमत ५९ हजार ५०० रुपये, तसेच ३२ लाख रुपये किमतीचा टाटा सिग्ना ट्रक जप्त केला. एकूण ३२ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात आला आहे. दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी शेघाट पोलिसांकडे देण्यात आले असून, फरार दिपक काळे याचा शोध घेतला जात आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोउपनि. आकाश शिवणकर आणि अंमलदार रूपेश गावंडे, शांताराम सोनोने, विवेक घोरमाडे यांच्या पथकाने केली.

## भरती परीक्षा पद्धतीत होणार

आपले लेखी निवेदन/सूचना/अभिप्राय किंवा भेटीसाठी वेळ मागणारे पत्र खालीलपैकी कोणत्याही प्रकारे सादर करता येईल समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या नागरिकांनी खालील नमूद केलेल्या विशेष कक्षामध्ये किंवा ई-मेल पत्त्यावर अर्ज सादर करावा.

अ) प्रत्यक्ष सादर करण्याचे ठिकाण : नोडल अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती. उपजिल्हाधिकारी, (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती. विशेष कक्ष :निवासी उपजिल्हाधिकारी यांची शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती. कालावधी : दि. १४ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर, २०२६ कार्यालयीन वेळेत

ब) ई-मेल : amravati-examreformstaskforce @maharashtra.gov.in efkeâbkee rdc.amravati@gmail.com ज्या नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसेल, त्यांनी आपले लेखी अभिप्राय, सूचना, शिफारशी अथवा निवेदने विहित मुदतीत वरील ई-मेलवर पाठवावीत.

## पोहरा येथील तरुणाचा हिवरा

नवले कुटुंबीयांच्या परिचयातील व विश्वासातील व्यक्ती म्हणून किरकोळ कामे पाहत होता. त्यामुळे त्याचा बराचसा वेळ हिवरा परिसरात जात होता. रविवारी सकाळी हिवरा गावालगत कृष्णाराव वाटाणे यांच्या कपाशीच्या शेतात भैय्याजी हिरुळकर यांना चेतन मृतावस्थेत पडलेला दिसून आला. घटनेची माहिती मिळताच गावातील सरपंचांनी पोलिसांना कळविले. त्यानंतर आसेगाव पूर्णा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी अचलपूर येथे पाठविण्यात आला आहे.

चेतनला पूर्वीपासून दातखळी येण्यासारखा आजार असल्याची चर्चा गावात आहे. मात्र, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. या घटनेचा पुढील तपास आसेगाव पूर्णा पोलीस करीत आहेत. चेतन हा हसतमुख, बोलका आणि कोणाचेही काम तत्परतेने ऐकून घेणारा असल्याने पंचक्रोशीत सर्वांचा परिचित होता. आसेगाव येथील किराणा दुकानातही काम करत असल्याने त्याचा अनेकांशी परिचय होता. त्याच्या अकस्मात मृत्यूने पोहरा, हिवरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शिक्षक मतदारसंघाच्या रणधुमाळीत अदिती पोहरे उतरणार

**संघटनेच्या आग्रहाला मान** | **निवडणूक लढविण्याचा निर्धार** | **उच्चशिक्षित नेतृत्वामुळे राजकीय वतुर्ळाचे लक्ष** | **शिक्षकांच्या प्रश्नांना मिळणार नवा आवाज**

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी काही महिन्यात होऊ घातलेल्या अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. इच्छुक उमेदवारांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झालेली असतानाच उच्चशिक्षित सौ. अदिती ऋषिकेश पोहरे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. एका शिक्षक संघटनेसह समर्थक शिक्षकांच्या आग्रहाला मान देत त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने अमरावती विभागातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला उधाण आले आहे.

शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्वाची गरज असल्याचे समर्थक शिक्षकांचे म्हणणे आहे. वेतन, सेवाशर्ती, पदोन्नती, अनुदान, शैक्षणिक धोरणे आणि विविध प्रशासकीय अडचणी यांसारखे प्रश्न सातत्याने शासनाच्या पातळीवर मांडण्याची गरज आहे. याच अपेक्षेतून अदिती पोहरे यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरावे, यासाठी शिक्षकांकडून आग्रह करण्यात आला. शिक्षकांच्या आग्रहातूनच निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न अग्रक्रमाने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत नवी चर्चा आणि नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### राजकीय बाळकडू अन् शिक्षण क्षेत्राचा वारसा

सौ. अदिती ऋषिकेश पोहरे या माजी कृषी मंत्री हर्षवर्धन उर्फ भैय्यासाहेब देशमुख यांच्या कन्या आहेत. त्यामुळे राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचा वारसा त्यांना लाभला आहे. लहानपणापासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणाचा अनुभव मिळाल्याने विविध प्रश्नांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. याच पार्श्वभूमीवर शिक्षक मतदारसंघातील त्यांची संभाव्य उमेदवारी चर्चेचा विषय ठरली आहे.

### उच्चशिक्षित जमेची बाजू

अदिती ऋषिकेश पोहरे यांची शैक्षणिक पार्श्वभूमीही लक्षवेधी आहे. त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथून एम.ई. स्ट्रक्चरल डिझाईन हे पदव्युत्तर शिक्षण विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले आहे. तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून एम.ए. मानसशास्त्र हे शिक्षणही विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले आहे. त्यापूर्वी त्यांनी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, बडनेरा येथून बी.ई. सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी प्राप्त केली आहे. फोर्ट कॉन्व्हेंट, मुंबई आणि होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, अमरावती येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले आहे.

### अध्यापन अन् संशोधनाचा प्रदीर्घ अनुभव

शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रत्यक्ष अनुभव हीदेखील महत्त्वाची बाब मानली जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला येथे त्या २०१० पासून पदव्युत्तर स्तरावर भूकंप अभियांत्रिकी विषयाच्या विशेष प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. एम.ई. स्तरावरील विविध शोधप्रबंध तसेच संशोधन प्रकल्पांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

याशिवाय देशोन्नतीमध्ये संचालक व महिलांचे व्यासपीठ मनस्वीनी'च्या संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्या कार्यरत असून, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.

### राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघात अनेक इच्छुकांकडून निवडणुकीची तयारी सुरू असतानाच अदिती पोहरे यांच्या उमेदवारीची चर्चा पुढे आल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. उच्चशिक्षित पार्श्वभूमी, अध्यापनाचा अनुभव, शिक्षण क्षेत्राशी असलेला संबंध आणि राजकीय वारसा या चारही बाबी त्यांच्या उमेदवारीला वेगळी धार देऊ शकतात.

# जिल्ह्यात कमी पावसाने शेतकरी-मजूर संकटात अवैध धंदेवाईकांना मात्र सुगीचे दिवस!

■ पप्पु घुगे ■

**वाशीम :** गेल्या दीड महिन्यापासून वाशीम जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिके संकटात सापडली असून शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. हाताला काम नसल्याने ग्रामीण भागातील मजुरांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असतानाच दुसरीकडे जिल्ह्यात सर्वत्र वरली-मटका, जुगार, अवैध गावठी दारू, देशी-विदेशी दारू, तितली-भवरा, गुटखा यासह विविध अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणात ऊत आला असल्याची चर्चा आहे. त्यामुळे एका बाजूला शेतकरी-मजूर आर्थिक संकटात आणि दुसऱ्या बाजूला अवैध धंदेवाईकांची चांगलीच 'सुगी' सुरू असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.



**जिल्ह्यात वरली-मटका, जुगार, अवैध दारूचे अड्डे जोमात; पोलीस व संबंधित विभागाची अर्थपूर्ण डोळेझाक**

वाशीम शहरासह जिल्ह्यातील वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपिर, मानोरा आणि कारंजा (लाड) या सहा तालुक्यांमध्ये अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. काही ठिकाणी भरचौकातच वरली-मटका घेणाऱ्यांनी आपले अड्डे थाटल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या प्रकारामुळे परिसरातून ये-जा करणाऱ्या महिला, विद्यार्थी आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मात्र संबंधित व्यावसायिकांच्या दहशतीमुळे अनेक नागरिक तक्रार करण्यास पुढे येत नसल्याचे सुज्ञ नागरिक बोलत आहेत.

अवैध धंद्यांवर पोलिसांकडून अधूनमधून कारवाई केली जात असली तरी मोठ्या व्यावसायिकांवर अपेक्षित स्वरूपाची कारवाई होत नसल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. लहान-मोठ्या कारवायांपेक्षा अवैध धंद्यांच्या मुळावर घाव घालण्याची गरज असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने या व्यवसायांना बळ मिळत असल्याचा आरोप जनतेकडून केल्या जात आहे.

ग्रामीण भागातही वरली-मटका, जुगार, अवैध दारू आणि इतर अवैध व्यवसाय सुरू असल्याची चर्चा असून त्याचा परिणाम सामाजिक वातावरणावर होत आहे. आर्थिक अडचणींमुळे आधीच त्रस्त असलेल्या शेतकरी व शेतमजुरांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेत अवैध धंदेवाईक आपले जाळे विस्तारत असल्याची नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.


दरम्यान, जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने शहरासह ग्रामीण भागात विशेष मोहीम राबवून ठोस कारवाई करावी. केवळ किरकोळ कारवायांपुरते मर्यादित न राहता अवैध धंद्यांच्या मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

# राज्य महामार्गावर अवैध रेती वाहतूक करणारा टिप्पर पलटी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यात बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक करणाऱ्या एका भरधाव टिप्परचा भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. रिसोड तालुक्यात ओव्हरलोड रेती भरून अत्यंत वेगाने जाणाऱ्या एका टिप्परचे चालकावरील नियंत्रण सुटल्यामुळे हा टिप्पर राज्य महामार्गावर उलटला. टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) वाळू भरलेली होती.

टिप्पर पलटी झाल्यानंतर त्यामधील सर्व अवैध रेती राज्य महामार्गावर पसरली. या अपघातात टिप्परचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, चालक गंभीर जखमी झाला आहे. सुदैवाने, अपघात झाला त्या वेळी राज्यमार्गावर इतर कोणतेही वाहन किंवा पादचारी नसल्याने मोठी जीवितहानी टळली.



वाशिमच्या दिशेने जाणारा एक अवैध रेती वाहतूक करणारा भरधाव टिप्पर राज्य महामार्गावरील सवड नजीक वीटभट्टी जवळ पलटी झाल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान घडली.

अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर गेल्या काही दिवसांपासून रात्री वेळी शहरातून भरधाव वेगाने धावत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहेत.

मात्र या कडे महसुल प्रशासनाकडून अर्थपुर्ण दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे. या अपघातात टिप्पर चालक व सोबत असलेल्या एकाला गंभीर दुखापत झालायाने त्यांना तात्काळ नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.या राज्य महामार्गावर टिप्पर पलटी झाल्याने राज्य महामार्गावर रेती मोठ्याप्रमाणात पसरली आहे. रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक करणा-या तस्करावर महसूल व पोलीस प्रशासनाकडून काय कार्यवाई होते या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

# धुमका-तोंडगाव टोल नाक्यावर कोट्यवधींच्या रोख गैरव्यवहाराची पोलखोल

**NHAI अमरावतीच्या परस्परविरोधी कागदपत्रांमुळे खळबळ**

**अधिकृत पत्रात दंडात्मक कारवाईचा दावा; मात्र माहिती अधिकारात सरकारी खात्यात प्रत्यक्ष वसुली 'शून्य'**

**कंत्राटदाराची बँक गॅरंटी वाचवण्यासाठी अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय महामार्ग १६१ (NH-161) वरील धुमका-तोंडगाव टोल नाक्यावर १००% कॅशलेस महामार्ग नियमांची पायमल्ली करून सुरू असलेल्या गैरव्यवहारावरून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) प्रकल्प अंमलबजावणी घटक (PIU) अमरावतीचा सावळागोंधळ चव्हाट्यावर आला आहे. टोल नाक्यावर प्रणालीबाहेरून परस्पर रोख वसुली होत असल्याची गंभीर तक्रार असताना, अधिकाऱ्यांनी भलताच बचाव पुढे केला.

एवढेच नव्हे, तर एका पत्रात दंडात्मक कारवाई केल्याचे दाखवून दुसऱ्या अधिकृत माहिती अधिकारात तिजोरीत एक रुपयाही जमा नसल्याची लेखी कबुली दिल्याने हे प्रकरण शासकीय बनावटगिरीच्या भोवऱ्यात अडकले आहे.

**तक्रार एक, अधिकाऱ्यांचा बचाव भलताच :** केंद्र सरकारच्या धोरणानुसार राष्ट्रीय महामार्गांवरील टोल नाक्यांवर १००% कॅशलेस व्यवहार बंधनकारक आहेत. असे असताना धुमका-तोंडगाव टोल नाक्यावर संगणकीय प्रणालीबाहेर (Off-system) रोख रक्कम स्वीकारून वाहने सोडली जात असल्याबाबत तोंडगाव येथील सजग ग्रामस्थ शरद तुळशीराम गोटे यांनी पुराव्यांसह तक्रार नोंदवली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी या आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष तपासणी करण्याऐवजी कंत्राटदाराला वाचवण्यासाठी 'छ-र्ष्ठे पाहून फ्लीट (Fleet) वाहने म्हणून सोडण्यात आली' असा धक्कादायक व नियमबाह्य खुलासा दिला.

वास्तविक पाहता, नॅशनल हायवेज फी रूल्स २००८ च्या नियम ११ नुसार व्यावसायिक वाहने किंवा खाजगी फ्लीट ट्रकांना अशा प्रकारे टोलमाफी देण्याची कायद्यात कोणतीही तरतूद नाही. रोखीची थेट चोरी लपवण्यासाठीच प्रशासनाने कंत्राटदाराच्या संगनमताने ही बोगस पळवाट शोधल्याचा आरोप होत आहे.

**पत्र क्र. १५०९ वि. आरटीआय १७५० : उघड शासकीय बनावटगिरी:** या प्रकरणातील सर्वात मोठा प्रशासकीय गैरव्यवहार ॅ्फ अमरावतीच्या दोन अधिकृत कागदपत्रांमधून उघड झाला आहे:

NHAI प्रकल्प संचालकांनी स्वाक्षरी केलेल्या पत्र क्र. १५०९ (दिनांक १४/०८/२०२६) मध्ये कंत्राटदारावर रीतसर 'दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे' असा अधिकृत दावा करण्यात आला होता. मात्र, गोटे यांनी याच कार्यालयाकडून मागवलेल्या माहिती अधिकार उत्तर क्र. १७५० (दिनांक ११/०९/२०२६) मध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी स्पष्ट केले की, कार्यालयात दंडाचा एक रुपयाही जमा झालेला नाही; तसेच कोणताही डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा सरकारी चलन उपलब्ध नाही. एकाच कार्यालयाकडून जारी झालेल्या या दोन परस्परविरोधी उत्तरांमुळे अधिकाऱ्यांनी वरिष्ठांची दिशाभूल करण्यासाठी आणि खासगी कंत्राटदाराला वाचवण्यासाठी खोटा प्रशासकीय दस्तऐवज (Fabricated Public Document) तयार केल्याचे कागदोपत्री सिद्ध झाले आहे.

**बँक गॅरंटी सुरक्षित सोडण्याचा संशय :** सदर टोल चालवणाऱ्या मे. रोडलिंक इन्फ्राटेक प्रा. लि. या कंत्राटदार एजन्सीची मुदत डिसेंबर २०२६ मध्ये संपत आहे. कंत्राट संपण्यापूर्वी कोणतीही आर्थिक देणी शिल्लक राहू नयेत आणि कंत्राटदाराची कोट्यवधींची बँक गॅरंटी (PBG) विनाअडथळा परत मिळावी, यासाठीच शासकीय यंत्रणेकडून हा खोटा पाठपुरावा तयार करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सरकारी महसुलाचा अशा प्रकारे परस्पर अपहार करणे हा भारतीय न्याय संहितेनुसार शासकीय निधीचा अपहार (कलम ३१६) व फसवणूक (कलम ३१८) तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गंभीर दखलपात्र गुन्हा ठरतो.

या संपूर्ण गैरव्यवहाराची नोंद केंद्रीय दक्षता आयोग (CVC) व रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे (MoRTH) करण्यात आली असून, पुरावे नष्ट होण्यापूर्वी टोलचा एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या काळातील मूळ raw CCTV फुटेज व ऊश्ए सर्व्हर डेटा तात्काळ जप्त करून बोगस पत्र तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाचा 'कला करंडक उत्सव' उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्यार्थ्यांच्या मनात दडलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या प्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि आत्मविश्वासाला नवी भरारी मिळावी, या उद्देशाने मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाच्या वतीने प्रथमच आयोजित 'कला करंडक उत्सव २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उत्सवात शास्त्रीय व लोकनृत्य तसेच वाद्यवादन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलाविष्काराची बहारदार प्रस्तुती केली. विद्यार्थ्यांसोबत पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग हीच या उपक्रमाच्या यशाची खरी पावती ठरली.

या कार्यक्रमासाठी स्वर कुंज कला अकॅडमीचे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ. अनिलजी सोनवणे सर अध्यक्ष व परीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराचे परीक्षण करत त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. राधिका मनीष मंत्री यांनी केले, तर डॉ. सौ. सपना नितीन राठी यांनी आभार प्रदर्शन केले.

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाच्या वतीने ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, तर स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# बैलपोळ्यानिमित्त शेतकरी बांधवांचा सन्मान; माळी युवा मंचचा उपक्रम

**बैलजोड्यांना घागरमाळ, शेतकऱ्यांचा शेलाटोपी देऊन गौरव**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी संस्कृतीचे प्रतीक असलेल्या बैलपोळा सणाचे औचित्य साधून माळी युवा मंचच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ११ सप्टेंबर रोजी द्वारका मिरवणुकीत सहभागी झालेल्या शेतकरी बांधवांचा उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला.

शेतकरी, बैल आणि कृषी संस्कृतीप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या उपक्रमाला शेतकरी बांधवांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात संत सावता महाराज, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळी युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नागेश काळे होते.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाशिम-मंगरुळपीर मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, नगरसेवक जयश्रीताई वानखेडे, राहुल तुपसांडे, बाप्पू ठाकूर, नितीन मडके, गजानन लांडगे, मनीष मंत्री, सोनू काळे यांच्यासह समाजातील ज्येष्ठ विश्वनाथजी इंगोले, गणेशराव भांदुर्गे, रामा इंगळे, रामू ठेंगडे, अनिल मडके, दत्ताजी लोणसूने, अभिमान इंगोले, रवी भांदुर्गे, मनीष चिपडे, बंटी सेट्टी बाबूजी, गजानन जाधव, संजू इंगोले, उमेश मोहळे, कुणाल हेडा, चेतन इंगोले, सुरज इंगळे, अतुल वटाने, गजानन जोगदंड, संजूभाऊ भांदुर्गे, राजू कलवार, गणेश वानखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याला साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा सण साजरा केला जातो. याच कृषी परंपरेचा सन्मान राखत माळी युवा मंचच्या वतीने बैलजोड्यांची पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली. प्रत्येक बैलजोडीला आकर्षक घागरमाळ देण्यात आली. ढोल-ताशांचा गजर आणि पारंपरिक वेशभूषेमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या वेळी कृषी क्षेत्रात योगदान देणाऱ्या शेतकरी बांधवांचा शेलाटोपी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेतकऱ्यांच्या कष्टाचा, त्यागाचा आणि कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

पारंपारिक सण-उत्सवांना सामाजिक बांधिलकीची जोड देणे आणि कृषी संस्कृतीशी असलेले नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे माळी युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी बैलजोड्यांसाठी घागरमाळ उपलब्ध करून दिल्या. तसेच समाजातील गणेशराव भांदुर्गे, संतोष वानखेडे, रवी भांदुर्गे, नितीन मडके, उमेश मोहळे, नितीन उलेमाले, सुनील जाधव, गजानन वानखेडे, खंडारे सर, कानकटाव सर, समाधान मोहळे, भगवान मडके, मनोहर आमले यांच्यासह दानशूर व्यक्तींनी आर्थिक सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माळी युवा मंचचे सचिव गणेश मोहळे, उपाध्यक्ष महादेव हरकळ, कार्याध्यक्ष रामू गाभणे, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत भडके, शहराध्यक्ष वैभव उलेमाले, गजानन ठेंगडे, नितीन बगाडे, छायाताई मडके, सविताताई मोहळे यांच्यासह युवा मंचच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, शेतकरी बांधव, महिला, युवक तसेच माळी युवा मंचचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम सिव्हिल लाईन वाशिम

ई-मेल - washim.ee@mahapwd.gov.in    दुरध्वनी क्रं- ०७२५२-२३२३३४

### ई-निविदा सुचना १८ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन बि १ नमुन्यातील निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://maharashtra.etenders.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मुंगळा ता. मालेगांव येथे संस्कृतीक संकुलाचे बांधकाम करणे | ७६८५०७७ |
| २ | जुनी उप जिल्हा रुग्णालय इमारत कारंजा परिसरातील जुने रुरल हॉस्पीटल इमारत येथे वॉटर प्रुफिंग, रंगरंगोटी व इतर किरकोळ कामे करणे | ५४५८८९१ |
| ३ | आस्थाविका अंतर्गत देपुळ ता. जि. वाशिम येथे ग्रामपंचायत जागेवर वाचनालय परिसरात पेवर ब्लाकचे बांधकाम करणे | १६५१४६४ |
| ४ | आस्थाविका अंतर्गत काटा ता. जि. वाशिम येथे शासकीय जागेवर मालमत्ता क्रं. १९१४ खुल्या जागेवर कंपाऊड वॉलचे बांधकाम करणे | १६५०९३० |
| ५ | आस्थाविका अंतर्गत कोंढाळा महाली ता. जि. वाशिम येथे हनुमान मंदिर परीसरात सभागृहाचे बांधकाम करणे | १६४३२५३ |
| ६ | आस्थाविका अंतर्गत खडसिंग ता. जि. वाशिम येथे मांगे सर यांचे घर ते भुसारे सर ते गजानन जावंजाळ यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे | १६२३३०२ |
| ७ | आस्थाविका अंतर्गत सावरगांव बड़े ता. जि. वाशिम येथे अकोला हायवे ते शंकर समाधान कड यांचे घरापर्यंत शासकीय जागेवर सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे | १६२३०५९ |
| ८ | पर्यटन विकास अंतर्गत पांडवउमरा ता. जि. वाशिम येथे स्टेजचे बांधकाम करणे | ११८५९९९ |
| ९ | जिवायो अंतर्गत गोवर्धण ता. रिसोड येथे दोन तलाठी कार्यालय व एक मंडळ कार्यालयाचे बांधकाम करणे | ३९९०२३६ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक. १५.०९.२०२६ ते दिनांक २२.०९.२०२६
**ई-निविदा उघडणे :-** कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग वाशिम यांचे कार्यालयात दिनांक. २४.०९.२०२६ वेळ ११.०० वाजता
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालयातील सूचना फलक

जा. क्र. ५५८७/ई-निसु-१६/मंत्रालय/निली/ २६-२७ दि. ०८.०९.२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम

**( उदय बिरारीस )**
कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग वाशिम

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# ‘२१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू होणार’

**मुंबई -** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात अमित शाह यांनी विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवली. त्यानंतर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अमित शाह यांनी देशातील विविध घडामोडींवर भाष्य केले. यावेळी शाह यांनी एक मोठी घोषणा देखील केली.

भाजपाच्या नेतृत्वाखाली सरकार असलेल्या २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू करण्यात येईल, अशी माहिती अमित शाह यांनी आज (१३ सप्टेंबर) मुंबईतील पत्रकार परिषदेत

## अमित शाहांची मुंबईतून मोठी घोषणा

बोलताना दिली आहे. ‘मला खात्री आहे की भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये आम्ही २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू करू’, असं अमित शाह म्हणाले आहेत.

**अमित शाह नेमके काय म्हणाले?**

‘आम्ही अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू केला आहे. आता मला खात्री आहे की, २०२९ च्या आधी भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये आम्ही समान नागरी कायदा लागू करू. तसेच सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि ऑपरेशन सिंदूर या सारख्या मोहिमांमुळे दहशतवादाबाबत ‘झिरो टॉलरन्स’चे धोरण प्रस्थापित झाले आहे आणि विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे’, असंही अमित शाह यांनी म्हटलं आहे.

‘२०१४ पूर्वीचा भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीचा काळ मागे टाकून आता भारत भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ‘कामगिरीवर आधारित राजकारणा’कडे वळला आहे. भारताच्या परराष्ट्र



आणि संरक्षण धोरणांना एक मजबूत आधार मिळाला आहे. ‘भारत प्रथम’ हे तत्त्व सरकारच्या दृष्टिकोनाला दिशा देत आहे आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले जात आहे’, असंही अमित शाह म्हणाले आहेत.

बेकायदेशीर स्थलांतराच्या मुद्द्यावरही अमित शाह यांनी सरकारची भूमिका पुन्हा स्पष्ट केली. शाह म्हणाले की, ‘बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांना देशाबाहेर काढले जाईल. मात्र, यासाठी विचाराधीन असलेल्या कार्यपद्धतीचा तपशील उघड केला जाणार नाही. देशातील सर्व बेकायदेशीर घुसखोरांची ओळख पटवून त्यांना बाहेर काढण्याचा सरकारचा निर्धार कायम आहे. आम्ही प्रत्येक बेकायदेशीर घुसखोराची ओळख पटवून त्याला बाहेर काढण्याचे काम करणारच आहोत.’आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पत्रकारांनी भाषेबाबत च्या वादावर प्रश्न विचारला. यावर बोलताना अमित शाह म्हणाले की, ‘मातृभाषेला प्राधान्य दिलं पाहिजे. मात्र, राज्याचं नेतृत्व या समस्येवर तोडगा काढेल. तसेच काही लोक समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत’, असा आरोपही त्यांनी केला आहे.

# जरांगेंना धक्का मुंबई पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली

## मागील उपोषणाचा दाखला, कोणकोणती कारणे दिली?

**मुंबई:** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबई मोर्चाची घोषणा केली असून १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार असल्याचे जाहीर केले आहे.

मात्र जरांगे पाटील यांच्या या उपोषणाला मुंबई पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आली आहे.

जरांगे यांनी मागील वर्षी मुंबईत केलेल्या उपोषणाचा संदर्भ देत त्यांच्याकडून विविध अटींचा भंग करण्यात आल्याचे सांगत पोलिसांकडून ही परवानगी नाकारण्यात आली.

पोलिसांच्या या भूमिकेनंतर आता मनोज जरांगे पाटील यांची पुढील दिशा नेमकी काय असणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला परवानगी नाकारताना मुंबई पोलिसांनी म्हटलं आहे की, ’आपल्याकडून विविध नियमांचा भंग जाणीवपूर्वक करण्यात येईल याबाबत माझी खात्री पटलेली आहे. तसंच दक्षिण मुंबई परिसरातील सामान्य व्यवहार, जसे की, शाळा, रुग्णालय, व्यवसाय, न्यायपालिका, सार्वजनिक वाहतूक व सार्वजनिक आरोग्य इत्यादी बाबी बाधित होऊन सार्वजनिक सुव्यस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याने मी आझाद मैदान येथे १९ सप्टेंबरपासून आमरण उपोषण व आंदोलन यासाठी आपण मागितलेली परवानगी नाकारत आहे,’ असं आझाद मैदान पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक राजू बिडकर यांनी परवानगी नाकारताना नमूद केलं आहे.

कोणत्याही आंदोलनास, एकाच वेळी फक्त एकच दिवसासाठी परवानगी देण्यात येते. तसंच शनिवार, रविवार व इतर शासकीय किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कोणतीही परवानगी देण्यात येत नाही. आपण शनिवारी उपोषणासाठी परवानगी मागितली आहे.

तसेच मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेता आपण यावेळी देखील उपोषणासाठी दिलेल्या एका दिवसाच्या परवानगीचा भंग करणार, याची आम्हाला खात्री पटली आहे.

आपण आंदोलनाची घोषणा करताना आपल्या गाड्या लाखात असणार आहेत, असं म्हटलं होतं. त्यामुळे आपल्या आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत होईल.

# बाप्पाच्या स्वागतासाठी पावसाच्या पायघड्या !

**मुंबई -** गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने मुंबईसह राज्यातील अनेक भागात पूनरागमन केले. गणरायाच्या स्वागताची लगबग सुरू असताना पावसाने पायघड्या अंथरल्या. त्यामुळे रविवारी दिवसभर मुंबईकरांना सूर्य दर्शन होऊ शकले नाही. मुंबईसह उपनगर आणि ठाणे, पालघर रायगड जिल्ह्यातही पावसाची संततधार कायम होती.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणे गणरायाच्या आगमनापूर्वीच पावसाचा जोर वाढला. मुंबईसह राज्यातील अनेक भागात रविवारी पावसाला सुरूवात झाली. मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, नवी मुंबई, रायगड जिल्ह्यात पावसाचा



जोर वाढला.

मुसळधार पावसामुळे वसई विरार, नालासोपारा या भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. वसई-विरार आणि नालासोपारा भागातील अनेक रस्ते पाण्याखाली गेल्याने नागरिकांना त्रास सोसावा लागला. अनेक ठिकाणी गुडघ्या इतके पाणी रस्त्यावर साचले होते.

रविवारी दिवसभर पाऊस सुरु होता. त्यानंतर सायंकाळी सहा नंतर मुंबईसह अनेक भागात पावसाचा जोर वाढला. ठाणे, पालघर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस कोसळत आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवलेला आहे. पुढील ४८ तासांसाठी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# बाईबद्दलच्या त्या वक्तव्याने आ. संजय गायकवाड अडचणीत

**बुलढाणा-** बाप तो बाप रहेगा... पण एखाद्या बाईने हे म्हटलं तर तिने बापासारखं शरीर कुठून आणायचं? असं म्हणत महिलांच्या शारीरिक ठेवणीवर जाहीरपणे वादग्रस्त टिप्पणी करणे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांना चांगलेच भोवले आहे. या असंसदीय आणि लज्जास्पद वक्तव्याप्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात मध्यरात्री आमदार गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंदेसेनेच्या आमदारावर गुन्हा दाखल झाल्याच्या या घटनेने राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.गेल्या आठवड्यात चिखली मतदारसंघाच्या भाजप आमदार श्वेता महाले यांचे पती विद्याधर महाले यांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाणा शहरात भव्य रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत ’बाप तो



बाप रहेगा...’ हे गाणे वाजवण्यात आले होते. या गाण्याबाबत प्रसारमाध्यमांनी आमदार संजय गायकवाड यांची प्रतिक्रिया विचारली असता, त्यांनी महिलांच्या शरीराबद्दल उपहासात्मक विधान केले.’हे वाक्य पुरुषाने बोलले तर ठीक आहे, पण बाईने म्हटलं तर बापासारखं शरीर ती कुठून आणणार?’ असे म्हणत त्यांनी अयोग्य हातवारेही केले, असा आरोप तक्रारदार महिलेने केला आहे. हे वक्तव्य आणि त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.

# तब्बल पाच महिन्यांनी अरविंद केजरीवालांनी भाजपवासी राघव चड्ढांवर मौन सोडले !

**दिल्ली -** ‘आप’चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी, राघव चड्ढा आणि संदीप पाठक यांच्यासह ’आप’च्या सात राज्यसभा खासदारांनी पक्ष सोडल्याच्या घटनेवर पहिल्यांदाच भाष्य केले आहे. चड्ढा यांचे नाव न घेता, त्यांनी टोला लगावत म्हटले की, आता कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी त्यांच्या विश्वासार्हतेची १०० वेळा तपासणी केली जाईल. केजरीवाल म्हणाले की, आम आदमी पक्षात पक्ष सोडण्याच्या अशा घटना घडत नाहीत. त्यांनी भाजपमध्ये सामील झालेल्या राज्यसभा खासदारांवर निशाणा साधत म्हटले की, आता कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची १०० वेळा तपासणी केली जाईल. त्यांनी या घटनेला दुर्दैवी



म्हटले.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी, राघव चड्ढा यांच्यासह पक्ष सोडून गेलेल्या सात राज्यसभा खासदारांवर निशाणा साधत म्हटले की, आम आदमी पक्षाने त्यांना राज्यसभेत पाठवले होते, लोकांनी नाही. त्यांनी चड्ढा, संदीप पाठक आणि इतर पाच राज्यसभा खासदारांवर पक्षाशी गद्दारी केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, ’आप’ने कोणाशीही गद्दारी केली नाही, पण या लोकांनी पक्षाशी गद्दारी केली आहे. याला एक धडा संबोधत ते म्हणाले की, हा आम आदमी पक्षासाठी एक राजकीय धडा आहे हे त्यांना समजले आहे. ते म्हणाले, ’राज्यसभेतील आम आदमी पक्षासाठी हा एक धडा होता. आता, कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी, ती व्यक्ती पात्र आहे की नाही हे पाहण्यासाठी आम्ही १०० वेळा कसून चौकशी करू.’

राघव चड्ढा एप्रिल २०२६ मध्ये भाजपमध्ये सामील झाले. त्यांच्यासोबत ’आप’च्या इतर सात राज्यसभा खासदारांनीही भाजपमध्ये सामील होण्याची घोषणा केली. भाजपमध्ये सामील झाल्यावर, राघव चड्ढा यांनी ’आप’वर आपली तत्त्वे आणि सचोटी सोडून भरकटल्याचा आरोप केला. त्यांनी ’आप’ला एक ’विषारी कार्यस्थळ’ म्हटले. ’आप’मध्ये आपला आवाज दाबला गेला आणि आपल्या मतांकडे दुर्लक्ष केले गेले, असे ते म्हणाले. चड्ढा यांनी, ’आप’च्या सात राज्यसभा खासदारांसह (दोन-तृतीयांश बहुमत), एका पत्रकार परिषदेत पक्षाचा राजीनामा दिला आणि पक्षांतरबंदी कायदा टाळला.

# मोदींच्या वाढदिवसापासून सेवा संकल्प अभियान, अमित शाहांची घोषणा

**मुंबई -** केंद्रीय मंत्री अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. आपल्या या दौऱ्यादरम्यान त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी शाहा यांनी मोठी घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून देशभरात ‘सेवा संकल्प अभियान’ आयोजित केले जाईल, असे शाह यांनी सांगितले. येत्या १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या एका महिन्याच्या काळात देशभरात हे अभियान राबवले जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

सेवासंकप्ल अभियानाची माहिती देण्याची ही पत्रकार परिषद घेण्यात आली असल्याचे अमित शाह यांनी केली आहे. आधी गुजरातनंतर संपूर्ण देशात जन्मदिवस साजरा केला जात होता. यावर्षी विशेष कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी मोदीजी यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधान कार्यकाळाला २५ वर्षे पूर्ण झाली आहे. या देशात खूप कमी लोक आणि नेते असे आहेत जे राज्याच्या मुख्यमंत्री पदापासून ते पंतप्रधान अशी पदे भूषवताना देशाचे नेतृत्व करत आले आहेत



असे अमित शाह यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरपर्यंत ‘सेवासंकल्प अभियान’ सुरु करणार असल्याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केली आहे. जनकल्याण,राज्य आणि राष्ट्रसेवेच्या या यज्ञाला अहर्निश सुरु ठेवणे महत्वाचे आहे.त्यामुळे सेवा संकल्प अभियान सर्व देशात राबवला जाणार आहे. प्रत्येक भाजपाच्या प्रत्येक विभाग, जिल्ह्यात, प्रत्येक विधानसभा आणि लोकसभा क्षेत्रात हे अभियान राबवले जाणार असल्याचेही अमित शाह यांनी यावेळी सांगितले.

**देशभरात विविध कार्यक्रम**

या मोहिमेत देशभरात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. पंतप्रधान मोदी यांचा वाढदिवस अत्यंत वेगळ्या प्रकारे केला जाणार आहे.


या अभियानात १२ वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदानासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

रक्तदान, आभार, नमो सेवा, संगीत नाट्यमय प्रस्तुती, अंगणवाडी सेवा, सेवा ज्योती कलस यात्रा, वाडनगर ते वाराणसी यात्रा, वाराणसे ते वाडनगर यात्रा, सेवा सेतू अभियान, ब्लॉक आणि तालुका स्तरावर सर्व सरकारी पातळीवर हे अभियान राबविण्यात येणार असल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी यावेळी सांगितले.

# संक्षिप्त

## कोल्हापूर जिल्ह्यातील ३८३३ शेतकऱ्यांची कर्जमुक्ती

**कोल्हापूर :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील पात्र ३,८३३ खातेदारांची दुसरी यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये जिल्हा बँकेशी संलग्न २,१६० खातेदारांना १४ कोटी ६४ लाख रुपये कर्जमाफीच्या माध्यमातून मिळणार आहे.राज्य



शासनाने सप्टेंबर २०२५ अखेर दोन लाखांपर्यंतच्या थकबाकीदारांना कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ४१ हजार ५५२ खातेदारांनी माहिती अपलोड केली होती. त्यापैकी २६ हजार ९९७ पात्र खातेदारांची पहिली यादी पाठवण्यात आली. यातील २१ हजार ३८८ खातेदारांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे, त्यांचे कर्जमाफीचे पैसे संबंधितांच्या खात्यावर वर्ग झाले आहेत. शासनाच्या वतीने शुक्रवारी ३,८३३ खातेदारांची यादी पाठवली आहे. यामध्ये २,१६० जिल्हा बँकेशी तर १,६७३ राष्ट्रीयकृत बँकांशी संबंधित खातेदार आहेत.कर्जमाफीच्या दुसऱ्या यादीत करवीर तालुक्यातील सर्वाधिक ४८५ खातेदारांचा समावेश असून त्यांना २ कोटी ९३ लाख ११ हजार ९५६ रुपये माफीचा लाभ मिळणार आहे.कर्जमाफीच्या पहिल्या यादीतील २६ हजार ९९७ पात्र खातेदारांपैकी ५ हजार ६०९ खातेदारांचे अद्याप आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे. यामध्ये जिल्हा बँकेच्या ४,९१७ खातेदारांचा समावेश आहे.

## वाघ खाली, युवक झाडावर; मरपल्लीच्या जंगलात रात्रभर थरार

**गडचिरोली:** वाघाच्या जबड्यातून किंवा त्याच्या तावडीतून सुटणे अशक्य मानले जाते; परंतु एटापल्ली तालुक्यातील मरपल्ली येथील एका २३ वर्षीय युवकाने दाखवलेले अभूतपूर्व धैर्य आणि प्रसंगावधानामुळे मृत्यूलाही हुलकावणी दिली. वाघ खाली आणि युवक झाडावर... अशा भयानक परिस्थितीत तब्बल १२



तास म्हणजेच अख्खी रात्र झाडावर काढून या युवकाने वाघाला चकवा दिला.मरपल्ली येथील महेंद्र भाऊजी दुर्वा हा युवक शनिवारी गावातील महिलांसोबत शेतालगत गुरे चारण्यासाठी गेला होता. दुपारी ४ वाजेच्या सुमारास अचानक वाघ समोर आल्याचे दिसताच, महेंद्रने क्षणाचाही विलंब न करता हिमतीने झाडावर चढून स्वतःचे प्राण वाचवले.

## वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी चक्क गाढवाचे लग्न


**सोलापूर/माढा:** यावर्षी पावसाळा संपत आला तरी सोलापूर जिल्ह्यात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी हातातोंडाशी आलेली पिके जळून चालली असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. परतीचा पाऊस तरी पडावा, या आशेने माढा तालुक्यातील मोडनिंब येथील शेतकऱ्यांनी चक्क गाढवाचे लग्न लावून अनोख्या पद्धतीने वरुणराजाला साकडे घातले.ग्रामीण



भागात गाढवाचे लग्न लावल्यास वरुणराजा प्रसन्न होऊन पाऊस पडतो, अशी जुनी आख्यायिका आहे. याच श्रद्धेतून मोडनिंब येथील शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर गाढवाचा थाटामाटात विवाह सोहळा आयोजित केला. यावेळी गाढवाला हळद लावण्यात आली.

## मुंबईकरांना मोठा दिलासा!

**मुंबई -** शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या सात प्रमुख तलावांमध्ये यंदाच्या पावसाळ्यात समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदाचा एकूण पाणीसाठा काहीसा कमी आहे. ताज्या आकडेवारीनुसार, आज सातही तलावांमध्ये मिळून १३,९८,३१८ दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध होता. हा साठा



एकूण जिवंत साठवण क्षमतेच्या ९६.६१ टक्के इतका आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत सात तलावांमध्ये १४,२४,१६४ दशलक्ष लिटर, म्हणजेच ९८.४० टक्के पाणीसाठा होता. तर २०२४ मध्ये १४,२४,१०७ दशलक्ष लिटर (९८.३९ टक्के) पाणीसाठा नोंदवला गेला होता. त्यामुळे यंदा पाणीसाठा तुलनेने कमी असला तरी मुंबईच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने स्थिती अद्याप समाधानकारक असल्याचे दिसून येते. सात तलावांपैकी विहार तलाव पूर्ण क्षमतेने भरलेला असून त्याचा साठा १०० टक्के आहे. तर तानसा तलावात ९८.८५ टक्के, भातसा तलावात ९७.८२ टक्के आणि तुळशी तलावात ९६.८९ टक्के पाणीसाठा आहे.

## जिल्ह्यातील सर्व जि. प. शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवा

**वाशिम:** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुली व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच आवश्यक त्या शाळांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी भीमसंग्राम सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्त्या, तरुणी पुरस्कारप्राप्त डॉ. माया वाठोरे यांनी केली. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी यांना निवेदन सादर केले.जिल्ह्यात अल्पवयीन मुली व महिलांवरील लैंगिक अत्याचार, छेडछाड आणि गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी शाळांमध्ये प्रभावी सुरक्षा व्यवस्था असणे आवश्यक असल्याचे डॉ. वाठोरे यांनी निवेदनात नमूद केले. सर्व जिल्हा परिषद शाळांच्या परिसरात आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्यांचे रेकॉर्डिंग सुरक्षित ठेवावे व नियमित निरीक्षणाची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच शाळेत विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या शाळांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८८ ■ सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## नवसाला पावणारा वरदविनायक, केळझरच्या सिद्धिविनायकाच्या चरणी भक्तांची रिघ

### आजपासून गणेशोत्सवात दहा दिवस भक्तिमय वातावरण, रोषणाईसह भजन कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन

**सेलू जनमाध्यम :** विदर्भाच्या अष्टविनायकांपैकी एक म्हणून प्रसिद्ध असलेल्या केळझर येथील सिद्धिविनायक मंदिरात गणेशोत्सवाच्या निमित्ताने भक्तीचा जागर सुरू झाला आहे. नवसाला पावणारा वरदविनायक अशी श्रद्धा असलेल्या या गणरायाच्या दर्शनासाठी विदर्भातून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत मंदिर परिसर भक्तांच्या रिघेने आणि धार्मिक कार्यक्रमांनी गजबजणार आहे.

वर्ध्यापासून २६ तर नागपूरपासून ५२ किलोमीटर अंतरावर टेकडीच्या कुशीत केळझर वसले आहे. या ठिकाणाला धार्मिक तसेच ऐतिहासिक वारसा लाभला आहे. वशिष्ठ पुराण आणि महाभारतात एकचक्रनगरचा उल्लेख आढळतो. वशिष्ठ ऋषींनी या ठिकाणी गणपतीची स्थापना केल्याची आख्यायिका आहे. पुराणात या गणरायाचा उल्लेख वरदविनायक असा करण्यात आला आहे.

केळझरच्या टेकडीवरील सिद्धिविनायकाची मूर्ती चार फूट सहा इंच उंच असून तिचा व्यास १४ फूट आहे. मंदिराच्या जीर्णोद्धारादरम्यान शिवलिंग सापडल्याने या स्थळाचे धार्मिक महत्त्व आणखी अधोरेखित झाले आहे.



#### दहा दिवस भक्तीचा जागर

गणेशोत्सवानिमित्त मंदिरात आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. टाळ वीणा भागवत भजन कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. पुजारी राममुरत मिश्रा यांच्या हस्ते श्रींची पूजा अभिषेक होईल. अनंत चतुर्दशीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे अध्यक्ष माधव ईरुटकर सचिव सुभाष तेलरांधे आणि समितीने भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. नवस पूर्ण झाल्यानंतर भाविक वरदविनायकाच्या चरणी श्रद्धेने नवस फेडतात. त्यामुळे गणेशोत्सवात केळझरचा सिद्धिविनायक भक्तांसाठी श्रद्धेचे आणि समाधानाचे स्थान ठरत आहे.

## पाचव्या दिवशीही मृतदेह तसाच, प्रशासन निद्रावस्थेत

### न्यायासाठी धुर्वे कुटुंबाचा एल्गार, खा.अमर काळे मैदानात

#### मंगळवारी गांधी पुतळ्यावर पुन्हा ठिय्या

**वर्धा / सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रायपूर जंगली येथे वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या भगवान धुर्वे यांच्या मृतदेहावर पाचव्या दिवशीही अंत्यसंस्कार झालेले नाहीत. कुटुंबीयांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घेण्याऐवजी प्रशासनाकडून चालढकल सुरू असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. धुर्वे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका कायम असून आता हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

कुटुंबातील एका व्यक्तीला कायमस्वरूपी सरकारी नोकरी आणि २५ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी अथवा कायमस्वरूपी नोकरी देता येत नसेल तर एक कोटी रुपयांची मदत द्यावी अशी मागणी खासदार यांच्यासह धुर्वे कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी केली आहे. मागण्या मान्य होईपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



या आंदोलनाला खासदार अमर काळे यांनी पाठिंबा दिला असून १० सप्टेंबर रोजी त्यांनी रायपूर जंगली येथे भेट देऊन कुटुंबीय आणि ग्रामस्थांशी चर्चा केली. मात्र निर्णय घेण्याचे अधिकार असलेले पालकमंत्री किंवा जिल्हाधिकारी प्रत्यक्ष चर्चेला उपस्थित न राहिल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला.

तीन दिवस रायपूर येथे ठिय्या आंदोलन करूनही पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी आंदोलनस्थळी आले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास जिल्हाधिकारी रायपूर येथे पोहोचल्या. त्यांनी मृतकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन चर्चेचा प्रयत्न केला. मात्र वेळ निघून गेल्यानंतर चर्चा करण्यास अर्थ नाही अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी आता आमच्याशी चर्चा करायची नाही असे सांगत जिल्हाधिकाऱ्यांना परत जाण्यास सांगितले. त्यानंतर कोणतीही चर्चा न होता जिल्हाधिकारी परत गेल्या.

दरम्यान रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे रविवारी आणि सोमवारी गणेश चतुर्थी निमित्त आंदोलन रायपूर जंगली येथेच सुरू ठेवण्यात आले. आता मंगळवारी वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

प्रशासनाने वेळीच निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पाच दिवसांपासून मृतदेह अंतिम संस्काराच्या प्रतीक्षेत असताना प्रशासनाची भूमिका काय असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. रायपूरपासून वर्ध्याच्या गांधी चौकापर्यंत सुरू झालेला हा संघर्ष आता प्रशासनाच्या संवेदनशीलतेची परीक्षा ठरणार आहे. हे आंदोलन कोणती भूमिका घेणार हे मात्र वेळच सांगू शकेल.

## कुंपण ठरले जीवघेणे; जिवंत वीजतारेच्या धक्क्याने ३२ वर्षीय जावयाचा करुण अंत

**सेलू जनमाध्यम :** कुटुंबाच्या तोंडाशी आलेला घास नियतीने हिरावून घेतला. पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतात कुंपणाच्या तारा जोडण्याचे काम करणाऱ्या ३२ वर्षीय जावयाचा महावितरणची जिवंत वीजतार तुटून कुंपणावर पडल्याने जागीच मृत्यू झाला. हिंगणी येथील शेतकरी चंद्रभान मुडे यांच्या जुनेवाणी मौजेतील शेतात रविवार १३ सप्टेंबर रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास ही हृदयद्रावक घटना घडली. महेश टापरे वय ३२ रा हिंगणी असे मृताचे नाव आहे.



महेश टापरे हे जनावरांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी लोखंडी कुंपणाच्या तारा व्यवस्थित करत होते. त्याचवेळी शेतावरून गेलेली महावितरणची उच्चदाब वीज वाहिनी अचानक तुटून थेट कुंपणावर पडली. महेश यांच्या हातात तार असल्याने क्षणार्धात त्यांच्या शरीरातून विजेचा तीव्र प्रवाह गेला. कुटुंबीयांच्या डोळ्यांसमोर हा काळजाचा ठोका चुकविणारा प्रकार घडला. वीजप्रवाह बंद करण्यासाठी महावितरणला तत्काळ माहिती देण्यात आली. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. महेश यांचा जागीच मृत्यू झाला.

पोलीस पाटील मारुती चचाने यांनी सेलू पोलिसांना माहिती दिली. ठाणेदार वाघोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक धनंजय पांडे यांनी घटनास्थळी पंचनामा केला. महावितरणचे अभियंता वाटकरही दाखल झाले. मृतदेह विच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून तपास सुरू आहे.

एका हसत्याखेळत्या तरुणाचा जीव गेल्याने मुडे आणि टापरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून हिंगणी परिसरात शोककळा पसरली आहे.

## पिपरी पुलावर पाण्याचा कहर; गावांचा संपर्क ठप्प

### धोकादायक पुलावरून जाणाऱ्यांना प्रशासनाचा इशारा

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यात शनिवारी रात्रीपासून पावसाने जोर धरल्याने नदी नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. पिपरी आणि रासा गावांकडे जाणाऱ्या मार्गावरील नाल्याच्या पुलावर रविवारी पहाटे पाच वाजतापासून पाणी वाहू लागल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली. त्यामुळे गावकऱ्यांचा संपर्क आणि दैनंदिन वर्दळ प्रभावित झाली. पुलावरून पाणी वाहत असताना जीव धोक्यात घालून मार्गक्रमण करू नये असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



पावसाने दीर्घकाळ दांडी मारल्याने सोयाबीन कापूस आणि तूर पिके कोमेजण्याच्या मार्गावर होती. पिकांना पावसाची प्रतीक्षा असतानाच शनिवारी रात्रीपासून तालुक्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली. रविवारी सकाळी आठ वाजेपर्यंत अनेक गावांमध्ये पावसाची संततधार सुरू होती. जोरदार पावसामुळे लहान मोठे नाले ओसंडून वाहत असून अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. त्यामुळे पिकांना जीवदान मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान हवामान विभागाने पुढील काळातही पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे प्रशासनाने खबरदारीचा पवित्रा घेतला आहे.

नागरिकांनी नदी नाले आणि पुलांच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये. पाण्याचा प्रवाह ओलांडण्याचा कोणताही प्रयत्न करू नये असे तहसीलदार कपिल हाटकर यांनी स्पष्ट केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने तहसील कार्यालय किंवा संबंधित पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पिपरी पुलावर अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार विकास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पावसाचा जोर वाढल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे.

## आईवर रानडुकराचा हल्ला अन् दोन दिवसांत मुलाचा मृत्यू

### ३५ वर्षीय सतीश वादाफळे यांच्या निधनाने भिवापूरवर शोककळा

**भिवापूर जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील भिवापूर येथील सतीश श्रीरामजी वादाफळे वय ३५ यांचे शनिवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना सेवाग्राम रुग्णालयात नेण्यात येत होते. मात्र रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.



सतीश हे भाडेतत्त्वावर शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन वर्षांचा मुलगा आहे. अवघ्या चार वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला होता. विशेष म्हणजे दोन तीन दिवसांपूर्वीच त्यांची आई अलकाबाई यांच्यावर गंगापूर शिवारात शेतात काम करीत असताना रानडुकराने हल्ला केला होता. पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर नागपुरात उपचार सुरू होते. मुलाच्या निधनाची बातमी कळताच त्या तातडीने गावात परतल्या. सतीश यांच्या अंत्यसंस्काराने संपूर्ण भिवापूर हळहळले. त्यांच्या पश्चात वडील श्रीरामजी आई अलकाबाई पत्नी मुलगा भाऊ मनोज यांच्यासह कुटुंबीय आहेत.

## सणासुदीतही एटीएम बंदच; आष्टीकरांची पैशांसाठी धावपळ

### शनिवार रविवार सोमवारची सुट्टी ठरली ग्राहकांसाठी अडचणीची

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी हे तालुक्याचे प्रमुख ठिकाण असतानाही शहरातील दोन्ही एटीएम केंद्रे बंद असल्याने ग्राहकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. सणासुदीच्या काळात रोख पैशांची गरज वाढलेली असताना शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही एटीएम सेवा ठप्प राहिल्याने नागरिकांची गैरसोय झाली.




रोख रक्कम काढण्यासाठी एटीएम केंद्रांवर गेलेल्या ग्राहकांना पैसे न मिळाल्याने रिकाम्या हाताने परतावे लागले. काही नागरिकांना तातडीने पैशांची गरज असतानाही एटीएम बंद असल्याने शहरातील इतर भागात धावपळ करावी लागली. ग्रामीण भागातून विविध कामांसाठी आष्टीत येणाऱ्या नागरिकांनाही याचा फटका बसला.

तालुक्याचे ठिकाण असलेल्या आष्टी शहरात बँकिंग सेवा सुरळीत उपलब्ध असणे अपेक्षित आहे. मात्र दोन्ही एटीएम एकाचवेळी बंद असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. एटीएम बंद ठेवण्याचे कारण बँक प्रशासनाने स्पष्ट करावे आणि सेवा चोवीस तास उपलब्ध करून द्यावी अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे.

## सिंदीत नंदीच्या पाठीवर सजली संस्कृतीची झलक; तीन हजार चिमुकल्यांनी गाजविला तान्हा पोळा

### सामाजिक संदेश देणारे देखावे ठरले आकर्षण

### ३०० बाल नंदीधारकांचा पुरस्काराने गौरव

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** बैलपोळ्याच्या परंपरेतून शेतकरी आणि बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या विदर्भविख्यात तान्हा पोळ्याला सिंदी रेल्वे येथे चिमुकल्यांच्या उत्साहाची रंगत आली. तान्हा पोळा कृती समितीच्या वतीने सलग बाविसाव्या वर्षी आयोजित बाल तान्हा पोळा महोत्सवात तब्बल तीन हजार नंदीधारक सहभागी झाले. जुन्या पोलीस ठाणा परिसरात शुक्रवारी दुपारी तीन ते सात या वेळेत झालेल्या महोत्सवाने संपूर्ण परिसर भक्ती आणि उत्साहाने दुमदुमला.



यंदाच्या तान्हा पोळ्यात चिमुकल्यांनी केवळ नंदी सजविले नाहीत तर समाजाला विचार करायला लावणारे संदेशही दिले. शेतकरी आत्महत्या शेतमालाचे घटते बाजारभाव कर्जमाफी पावसाचा खंड वृक्षसंवर्धन अंधश्रद्धा आतंकवाद पेपरफुटी यासह विविध विषयांवरील जिवंत देखावे लक्षवेधी ठरले. स्वातंत्र्यवीर सैनिक भारतरत्न विविध धर्मांचे देवी देवता आणि श्रावणबाळाच्या वेशभूषेने बालगोपालांनी संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

सजवलेला नंदी आणि फॅन्सी ड्रेस अशा दोन गटांत स्पर्धा घेण्यात आली. परीक्षक मंडळाने निवडलेल्या ३०० बाल नंदीधारकांना शैक्षणिक साहित्य आणि विशेष भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सहभागी चिमुकल्यांना रजिस्टर कंपास किट रंगकाड्या आणि बिस्किटांचा समावेश असलेल्या दोन हजार पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाला आमदार मोहन मते राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी तान्हा पोळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

#### नंदी सजवताना संस्कारांची पेरणी

तान्हा पोळ्याच्या माध्यमातून चिमुकल्यांनी परंपरा जपत सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले. त्यामुळे यंदाचा तान्हा पोळा केवळ उत्सव न राहता संस्कार आणि सामाजिक जागृतीचा सोहळा ठरला.

## तान्हा पोळ्यात डीजेचा दणदणाट महागात

### ध्वनी प्रदूषण नियमांची पायमल्ली करणाऱ्या मंडळांसह डीजे मालकांवर गुन्हे

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** तान्हा पोळा उत्सवात ध्वनी प्रदूषणाच्या नियमांची पायमल्ली करणाऱ्या मंडळांसह डीजे मालकांवर सिंदी रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. डीजेचा निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाज तसेच बंदी असलेल्या लेझर लाईटचा वापर केल्याचे तपासणीत आढळून आले. याप्रकरणी डीजे जप्त करण्याची कारवाईही केली जाणार आहे.

तान्हा पोळ्यापूर्वी पोलिसांनी सर्व मंडळे आणि डीजे चालकांची बैठक घेऊन ध्वनी प्रदूषण टाळण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनी लेझर लाईट वापरावर प्रतिबंधात्मक आदेश काढला होता. तसेच पोलिस अधीक्षकांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी आदेश जारी केले होते.

उत्सवाच्या दिवशी पोलिसांच्या पथकाने प्रत्येक मंडळाजवळ जाऊन डेसिबलची तपासणी केली. काही मंडळांनी नियमांचे पालन केले. मात्र काही ठिकाणी कानठळ्या बसविणारा आवाज आणि लेझर लाईटचा वापर आढळून आल्याने पंचनामे करण्यात आले. या प्रकरणी साई केजीएन डीजेचे मालक सौरभ नेवारे, अमेरिकन मंडळाचे पदाधिकारी सिद्धार्थ डंभारे, चांदतारा धुमाल डीजेचे मालक सोनू बघेल, गणेश दुम्पलवार, गुरुनानक धुमाल पार्टीचे मालक करण बावणे, भोई समाज मित्र परिवाराचे पदाधिकारी अजय बावणे, लष्कर धुमाल डीजेचे मालक मोहम्मद अबरार, मित्र परिवारचे मिलिंद बेलखोडे, सूरज काटोले यांच्यासह इतर मंडळांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध कलमांसह ध्वनी प्रदूषण नियमांतर्गत कारवाई केली आहे. यापुढे कोणत्याही धर्माच्या उत्सवात अथवा खासगी कार्यक्रमात ध्वनी प्रदूषणाचे नियम मोडल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## धुर्वे कुटुंबीयांच्या मागण्यांचा प्रस्ताव शासन दरबारी

### २५ लाखांची मदत आणि कंत्राटी नोकरीसाठी वरिष्ठांकडे प्रस्ताव

**वर्धा जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रायपूर परिसरात भगवान चंद्रभान धुर्वे यांच्यावर वन्यप्राण्याने केलेल्या हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत वन विभागाने पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली. कुटुंबीयांना अंत्यसंस्कारासाठी तातडीची मदत म्हणून २५ हजार रुपये देण्यात आली असून ग्रामस्थांच्या विविध मागण्यांचा प्रस्ताव शासन दरबारी पाठविण्यात आल्याची माहिती बोर अभयारण्याचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांनी दिली.



धुर्वे यांच्यावर नेमक्या कोणत्या प्राण्याने हल्ला केला हे स्पष्ट करण्यासाठी शवविच्छेदन करण्यात आले. मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यासाठी अधिकारी घटनास्थळी पोहोचले असता ग्रामस्थांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. सुरुवातीला २५ लाख रुपये आर्थिक मदत आणि कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याची मागणी किंवा नोकरी देता येत नसेल तर एक करोड रुपये मदत जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली होती,

कुटुंबीयांना दहा लाख रुपयांचा धनादेश देण्यासाठीही अधिकारी घटनास्थळी गेले होते. मात्र मागण्यांवर ग्रामस्थ ठाम राहिले. शासन निर्णयानुसारच आर्थिक मदत आणि पुढील कार्यवाही करता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. आर्थिक मदत आणि कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्याचा प्रस्ताव वरिष्ठ विभागाकडे पाठविण्यात आला असून त्याबाबत लिखित आश्वासन देण्यात आले आहे.

दरम्यान मृतकाच्या घरावर वन विभागाने नोटीस लावली आहे. त्यात २५ लाखांची मदत आणि कंत्राटी नोकरीच्या प्रस्तावाचा उल्लेख आहे. पत्रकार परिषदेला एसडीओ कुश मोटवणी यांच्यासह वन विभाग आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'ब्रिक्स' अध्यक्षपदाचे सुवर्णपर्व

जागतिक राजकारणात जुन्या व्यवस्था कमकुवत होत असताना नव्या व्यवस्थेचा आकार अद्याप स्पष्ट झालेला नाही. अमेरिकेचे आर्थिक आणि सामरिक वर्चस्व कायम असले, तरी त्याला पूर्वीसारखी निर्विवाद मान्यता राहिलेली नाही. चीनने आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर स्वतंत्र प्रभावक्षेत्र उभे केले. रशिया निर्बंधांना तोंड देत राजकीय जागा टिकविण्याचा प्रयत्न करीत आहे. भारतानेही अस्थिर कालखंडात विकास दर उंचावत जागतिक स्थान भक्कम केले. दुसरीकडे पश्चिम आशियातील संघर्षाने ऊर्जा आणि व्यापारमार्ग पुन्हा अस्थिर केलेत. जागतिक व्यापारात संरक्षणवाद, संकुचिततावाद वाढत आहे. संयुक्त राष्ट्रांसह बहुपक्षीय संस्थांच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अशा अस्थिर व बिकट काळात दिल्लीमध्ये 'ब्रिक्स' संघटनेची १८ वी शिखर परिषद पार पडत असून, त्याकडे जगाचे लक्ष लागले आहे.ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या वेगवान अर्थव्यवस्थांसाठी वापरला गेलेला 'ब्रिक' हा शब्द पुढे प्रत्यक्ष राजनैतिक व्यासपीठात बदलला. दक्षिण आफ्रिकेच्या प्रवेशानंतर त्याचे 'ब्रिक्स' झाले. इजिप्त, इथिओपिया, इराण, यूएई आणि इंडोनेशियाच्या समावेशामुळे ब्रिक्सची व्याप्ती वाढली. या संघटनेच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण होत असताना जागतिक राजकारण आणि अर्थकारण बदलण्याची क्षमता असणारे दिग्गज नेते 'ब्रिक्स प्लस'च्या स्वरूपात भारतामध्ये एकत्रित येताहेत. २०२३ मध्ये जी-२० संघटनेच्या शिखर परिषदेत असाच योग जुळून आला तेव्हा 'आफ्रिकन महासंघा'ला या बलाढ्य संघटनेमध्ये समाविष्ट करून भारताने मास्टरस्ट्रोक लगावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेचा मुख्य आशय 'लवचिकता,नवोपक्रम, सहकार्य आणि सातत्य' असा आहे. 'मानवता प्रथम' या दूरदर्शी दृष्टिकोनासह परिषद होत आहे. ११ पूर्णवेळ सदस्य, १० सहयोगी देशांच्या या संघटनेच्या अध्यक्षपदाद्वारे भारत विकसनशील राष्ट्रांच्या प्राधान्यक्रमांना दिशा देताना स्वतःला निर्णायक जागतिक शक्ती म्हणून स्थापित करत पुढे जात आहे. २००६ मध्ये संघटनेच्या स्थापनेनंतर 'ब्रिक्स'चा प्राथमिक उद्देश जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा आवाज बुलंद करणे हा होता.आज ब्रिक्स प्रभावशाली आणि शक्तिशाली आर्थिक ब्लॉक बनला आहे. ही संघटना जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ४९.५ टक्के भागाचे प्रतिनिधित्व करते, तर जागतिक जीडीपीमधील तिचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक आहे. यंदा परिषदेसाठी भारताने जे प्राधान्यक्रम अधोरेखित केलेत ते विकसनशील जगाच्या आर्थिक, सामाजिक हितांचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वामुळे निर्माण होणारे धोके आणि विनिमय दरातील चढ-उतारांचा सामना करण्यासाठी स्थानिक चलनांमध्ये व्यापाराला प्रोत्साहन देणे हा यावेळचा प्रमुख अजेंडा आहे. भारताने यूएईसोबत स्थानिक चलन व्यवहार प्रणाली सुरू केली आहे. या व्यवस्थेच्या विस्तारामुळे सीमापार व्यवहारांमधील खर्च कमी होईल आणि लहान व मध्यम उद्योगांसाठी व्यापार सोपा होईल. ब्रिक्स देशांमध्ये मजबूत,लवचिक आणि पारदर्शक पुरवठा साखळी निर्माण करण्याचे भारताचे लक्ष्य आहे. न्यू डेव्हलपमेंट बँकेची व्याप्ती वाढवून हरित ऊर्जा आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांत गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट आहे. यूपीआयला ब्रिक्स देशांमध्ये आर्थिक समावेशनासाठी सामायिक रचना म्हणून भारत सादर करत आहे.'एआय'च्या सुरक्षित, नैतिक, जबाबदार वापरासाठी धोरणे बनवणे हादेखील प्राधान्यविषय आहे. 'ब्रिक्स'चे अध्यक्षपद भूषवताना भारतासमोर आव्हानेही आहेत. संघटनेमध्ये इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब आमिराती आहेत. त्यांचे परस्पर संबंध संवेदनशील आहेत. मे २०२६ मध्ये ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत मतभेदांमुळे सामायिक घोषणापत्रावर एकमत होऊ शकले नव्हते. गेल्या चार दिवसांत तर आखातात वातावरण स्फोटक बनले आहे. इराण समर्थक हौथी बंडखोरांचा लाल समुद्रातील भागावर कब्जा, सौदीवरील हल्ले यामुळे नवी ठिणगी पडली आहे. या देशांना भारत एका राजकीय मंचावर कसे एकत्र आणणार आणि सामूहिक घोषणापत्रावर सहमती कशी घडवून आणणार हे महत्त्वाचे आहे. २०२३ मध्ये जी-२० चा अध्यक्ष असताना भारताने सामूहिक सहमतीबाबत दाखवलेले कौशल्य जगाला अचंबित करणारे ठरले होते. त्यातून जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उजळली. त्याच कौशल्याची पुनर्झलक भारताला दाखवता आली, तर अमेरिकेसह पश्चिमी जगासाठी तसेच पाकिस्तान, तुर्कीयेसाठी तो मोठा धक्का असेल.परिषदेसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन भारतात आलेत. संयुक्त राष्ट्राचे महासचिव, 'एनडीबी'चे अध्यक्ष, जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक, एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँकेचे अध्यक्ष, इराणचे राष्ट्राध्यक्ष, यूएईचे सुलतान यांसह २६ देशांचे शीर्षस्थ नेते आलेत. चीनचे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग येत आहेत. जागतिक नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकाही होतील. सात वर्षांनंतर होणाऱ्या पंतप्रधान मोदी आणि जिनपिंग यांच्या द्विपक्षीय चर्चेला अधिक महत्त्व आहे. 'ब्रिक्स'मध्ये रशिया, चीन आणि भारत हे मुख्य खेळाडू आहेत. या तिघांमधील मैत्री जितकी घट्ट तितकी 'ब्रिक्स'ची उद्दिष्टपूर्तीची वाट सुकर, असे समीकरण आहे. ब्रिक्स देशांसोबत भारताचा एकूण द्विपक्षीय व्यापार २०२५-२६ मध्ये सुमारे ४१६ अब्ज डॉलरवर पोहोचू शकतो. भारताची एकूण आयात ३२० अब्ज डॉलर आहे. तर निर्यात ९६ अब्ज डॉलर आहे. २२४ अब्ज डॉलरची व्यापारतूट हे भारतासाठी आव्हान आहे. चीनसोबत भारताची व्यापारतूट १०० अब्ज डॉलर आहे; तर रशियासोबत ५५ अब्ज डॉलर आहे.परिषदेत आर्थिक करारांतून भारताची ब्रिक्स देशांना होणारी निर्यात २०३० पर्यंत दुप्पट होऊन २०० अब्ज डॉलरवर पोहोचू शकेल. 'जीटीआरआय'च्या मते, भारताने चीन, रशिया आणि इंडोनेशियासारख्या बाजारपेठांमध्ये चांगली पकड निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. बिगरटॅरीफ अडथळे कमी करणे, उच्च मूल्याच्या उत्पादनांची निर्यात वाढवणे आणि काही मोजक्या ब्रिक्स देशांवरील आयातीचे अवलंबित्व कमी करण्याची गरज आहे. याखेरीज भारतात गुंतवणूक आणि पर्यटनाच्या नव्या शक्यता पुढे येतील. तसे झाल्यास हे अध्यक्षपद भारतासाठी सुवर्णपर्व ठरेल. नवोपक्रम, आयटी सेवा आणि स्टार्टअप परिसंस्थेत भारत ब्रिक्स देशांचे नेतृत्व करत आहे. परिषदेतून भारत ब्रिक्सला सर्वसमावेशक विकास, गरिबी निर्मूलन, नवोपक्रम, शाश्वत विकासावर केंद्रित असणाऱ्या आर्थिक सुधारणावादी मंचाच्या रूपात पुढे नेण्याचा प्रयत्न करेल. 'ब्रिक्स'ला पश्चिमेचा प्रतिस्पर्धी बनविण्यापेक्षा जागतिक व्यवस्थेतील असमतोल दुरुस्त करणारे व्यासपीठ बनवण्याचा भारताचा प्रयत्न 'वसुधैव कुटुम्बकम' या तत्त्वाशी सुसंगत आहे.

## सरकारी फसवेगिरीच्या चक्रात महाराष्ट्र

महाराष्ट्र आज संकटात आहे आणि या संकटांची तीव्रता वाढत असताना राज्य सरकार मात्र सत्तेच्या अहंकारात मश्गूल आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पहात बसला आहे, विद्यार्थी न्याय आणि परीक्षेतील पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरले आहेत, आदिवासी आपल्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करत आहेत, मराठा आणि धनगर समाज आरक्षणाच्या प्रलंबित प्रश्नासाठी आंदोलन करत आहेत, तर बेरोजगारी, महागाई आणि कर्जबाजारीपणाने सामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक घटक आज प्रश्न विचारत रस्त्यावर उतरला आहे; पण सत्ताधाऱ्यांकडे उत्तर नाही. प्रश्न सोडवण्याऐवजी समित्या, बैठका आणि आश्वासनांचा खेळ सुरू आहे; जनतेचा आवाज ऐकण्याऐवजी आंदोलने दडपण्याचा मार्ग स्वीकारला जात आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रातील संकटे केवळ नैसर्गिक, आर्थिक किंवा सामाजिक राहिलेली नाहीत; ती सरकारच्या निष्क्रियतेने आणि संवेदनाहीन कारभाराने अधिक गंभीर बनली आहेत.

**लोकशाहीत बहुमत कितीही मोठे असले तरी जनता त्याहून मोठी असते. आज सरकारने जनतेचा आवाज ऐकला नाही, तर उद्या जनता सरकार बदलेल. कारण लोकशाहीत जनता मालक असते याचे भान सत्ताधाऱ्यांनी ठेवावे.**

### दुष्काळात होरपळतोय महाराष्ट्र

भर पावसाळ्यात महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. मराठवाडा, विदर्भ, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश तालुक्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे. नदी-नाले कोरडे पडले आहेत. खरीप पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. बहुवार्षिक फळबागा धोक्यात आल्या आहेत. जनावरांसाठी चारा आणि माणसांसाठी पिण्याचे पाणी हा गंभीर प्रश्न बनत आहे. रब्बी हंगामाची शाश्वती नाही. शेतकऱ्याने बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी यावर केलेला खर्च वसूल होईल की नाही, याची चिंता त्याला सतावत आहे. कर्जमाफीच्या घोषणांचा गाजावाजा झाला; मात्र प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला, हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या घोषणा आणि दुसरीकडे त्याच्या उत्पादन खर्चाची भरपाई न होण्याची परिस्थिती, ही विसंगती सरकारच्या कृषी धोरणाचे अपयश अधोरेखित करते. दुष्काळाच्या या संकटाला फक्त 'निसर्गाचा कोप' म्हणून झटकून टाकता येणार नाही. दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यावर सरकार व प्रशासनाने तातडीने पाणी, चारा उपलब्ध करून का दिले नाही, दुष्काळी उपाययोजना का केल्या नाहीत? हा खरा प्रश्न आहे.



### विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

शेतकऱ्यांनंतर सर्वाधिक अस्वस्थता विद्यार्थ्यांमध्ये आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विविध स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, निकालातील गोंधळ आणि प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर यांसह राज्यातील विविध शहरांमध्ये विद्यार्थी सातत्याने आंदोलने करत आहेत. औषध निरीक्षक परीक्षेच्या पेपरफुटीप्रकरणी गुन्हे दाखल झाले असले तरी या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न अजूनही कायम आहे. एखाद्या परीक्षेचा पेपर फुटणे म्हणजे केवळ एका परीक्षेतील गैरप्रकार नाही; तो मेहनत, गुणवत्ता आणि स्पर्धात्मक व्यवस्थेवरील विश्वासाचा भंग असतो. आयोगाच्या अध्यक्षांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच पेपर फुटल्याचे सांगितले, पण त्यांच्या कार्यकाळात पेपरफुटीची तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना पेपरफुटीचे पुरावे दोषी अधिकाऱ्यांकडे देण्यास सांगणे हा त्याहून अधिक गंभीर प्रकार आहे. आयोग चोरीच्या प्रकरणाचा तपास दरोडेखोराकडे देत असेल तर निष्पक्ष तपासाची अपेक्षा कशी करायची?

पुण्यात एमपीएससीची तयारी करणारा धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थी प्रथमेश देशमुख याच्या आत्महत्येच्या घटनेने विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता आणि त्यांच्या भवितव्यापुढील प्रश्न किती गंभीर झाले आहेत, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील अनागोंदी, पारदर्शकतेचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे विद्यार्थ्यांवर निर्माण होणारा मानसिक आणि सामाजिक ताण चिंताजनक आहे. ही काही एकमेव घटना नाही; राज्याच्या विविध भागांतून विद्यार्थ्यांच्या अस्वस्थतेच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. सरकारने आता संवेदनशीलतेने आणि तातडीने परीक्षा व भरती प्रक्रियेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करणे गरजेचे आहे.

### प्रश्न सुटला नाही, संघर्ष मात्र वाढला

आरक्षणाच्या प्रश्नावर मराठा आणि धनगर समाजाची फसवणूक करून, राजकीय फायद्यासाठी मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष उभा करण्याचे पाप राज्य सरकारने केले आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील आता अकराव्यांदा आंदोलनाला बसले आहेत. प्रत्येक वेळी सरकारचे मंत्री आणि प्रतिनिधी चर्चेसाठी जातात, मागण्या मान्य केल्याचे सांगतात, शासन निर्णय काढले जातात, आंदोलन स्थगित होते आणि काही काळाने पुन्हा आंदोलन सुरू होते. सरकारची आश्वासने प्रामाणिक असतील, तर पुन्हा पुन्हा आंदोलनाची वेळ का येते? सगेसोयरे आणि हैदराबाद गॅझेटसारख्या मुद्द्यांवर सरकारने नेमकी किती प्रगती केली, किती लोकांना प्रत्यक्ष लाभ मिळाला याची आकडेवारी सरकार जाहीर का करत नाही? जरांगे-पाटील आंदोलनाला बसले की त्यांच्या पायाजवळ बसून, विनवणी करणारे मंत्री-नेते आता त्यांनाच आव्हान देत आहेत. सरकारचे शिष्टमंडळ चर्चेसाठी जाणार नाही, अशी भूमिका घेऊन निवडणुका झाल्यानंतर 'आता तुमची गरज नाही' असा संदेश मराठा समाजाला दिला जात आहे. सत्तेत आल्यानंतर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षणाचा प्रश्न सोडवणार, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. त्या आश्वासनाला १२ वर्षे झाली. या काळात त्यांनी तीन वेळा मुख्यमंत्री आणि एकदा उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली; मात्र धनगर आरक्षणाचा प्रश्न आजही 'जैसे थे' आहे. मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षाचा राजकीय फायदा झाल्याने सरकारला आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याऐवजी जातीय संघर्ष चिघळत ठेवण्यात जास्त रस आहे असे दिसते.

महाराष्ट्रातील जनतेचा संयम आता संपत चालला आहे. शेतकरी, विद्यार्थी, आदिवासी, मराठा, धनगर, बेरोजगार तरुण अशा सर्व घटकांना आपल्या हक्कांसाठी वारंवार रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ते सरकारच्या निष्क्रिय, बेजबाबदार आणि असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. जातीय, धार्मिक संघर्ष निर्माण करून सरकारला मूळ प्रश्नांपासून पळ काढता येणार नाही, आंदोलने दडपून जनतेचा आवाज दाबता येणार नाही. कारण लोकशाहीत बहुमत कितीही मोठे असले तरी जनता त्याहून मोठी असते. आज सरकारने जनतेचा आवाज ऐकला नाही, तर उद्या जनता सरकार बदलेल. कारण लोकशाहीत जनता मालक असते याचे भान सत्ताधाऱ्यांनी ठेवावे.

**- ॲड. श्रीनिवास बिक्कड**

## ब्रिक्स परिषदेतून जगाला नवा संदेश

नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला आणि विशेषतः पाश्चात्य देशांना एक स्पष्ट आणि नवा संदेश दिला आहे. 'आम्ही कोणाच्याही विरोधात नाही,' असे म्हणत त्यांनी भारताचा 'जन-केंद्रित' आणि 'मानवतेला प्राधान्य' देणारा दृष्टिकोन जगासमोर मांडला. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या मंचावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक अर्थव्यवस्थेला आणि व्यापारी जगताला महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे. ब्रिक्स बिझनेस फोरमच्या सत्राला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी सुरक्षित सागरी आणि पुरवठा मार्ग यावर स्पष्ट भूमिका मांडली.संरक्षणवाद, एकतर्फी निर्बंध आणि आर्थिक दबावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेसमोर मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. यावर मात करण्यासाठी सुरक्षित सागरी वाहतूक मार्ग आणि लवचिक पुरवठा साखळी असणे अत्यंत आवश्यक आहे ,असे त्यांनी स्पष्ट केले.२००६ मध्ये केवळ ४ देशांसह सुरू झालेल्या ब्रिक्स समूहाचा परिवार आता सदस्य आणि भागीदार देश मिळून २१ देशांपर्यंत पोहोचला असून, या समूहाने जगाला एक नवा आर्थिक आशावाद दिला आहे, असे मोदी म्हणाले. 'ब्रिक्स'मध्येही व्यापारातील अडथळे कमी करून उद्योगांसाठी अधिक संधी निर्माण करण्याची भारताची डिजिटल व्यवहार जगातील ब्रिक्स देशांमधील शीर्ष १० व्यापार बाधा दूर करण्यासाठी आणि दरवर्षी १०० स्टार्टअप्सना एकात्मिक बाजारपेठेत विस्तारण्यास मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले.पंतप्रधान मोदींनी नमूद केले की, भारतात आज २ लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत स्टार्टअप्स आणि १२० हून अधिक युनिकॉर्न्स आहेत, ज्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा फायदा पूर्ण ब्रिक्स समूहाला होऊ शकतो,बिझनेस कौन्सिलसमोर तीन प्रमुख उद्दिष्टे ठेवली आहेत.ब्रिक्स देशांमधील व्यापार अधिक सुलभ करण्यासाठी आणि आयात-निर्यातीमधील गैर-टॅरिफ अडथळे दूर करण्यासाठी 'ब्रिक्स बिझनेस कौन्सिल'ने एक विशेष अहवाल तयार करावा. सदस्य देशांमधील स्टार्टअप परिसंस्थेला बळकट करून, दरवर्षी किमान १०० स्टार्टअप्सना इतर ब्रिक्स देशांच्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी थेट मदत केली जावी. ब्रिक्स सदस्य देशांमधील उद्योगांमध्ये दरवर्षी १,००० नवीन व्यावसायिक भागीदारी प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट त्यांनी ठेवले आहे.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,**
९५६१५९४३०६

## महाराष्ट्रातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण

आत्महत्या ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना नसून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्रात आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः तरुण विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढणारी मानसिक अस्वस्थता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील आकडेवारीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करते. त्यामुळे आत्महत्यांकडे केवळ आकडे म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात आर्थिक अडचणी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांतील ताण, शैक्षणिक दबाव, भविष्यातील अनिश्चितता आणि एकटेपणा यामुळे अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अडचणी आणि आर्थिक अस्थिरता तर शहरी भागात स्पर्धात्मक जीवनशैली व वाढता मानसिक ताण ही चिंतेची कारणे आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. सोशल मीडियामुळेही तरुणांमध्ये स्वतःची इतरांशी तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. इतरांचे यश, आर्थिक स्थिती किंवा जीवनशैली पाहून स्वतःला कमी लेखण्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर आणि प्रत्यक्ष माणसांशी संवाद यांचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे. सरकारने मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याबरोबरच ग्रामीण भागातही समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध घटकांसाठी स्थानिक पातळीवर मदतव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. माध्यमांनीही आत्महत्यांच्या बातम्यांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती कुटुंब, शैक्षणिक संस्था, समाज आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आकडेवारी कमी करण्याबरोबरच त्यामागची कारणे कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माणसांमधील संवाद, आपलेपणा आणि आधार वाढला तर अनेक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीला तिच्या अडचणींमध्ये एकटे पडू न देणे, हाच आत्महत्या प्रतिबंधाचा खरा सामाजिक मार्ग आहे.

- श्याम ठाणेदार

संवाद

## 'वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ल्याची पंचवीशा

अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील अतिरेकी हल्ल्याला नुकतीच पंचवीस वर्षे(११ सप्टेंबर २००१) पूर्ण झाली. त्या निमित्ताने या लेखाचा प्रपंच.या भीषण हल्ल्यात सुमारे तीन हजार लोकांना आपले प्राण गमवावे लागले होते.या हल्ल्याचा सूत्रधार,अल कैदा या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन याला शोधून,त्याला कंठस्नान घालण्यासाठी अमेरिकेने नंतर जंग जंग पछाडले.ओसामा बिन लादेन हा अफगाणिस्तानमध्ये लपून बसल्याच्या संशया वरून अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला करून अफगाणिस्तान बेचिराख करून टाकले.त्या ओसामा बिन लादेन बाबत थोडक्यात माहिती घेऊया.

जगातील सुपर पॉवर मानल्या जाणाऱ्या अमेरिकेशी पंगा घेणारा आणि आपल्या देशाची सुरक्षा यंत्रणा एखादी मुंगीही भेदू शकणार नाही,असा गर्व बाळगणाऱ्या, अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर भीषण हल्ला करून, अमेरिकेला हादरवणारा ओसामा बिन लादेन हा नक्की कोण होता,ते आता थोडक्यात पाहूया.ओसामा बिन मोहंमद बिन अवाद बिन लादेन याचा जन्म १९५५ साली सौदी अरेबिया मध्ये झाला.त्याचे वडील मोहंमद बिन लादेन हे सौदी अरेबियातील एका श्रीमंत कुटुंबातून आले होते.मोहंमद यांच्या हयात असलेल्या २० मुलांमध्ये ओसामा यांचा क्रमांक सतरावा होता. ओसामाचे वडील मोहंमद यांच्या ११ बायका होत्या.



त्यातील बहुतेक सौदी अरेबिया आणि इजिप्त येथील होत्या.ओसामाची आई जी त्याच्या वडिलांची चौथी बायको होती,ती सिरियाची नागरिक होती.ओसामा हा तिचा एकुलता एक मुलगा होता.ओसामाच्या वडिलांनी १९२० मध्ये येमेनमधून सौदी अरेबियात स्थलांतर केले होते.त्यांनी एका बांधकाम कंपनीची स्थापना करून नंतर मोठे औद्योगिक साम्राज्य उभे केले होते.सौदी अरेबियाचे तत्कालीन राजे अब्दुल अझीझ यांच्याशी ओसामाच्या वडिलांची चांगलीच दोस्ती होती.

सुरूवातीला ओसामाने राजकारणात कोणतेही स्वारस्य दाखवले नव्हते.पण १९८० साली त्याने पाकिस्तानचा दौरा केल्यानंतर त्याच्यात फार मोठा बदल झाला.त्यानंतर पुढील चार वर्षांत त्याने संपूर्ण सौदी अरेबिया पालथा घातला.या भटकंतीमध्ये त्याने जिहादसाठी लाखो डॉलर्स जमा केले.त्यानंतर तो पेशावर येथे स्थायिक झाला.आपल्या भटकंती मध्ये त्याने जो प्रचंड पैसा उभा केला त्यातील बराचसा पैसा त्याला सौदी अरेबियन सरकारकडून मिळाला होता.११ सप्टेंबर २००१ रोजी अतिरेक्यांनी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला केला होता.त्यानंतर ९ नोव्हेंबर २००१ रोजी कंदाहार येथील गेस्ट हाऊसमध्ये आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून लादेनने जे भाषण केले होते त्याचा व्हिडिओ टेप पेंटॅगॉनने नंतर रिलीज केला होता.हा व्हिडिओ टेप अमेरिकेने कुठून मिळवला हा प्रश्न अनुत्तरितच राहिला.

विमानातील गॅसच्या आगी मुळे इमारतीचे लोखंडी स्ट्रक्चर वितळेल आणि विमानाची धडक ज्या भागाला बसेल त्यावरील मजले कोसळतील असा कयास मी बांधला होता,असे लादेनने स्पष्ट केले.लादेन पुढे म्हणाला की ज्या माणसांनी या हल्ल्यात भाग घेतला होता त्या माणसांना आपण एका महत्वाच्या कामगिरीवर जात आहोत याची आगाऊ कल्पना होती.परंतु विमानात प्रवेश करे पर्यंत त्यांना हल्ल्यासंबंधीची समग्र माहिती पुरवण्यात आली नव्हती.

पाकिस्तानातील बोटाबाद येथे वास्तव्यास असलेल्या ओसामा बिन लादेनचा शोध अमेरिकेला कसा लागला, त्याविषयी अनेक शक्यता त्यावेळी वर्तवण्यात आल्या होत्या.लादेन हा ॲबोटाबादमधील ज्या घरात लपून बसला होता,त्या घरापासून पाकिस्तान मिलिटरी ॲकॅडेमीचे कार्यालय एकदम जवळ होते.त्यामुळे लादेन तेथे लपला असल्याची माहिती पाकिस्तानी लष्करा ला नव्हती,यावर कुणीच विश्वास ठेवला नसता.या उलट पाकिस्तानी लष्कराच्या संरक्षणाखाली, लादेन तेथे वास्तव्य करत होता,यावर विश्वास ठेवणे सहज शक्य होते.

या पार्श्वभूमीवर लादेन हा ॲबोटाबाद मधील एका घरात रहात असल्याची माहिती पाकिस्ताननेच अमेरिकेला दिली असावी आणि त्यानंतर पाकिस्तानशी संगनमत करून अमेरिकेने एका मोहिमे अंतर्गत लादेनला ठार मारले असावे.ज्या ठिकाणी लादेन वास्तव्य करत होता त्या ठिकाणाची माहिती पाकिस्ताने उघडपणे अमेरिकेला दिली असती तर पाकिस्तान मधील जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असता.कारण पाकिस्तान मधील जनतेला सर्वसाधारणपणे लादेन बाबत प्रचंड सहानुभूती होती.पाकिस्तानने त्या मुळेच लादेनच्या ठावठिकाण्या बाबतची माहिती गुप्तपणे अमेरिकेला पुरवली असावी आणि त्यानंतर अमेरिकेने लादेन विरोधातील मोहीम राबवली असावी. थोडक्यात,अमेरिकन नेव्ही सिल्सनी लादेन रहात असलेल्या ॲबोटाबाद मधील घरावर हल्ला करून त्याला ठार मारण्याची केलेली कारवाई, पाकिस्तान बरोबर संगनमत करूनच केली असावी असाच निष्कर्ष त्यातून काढावा लागेल.अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील अतिरेकी हल्ल्याला पंचवीस वर्षे पूर्ण होत असताना,त्या हल्ल्याचा सूत्रधार असलेल्या लादेनचा मागोवा घेण्यासाठी हा प्रपंच होता.

**अभय गोखले**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# आरक्षणासाठी उमरखेड येथून मुंबईकडे हजारोंचा एल्गार!

## मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला तालुक्यातून भक्कम पाठिंबा, मागण्या तातडीने मान्य करण्याची शासनाकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १३ : प्रतिनिधी मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला उमरखेड तालुक्यातून जोरदार पाठिंबा मिळत असून, मुंबईतील आंदोलनात तालुक्यातून हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मराठा आंदोलकांनी केले आहे. शासनाने मागण्यांकडे आणखी दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही पत्रकार परिषदेत देण्यात आला.**



स्थानिक विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत आंदोलकांनी शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाच्या जुन्या नोंदींची अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांना वैधता द्यावी, तसेच शिंदे समितीचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मागील आंदोलनादरम्यान समाजातील तरुणांच्या भवितव्याचा विचार करून जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलन मागे घेतले होते. मात्र, मागण्या अद्याप प्रलंबित असल्याने पुन्हा आंदोलनाची वेळ आली असल्याचे आंदोलकांनी सांगितले. अंतरवाली सराटी येथील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी उमरखेड तालुक्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव रवाना होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उमरखेड बंदला व्यापारी व विविध समाजबांधवांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आंदोलकांनी आभार मानले. मराठा महिलाही आंदोलनात सक्रियपणे सहभागी होणार असून, आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधी व सत्ताधाऱ्यांच्या निवासस्थानी जाऊन हळदी-कुंकू आंदोलन करण्याची भूमिका महिलांनी मांडल्याचे सांगण्यात आले. यावेळी सरोज देशमुख, प्रमोद देशमुख, गणराज कदम, दिनेश रावते, शुभम माने, चॉंदराव सुरोशे, गजानन कोल्हे, सचिन घाडगे, आनंद शिंदे, अभय पवार, अरुण ठाकरे, गजानन जाधव, अंकुश मिराशे, अमोल मिराशे, श्रीकांत धाबे, गजानन वटाणे यांच्यासह तालुक्यातील मराठा बांधव उपस्थित होते.

# तीन एकरांची शेती अन् डोळ्यांत डॉक्टर होण्याचे स्वप्न!


## तीस वर्षांचा संघर्ष व शिक्षणाच्या बळावर दुर्योधन जाधव यांनी घडविले मुलींचे भविष्य


✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** परिस्थितीने हात आखडता घेतला, उत्पन्नाची साधने मर्यादित होती. मात्र मुलांच्या स्वप्नांना मर्यादा घालण्यास एका शेतकरी वडिलांनी नकार दिला. घाटंजी तालुक्यातील भाबोरा येथील दुर्योधन शेरसिंग जाधव यांनी केवळ तीन एकर शेती, तीस वर्षांची नोकरी आणि अथक मेहनतीच्या जोरावर आपल्या दोन मुलींना वैद्यकीय शिक्षणाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचविले.

त्यांचा हा प्रवास आज कष्टकरी पालकांसाठी प्रेरणेचा दीप ठरत आहे. शेरसिंग जाधव यांच्या कुटुंबाने उदरनिर्वाहासाठी अनेक ठिकाणी स्थलांतर केले. अंजी येथे कष्ट करून साठविलेल्या पैशांत तीन एकर शेती घेतली आणि परिस्थितीमुळे पहूर येथे स्थायिक झाले. दुर्योधन यांनी दिग्रस येथे पदवीपर्यंत शिक्षण घेतले. मात्र शिक्षणानंतर नोकरीची शाश्वती नव्हती. अशावेळी पहूर येथील उद्योजक दीपचंद राठी यांच्या विश्वासामुळे त्यांना यवतमाळ येथे रोजगाराची संधी मिळाली. मिळालेल्या संधीचे सोने करत दुर्योधन यांनी तब्बल तीस वर्षे प्रामाणिकपणे नोकरी केली. नोकरीसोबत शेतीची जबाबदारीही सांभाळत त्यांनी स्वतःच्या सुखसोयींपेक्षा मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. मोठी मुलगी डॉ. श्वेता जाधव हिने नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकारले. दुसरी मुलगी स्नेहा जाधव जळगाव येथे वैद्यकीय शिक्षण घेत असून ती सध्या द्वितीय वर्षात आहे. मुलगा अंशही शिक्षण घेत आहे. ज्यांच्या घरात पैशांपेक्षा कष्टाची श्रीमंती होती, त्या दुर्योधन जाधव यांनी मुलींच्या शिक्षणात कधीही तडजोड केली नाही. तीन एकरांच्या मातीत घाम गाळणाऱ्या बापाने मुलींच्या हातात शिक्षणाची ताकद दिली आणि त्या ताकदीने घराचे भविष्यच बदलून टाकले. सामाजिक बांधिलकी जपत सुख-दुःखात धावून जाणाऱ्या जाधव यांचा संघर्ष आज अनेक शेतकरी पालकांना सांगतो— परिस्थिती गरीब असली तरी स्वप्ने कधीही गरीब नसावीत.





सजली आरास, वाढली भक्तांची उत्सुकता; सोमवारी विराजमान होणार लाडका गणराया!

## थोडक्यात

### बुद्धिबळ स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलची चमकदार कामगिरी



**महागाव:** बुद्धिबळ स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलची चमकदार कामगिरी अक्षित राहुल पवार व ज्योतीरअदित्य अमोल पवार यांची जिल्हास्तरावर निवड दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल, आमणीच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. शाळेचे विद्यार्थी अक्षित राहुल पवार व ज्योतीरअदित्य अमोल पवार यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर स्पर्धेत विजय मिळवत जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. या दोन्ही विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धेदरम्यान उत्तम एकाग्रता, संयम, बुद्धिमत्ता आणि प्रभावी डावपेचांचे प्रदर्शन केले. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या सचिव वनमालाताई राठोड, मुख्याध्यापक, अभिषेक सुनिल राठोड, क्रीडा शिक्षक मारुती बाभळे व सर्व शिक्षकवृंद, आणि पालकांनी अक्षित राहुल पवार व ज्योतीरअदित्य अमोल पवार यांचे अभिनंदन केले. तसेच आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. "तालुक्यात विजयाची चाल, आता जिल्ह्यावर यशाची मोहर!" प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.



### चिखलीत तान्हा पोळ्याचा जल्लोष..!

**बालगोपालांच्या कलागुणांना मिळाली कौतुकाची थाप**

**चिखली :** शेतकरी संस्कृती आणि ग्रामीण परंपरेची जपणूक करणारा तान्हा पोळा उत्सव चिखली येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मयुर जुमळे यांच्या आयोजनातून व लोकेश दिवे मित्रपरिवाराच्या सहकार्याने झालेल्या या उपक्रमात शेकडो बालगोपालांनी सहभाग घेत नंदीबैल सजावट, आकर्षक वेशभूषा आणि विविध सामाजिक संदेशांतून आपली सर्जनशीलता दाखवून दिली. उत्कृष्ट सादरीकरणासाठी ईशान दुर्वेश उमाटे याला प्रथम क्रमांकाचे स्टडी टेबल, सिद्धेश्वरी सुनील भटकर हिला कॅरम बोर्ड, श्लोक रमण वैरागडे याला क्रिकेट किट, युवांश अशोक ठाकरे याला घोडा, तर आरोही स्वप्निल ठाकरे हिला स्टडी बोर्ड देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्व बालगोपालांना प्रोत्साहनपर पेपर-पॅड देण्यात आले. निरीक्षक अखिलेशराव भिसे व प्रविणराव उमाटे यांच्यासह गोपालराव भटकर, कवडूजी उमाटे, विनायकराव रहाटे, अभयराव पुडके, कांचनताई घायवटे, आबीद शेख आदी मान्यवर उपस्थित होते. परंपरेसोबत सामाजिक जाणीव आणि बालप्रतिभेला व्यासपीठ देणारा हा उपक्रम ग्रामस्थांच्या कौतुकाचा विषय ठरला.

# तान्हा पोळा, बालमनाला भावणारा ग्रामीण संस्कृतीचा उत्सव..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. १३ :** बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा विदर्भातील बालकांचा आवडता आणि पारंपरिक सण आहे. लहान मुलांमध्ये शेती, बैलजोडी आणि ग्रामीण संस्कृतीशी नाते निर्माण व्हावे, तसेच पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या परंपरांचे जतन व्हावे, या उद्देशाने तान्हा पोळ्याला विशेष महत्त्व आहे. हा केवळ बालकांचा खेळ नसून ग्रामीण जीवनशैली, शेतीसंस्कृती आणि बैलांविषयीची कृतज्ञता पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारा सांस्कृतिक वारसा आहे.

बाभुळगावात गेल्या ३३वर्षांची परंपरा कायम राखत रिखब चंद तातेड व मित्र परिवाराच्या वतीने यंदाही आबाजी महाराज मंदिरासमोर तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बालकांचा उत्साह वाढविण्यासाठी तातेड मित्र परिवाराच्या वतीने सहा, तर नगरपंचायतीच्या वतीने सहा, अशी एकूण १२ बक्षिसे ठेवण्यात आली होती. मातीच्या व लाकडी बैलांच्या आकर्षक सजावटीसाठी ही बक्षिसे देण्यात आली. मातीच्या बैलांच्या सजावट विभागात क्रमानुसार आनंदी इंगोले, लावण्या सहारे, अर्णव मंगळे, श्लोक शेंडे, मानस वरखडे आणि शेख आवेश सलीम यांनी बक्षिसे मिळविली. प्रोत्साहनपर बक्षीस शौर्य डडमल व समर्थ बोरकर यांना देण्यात आले.लाकडी बैलांच्या सजावट विभागात मुदल खोडे, हिमांशू होटे, अमूल्य टाके, पूर्वा दंडारे, वंशिका बुरेवार आणि देव चौधरी यांनी बक्षिसे पटकावली. प्रोत्साहनपर बक्षीस कल्याण इंगोले, स्वप्नील वर्भे व शिवांश देशमुख यांना देण्यात आले.प्रकाशचंद छाजेड,भारत इंगोले, रिखबचंद तातेड,अरिफ अली, शहेजाद शेख, राजू नवाडे, दानिश, विजय लोखंडे, अभय तातेड, अक्षय राऊत,अरुण नवाडे, अनिकेत पोहोकार, सुरेश चंद तातेड, सुनील खोडे, रामदास, धरमचंद छल्लाणी, नन्ना महाजन, बंडू नवाडे,दिनेश कांडलकर,रामदास वाटकर,आतिश तातेड, फेमिद भाई,सचिन इंगोले, प्रेम छल्लाणी, मुलतान भाई,चंदू तुरणकर, शाहनवाज अली,आशिष दिघाडे,अंकित खंते,श्रीधर ,प्रदीप नांदुरकर,प्रफुल तातेड, अवसाद अली,मान्यवरच्या हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आले तसेच महिलांनी व प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. गौरव तातेड,अनुराग तुरणकर, प्रणय तातेड, बावणे जयेश, रंजीत तातेड,भन्साळी,महेश तातेड यांनी आयोजन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. या कार्यक्रम दरम्यान विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला. बाभुळगाव शहराचे बिट जमादार विजय लोखंडे, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, करणारे राजू नवाडे व दानिश मोहम्मद,शेतकरी सुरेश इंगोले,तसेच नगरपंचायतीचे गजानन गोटफोडे, ऋषिकेश माहुरे व डॉ. दिव्यांश खोडे यांचा सन्मानचिन्ह व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# पुसद येथे मराठा आरक्षण मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन..!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १३ :** मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत सकल मराठा समाज, पुसद तालुक्याच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दि.११ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन देण्यात आले. निवेदनात मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून त्यांचे उपोषण सोडवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने योग्य कार्यवाही करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि.११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पुसद–यवतमाळ–माहूर रोडवरील सुधाकरराव नाईक चौक परिसरात रास्ता रोको आंदोलन करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने आंदोलनाची तातडीने दखल घेऊन मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात, अन्यथा पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही सकल मराठा समाज पुसद तालुक्याच्या वतीने देण्यात आला आहे.निवेदनावर सकल मराठा समाज पुसद तालुक्यातील शेकडो पदाधिकारी व समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माजी अध्यक्ष अमन गावंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने सुरू झाली असून, बँकेचे माजी अध्यक्ष अमन गावंडे यांनी या निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या या उमेदवारीमुळे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात पुन्हा एकदा राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक ही जिल्ह्यातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा मानली जाते. त्यामुळे या बँकेच्या निवडणुकीत वर्चस्व मिळवण्यासाठी सर्वच गटांची आणि नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. अमन गावंडे यांनी यापूर्वीही या बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे. सहकार क्षेत्रातील आणि बँक प्रशासनाचा त्यांचा हा पूर्वानुभव पाहता, या निवडणुकीत त्यांच्या उमेदवारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची दाट शक्यता असून, इतर इच्छुकांनीही जोरदार मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. त्यातच गावंडे यांनी पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्याने पुढील राजकीय समीकरणांकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पेन्शनरांच्या न्यायासाठी आता मंत्रालयाची दारे ठोठावणार

## प्रफुल्ल मेश्राम यांची मंत्रालय संपर्क प्रमुखपदी नियुक्ती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** राज्यातील निवृत्त जिल्हा परिषद कर्मचारी व पेन्शनरांच्या प्रलंबित प्रश्नांना मंत्रालयीन पातळीवर वाचा फोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रफुल्ल मेश्राम (यवतमाळ) यांची महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी पेन्शन वेल्फेअर असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीने मंत्रालय संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे.

पेन्शन, शासन निर्णयांची अंमलबजावणी, प्रलंबित मागण्या आणि प्रशासकीय अडचणींमुळे राज्यातील अनेक निवृत्त कर्मचारी त्रस्त आहेत. या प्रश्नांना केवळ निवेदने न देता शासनाच्या संबंधित विभागांपर्यंत थेट पोहोचवून त्यांचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी मेश्राम यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सुमारे २५ वर्षांच्या सामाजिक कार्यासह पत्रकारितेतून जनहिताचे प्रश्न सातत्याने मांडल्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली. संघटनेच्या विश्वासाला सार्थ ठरवत पेन्शनरांच्या हक्कांसाठी मंत्रालय स्तरावर आक्रमकपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार मेश्राम यांनी व्यक्त केला. यावेळी हरिभाऊ राऊत, संदीप भोयर, प्रवीण टिके, शंकर कदम, भारत बीतकर व पवन आत्राम उपस्थित होते.

# नाईक बंगल्यासमोर गोरसेनेचे साखळी उपोषण

## १५ दिवसांची मुदत उलटूनही प्रशासनाचा प्रतिसाद नाही

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १३ :** तालुक्यातील विविध विकासकामे व ऐतिहासिक वारशाशी संबंधित सात प्रमुख मागण्यांसाठी गोरसेनेने राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे निवेदन देऊन १५ दिवसांची मुदत दिली होती. मात्र, मुदत उलटूनही प्रशासनाकडून कोणताही लेखी प्रतिसाद मिळाला नसल्याने गोरसेनेने आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या बंगल्यासमोर लोकशाही मार्गाने साखळी उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेने दिली आहे. पुस धरणाच्या बंधाऱ्याला 'वसंत सागर' नाव पुनर्जीवित करणे, कृषी उत्पन्न बाजार समितीला वसंतराव नाईक यांचे नाव देणे, चोंडी येथील स्मारकाच्या जागेला ग्रामपंचायत ठराव देणे, 'नायक काशिनाथ' फलकास मान्यता देणे, भलंगवाडी तलावाचे खोलीकरण, मांजरजवळा-वाघजाळी रस्ता तसेच मुलतानवाडी येथे सभागृह व हातपंप उपलब्ध करून देण्याच्या मागण्या आहेत. मागण्या मार्गी न लागल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही गोरसेनेने दिला आहे.

# भूदान जमिनींच्या शर्तभंगावर शासनाचा कडक बडगा!

## मोहा येथील १४ गटांची तपासणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १३ :** तालुक्यातील मोहा येथील भूदान यज्ञ मंडळाने वाटप केलेल्या शेतजमिनींच्या शर्तभंगाची तपासणी करण्यासाठी शासनाने मोहीम हाती घेतली आहे. अभिलेखानुसार मौजा मोहा येथील सं.न./गट क्र. ११६, ११९, १३८, १४०, १४४, १६०, २९७/१, २९७/पै, ३०४, ३१०, ३४२, ३४३, ३४४ व ३४५ या जमिनी भूदान यज्ञ मंडळामार्फत वाटप झाल्याचे स्पष्ट होत आहे.

या जमिनी सध्या संबंधित व्यक्तींच्या नावे कोणत्या आधारावर आल्या, याची प्रशासनाकडून छाननी केली जाणार आहे. त्यासाठी संबंधित जमीनधारकांनी आवश्यक कागदपत्रे व सबळ पुराव्यांसह १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, सुनावणीस गैरहजर राहणाऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. संबंधितांचे या प्रकरणात कोणतेही म्हणणे नाही, असे गृहीत धरून जमिनीचा शर्तभंग झाल्याचे मानून जमीन शासन जमा करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे यांनी याबाबत कळविले असून, भूदान जमिनींच्या व्यवहारातील नियमबाह्य बाबींना आता प्रशासन कितपत आळा घालते, याकडे लक्ष लागले आहे.

# मुकुटबनमध्ये पुन्हा मटका-जुगाराचा डाव सुरू..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १३ :** पोलिसांच्या कारवाईनंतर काही दिवस बंद झालेला मटका-जुगाराचा अवैध व्यवसाय मुकुटबन परिसरात पुन्हा सुरू झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. कारवाईनंतर अवघे पंधरा दिवस शांतता राहिली; मात्र आता पुन्हा मटका-जुगाराचे अड्डे सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

मागील काही वर्षांपासून मुकुटबन परिसरात मटका, झेंडी-मुंडी यांसह विविध प्रकारचे जुगार अवैधरीत्या सुरू असल्याच्या तक्रारी होत आहेत. पोलिसांनी कारवाई केल्यानंतर हा प्रकार काही काळ थांबला होता. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला होता. मात्र, आता पुन्हा हा अवैध व्यवसाय सुरू झाल्याने पोलिस प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. कारवाईनंतर पुन्हा मटका सुरू होत असल्याने पोलिसांच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नूरखा यांना नेमके कोणाच्या आशीर्वादाने हा व्यवसाय सुरू आहे, याची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. मटका-जुगारामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता असून, तरुणाईही या व्यसनाच्या विळख्यात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ तात्पुरती कारवाई न करता मटका-जुगाराचा मुळापासून बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# डॉ. विठ्ठलराव कदम यांच्या साहित्यिक कर्तृत्वाला अध्यक्षपदाचा सन्मान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १३ :** शिक्षण, सामाजिक प्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात प्रदीर्घ योगदान देणारे उमरखेड येथील प्राचार्य डॉ. विठ्ठलराव कदम यांची तिसऱ्या जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. मराठवाडा साहित्य परिषद, शाखा नांदेड आणि डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने ऑक्टोबरमध्ये हे संमेलन होणार आहे.

डॉ. कदम यांनी १९७९ ते २०१६ या ३७ वर्षांच्या सेवाकाळात शिक्षक, अधिव्याख्याता आणि प्राचार्य म्हणून शैक्षणिक क्षेत्रात ठसा उमटविला. कॉपीमुक्त परीक्षा अभियान, शैक्षणिक जागृती आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. शेतकरी संघटनेत शरद जोशी यांच्यासोबत काम करण्यापासून ते अंधश्रद्धा निर्मूलन आणि भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनापर्यंत त्यांच्या कार्याचा व्यापक पट आहे. 'आदर्श शिक्षक देवराय गुरुजी चरित्र', 'झाड आणि झेंडा' आणि 'सभापती नारायणराव पाटील वानखेडे चरित्र आणि कार्य' ही पुस्तके त्यांच्या साहित्यिक प्रवासाची साक्ष देतात. पाच संशोधन पेपर, पीएच.डी. मार्गदर्शन आणि वर्तमानपत्रांतील सातत्यपूर्ण लेखनातून त्यांनी वैचारिक क्षेत्रातही योगदान दिले आहे. त्यांच्या निवडीचे पत्र मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष बालाजी इबितदार यांनी दिले. या निवडीमुळे शिक्षण, सामाजिक कार्य आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आझाद हिंद मंडळाच्या 'श्री'ची आज भव्य शोभायात्रा

## राजकमल चौकात महाआरतीसह ट्रस फायर शो; महाराष्ट्राचे महागायक अनिरुद्ध जोशी यांच्या आवाजात मंडळाच्या अधिकृत गीताचे लाईव्ह लॉन्च

**अमरावती/का.प्र.**

बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या वतीने गणरायाच्या 'श्री'ची भव्य शोभायात्रा सोमवार,१४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता मंडळाच्या प्रांगणातून मोठ्या उत्साहात काढण्यात येणार आहे. यंदाच्या शोभायात्रेत भक्ती, परंपरा, संस्कृती, युवा शक्ती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनोखा संगम पाहायला मिळणार असून, अमरावतीकरांसाठी हा सोहळा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

शोभायात्रेचे मुख्य आकर्षण महाराष्ट्राचे महागायक ङङअनिरुद्ध जोशीङङ यांच्या आवाजात आझाद हिंद मंडळाच्या अधिकृत गीताचे भव्य लाईव्ह लॉन्च हे राहणार आहे. मंडळाच्या वतीने प्रथमच अधिकृत गीताची निर्मिती करण्यात आली असून, या गीताचे थेट लोकार्पण राजकमल चौकात करण्यात येणार आहे. त्यामुळे गणरायाच्या भक्तिमय वातावरणात अनिरुद्ध जोशी यांच्या दमदार आवाजाचा स्वर अनुभवण्याची संधी अमरावतीकरांना मिळणार आहे.

**१०० जणांची निशाणी यात्रा ठरणार विशेष आकर्षण**

मंडळाच्या शोभायात्रेत तब्बल १०० लोकांची निशाणी यात्रा सहभागी होणार आहे. पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात निघणारी ही निशाणी यात्रा शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरणार आहे. गणरायाच्या जयघोषात विविध निशाण्यांसह सहभागी होणाऱ्या या यात्रेमुळे शोभायात्रेला अधिक भव्य स्वरूप प्राप्त होणार आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्यासाठी १०० महिला पारंपरिक नृत्य सादर करणारङङ आहेत. पारंपरिक वेशभूषेत महिलांचे हे नृत्य शोभायात्रेतील प्रमुख सांस्कृतिक आकर्षण ठरणार असून, महिला शक्ती आणि महाराष्ट्राच्या लोककलेचा सुंदर मिलाफ यानिमित्ताने अनुभवता येणार आहे.



**युवकांचे लेझीम पथक आणि दिंडीचा उत्साह**

आझाद हिंद मंडळातील युवकांकडून विशेष लेझीम पथक तयार करण्यात आले असून, ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर युवकांकडून सादरीकरण करण्यात येणार आहे. तर भक्तिमय वातावरण निर्माण करण्यासाठी दिंडी ही शोभायात्रेत सहभागी होणार आहे. पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगाचा गजर आणि गणरायाच्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय होणार आहे.

**'रामराज्य पथकाचे वादन' राजकमल चौकात**

शोभायात्रेचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे रामराज्य पथक हे पथक राजकमल चौकात आपले सादरीकरण करणार आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक संदेश देणाऱ्या या सादरीकरणामुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढणार आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचा संदेश देण्याचा प्रयत्न या सादरीकरणातून करण्यात येणार आहे.

**राजकमल चौकात ट्रस फायर शो**

शोभायात्रेचा समारोप राजकमल चौकात होणार असून, याठिकाणी प्रथमच भव्य ट्रस फायर शोङङ साकारण्यात येणार आहे. प्रकाश, संगीत आणि आकर्षक तंत्रज्ञानाचा वापर करून सादर होणारा हा शो उपस्थितांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. गणरायाच्या भक्तीमय वातावरणात होणाऱ्या या भव्य सादरीकरणामुळे कार्यक्रमाला नेत्रदीपक स्वरूप प्राप्त होणार आहे.

**राजकमल चौकात महाआरतीचा सोहळा**

फायर शो सोबतच राजकमल चौकात भव्य महाआरती आयोजित करण्यात आली आहे. हजारो गणेशभक्तांच्या उपस्थितीत गणरायाची महाआरती करण्यात येणार असून, यावेळी 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून जाणार आहे. भक्तिभाव आणि उत्साहाचा हा क्षण अमरावतीकरांसाठी अविस्मरणीय ठरणार आहे.

आझाद हिंद मंडळाच्या यंदाच्या शोभायात्रेत पारंपरिक महाराष्ट्राची संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळणार आहे. निशाणी यात्रा, महिलांचे पारंपरिक नृत्य, लेझीम, दिंडी आणि रामराज्य पथक यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडणार आहे, तर अधिकृत गीताचे लाईव्ह लॉन्च आणि भव्य ट्रस व फायर शोमुळे कार्यक्रमाला आधुनिकतेची जोड मिळणार आहे.

मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्यातून समाजात एकोपा, संस्कृती, परंपरा आणि सकारात्मक विचारांचा संदेश पोहोचावा, हा या आयोजनामागील उद्देश आहे. मंडळातील कार्यकर्ते आणि युवक गेल्या अनेक दिवसांपासून या भव्य शोभायात्रेच्या तयारीत व्यस्त आहेत.

सोमवारी दुपारी ३ वाजता आझाद हिंद मंडळाच्या प्रांगणातून शोभायात्रेला प्रारंभ होणार असून, विविध मार्गाने ही शोभायात्रा राजकमल चौकात पोहोचणार आहे. येथे महाआरती, अधिकृत गीताचे लाईव्ह लॉन्च आणि भव्य ट्रस फायर शो असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

या भव्य धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्याचा अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा आणि गणरायाच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने करण्यात आले आहे. 'भक्तीचा जयघोष, संस्कृतीचा जागर आणि युवकांच्या उत्साहाचा संगम' असा यंदाच्या आझाद हिंद मंडळाच्या 'श्री'च्या शोभायात्रेचा भव्य सोहळा अमरावतीकरांना अनुभवता येणार आहे.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात स्तनपान सप्ताह



**अमरावती/का.प्र.**

विदर्भयुथ वेलफेअर सोसायटी द्वारा संचलित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती येथे स्तनपान सप्ताह निमित्य गृह अर्थशास्त्र विभागाअंतर्गत कार्यक्रम आयोजित केले.यावेळी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय कोल्हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक डॉ.वंदना बनकर होत्या त्यांनी स्तनपानाविषयी स्वच्छता बाळाला दूध देण्याच्या पद्धती आरोग्याच्या दृष्टिकोनातून स्तनपानाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.आईने बाळाला स्तनपान केल्यामुळे स्तनांचा कर्करोग यापासून कसा बचाव होतो याचे विद्यार्थिनींना ज्ञान दिले. यावेळी प्रमुख अतिथी विदर्भ युथ वेल फेयर सोसायटीच्या कार्यकारणी सदस्य प्राध्यापक डॉ. पूनम चौधरी यांनी आईचे दूध बाळाला किती आवश्यक व महत्त्वाचे आहे त्यामुळे आईचे व बाळाचे संबंध कसे दृढ होतात यावर मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर सीमा अढाऊ यांनी केले तर संचालन प्रा.डॉ.अनुराधा पाथरकर यांनी केले यावेळी पाहुण्यांचे आभार प्रा.डॉ.योगिता टिक्कस यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीत ते करिता खुशी शिरसाट,पूर्वा पाटील,नेहा बघेल,प्रिया ढोके,अमृता बेठेकर,हर्षिता पाटील, यांनी परिश्रम घेतले.

# चांदूर रेल्वेतील बेवारस महिलेला मैत्री फाऊंडेशन व आझाद नवदुर्गा मंडळाचा माणुसकीचा आधार

## नंददीप फाउंडेशनच्या निवारा केंद्रात सुरक्षित आश्रय; कुटुंबीयांचा शोध घेण्याचा संकल्प

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

गेल्या अनेक दिवसांपासून चांदूर रेल्वे शहरात अत्यंत दयनीय आणि बेवारस अवस्थेत जीवन जगणाऱ्या एका अज्ञात महिलेच्या मदतीसाठी मैत्री फाऊंडेशन व आझाद नवदुर्गा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत माणुसकीचे दर्शन घडविले. रस्त्यावर व कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ अन्न शोधत, उपाशीपोटी आणि अत्यंत अस्वच्छ अवस्थेत दिवस काढणाऱ्या या महिलेला अखेर सुरक्षित निवारा मिळाला आहे.



महिलेची दयनीय अवस्था लक्षात येताच त्यानंतर मैत्री फाऊंडेशनचे अंकुश जोशी,सनी जोशी, विकी राय, प्रशांत भैसे, अब्दुल राजीक, हर्षल वाघ तसेच आझाद नवदुर्गा मंडळाचे राजू कलावटे,पिंटू पतारिया,पराग वाघ,मंगेश चोरे आणि सोनू सातपुते बबलू वैद्ययांनी या सेवाकार्यात सक्रिय सहभाग घेतला. नंददीप फाउंडेशनचे संदीप शिंदे, अविनाश धनेवार, विजय कुलरकर, दिलीप हजारे, मुरलीधर गबने आणि विशाल काकडे यांच्या सहकार्याने महिलेला सुरक्षितपणे नंददीप फाउंडेशनच्या निवारा केंद्रात नेण्यात आले.

या संपूर्ण कार्यात चांदूर रेल्वे पोलिसांनीही आवश्यक ती पोलीस प्रक्रिया पूर्ण करून सहकार्य केले. तसेच मैत्री फाऊंडेशन च्या वतीने सेवेसाठी आलेल्या टीमच्या भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली.लवकरच मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्यावर उपचार सुरू करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर ही महिला नेमकी कोणत्या राज्यातील, जिल्ह्यातील किंवा गावातील आहे, तिचे कुटुंबीय कोण आहेत, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कुटुंबीयांचा शोध लागल्यास तिला सुरक्षितपणे तिच्या घरी पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

> 'रस्त्यावर एखादी निराधार व्यक्ती दिसली की तिच्याकडे दुर्लक्ष करून पुढे जाणे सोपे आहे; मात्र तिच्यापर्यंत पोहोचून तिला आधार देणे ही खरी माणुसकी आहे. या महिलेच्या मदतीसाठी मैत्री फाऊंडेशन, आझाद नवदुर्गा मंडळ आणि नंददीप फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे केलेले काम कौतुकास्पद आहे. या महिलेला केवळ निवारा मिळवून देणे हा आमचा उद्देश नसून तिची ओळख पटवून तिच्या कुटुंबीयांपर्यंत तिला सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठीही आम्ही प्रयत्नशील राहू. समाजातील प्रत्येक संवेदनशील नागरिकाने अशा गरजू व्यक्तींसाठी पुढे येणे गरजेचे आहे.'
>
> **नगरसेवक हर्षल वाघ**

# राष्ट्रीय लोक अदालतीत सहमतीने ६ चेक बाऊन्स प्रकरणांचा निपटारा; ६ लाख ५७ हजारांची तडजोड

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुका विधी सेवा समिती, चांदूरबाजार यांच्या वतीने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीस पक्षकार, वकील तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परस्पर सामंजस्य, संवाद आणि तडजोडीच्या माध्यमातून प्रकरणांचा जलद व सौहार्दपूर्ण निपटारा करण्यात आला.



या कार्यक्रमास माननीय उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूरचे पालक न्यायमूर्ती श्री.पी. एस. पाटील साहेब, जिल्हा व सत्र न्यायालय अमरावतीच्या श्रीमती नंदेश्वर मॅडम, जिल्हा न्यायाधीश-२ शर्मा , दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, चांदूरबाजार एम.एम. राऊत, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, चांदूरबाजार एच. एस. सोनार, तालुका वकील संघाचे पदाधिकारी व वकील वृंद तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये चेक बाऊन्सची एकूण ६ प्रकरणे दोन्ही पक्षांच्या परस्पर संमतीने तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये एकूण ६ लाख ५७ हजार रुपयांची तडजोड रक्कम निश्चित करण्यात आली. त्यामुळे संबंधित पक्षकारांना प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेपासून दिलासा मिळाला. तसेच कोपटा कायदा व किरकोळ स्वरूपाच्या फौजदारी प्रकरणांसह एकूण ९८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमधून एकूण २० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

'वाद नको, संवाद हवा; तडजोडीतून न्यायाकडे वाटचाल'राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून चांदूरबाजार न्यायालयाने जलद, सुलभ आणि तडजोडीच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाला प्रभावीपणे हातभार लावला.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेला रामराम

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेत प्रशांत शिरभाते, दिनेश आमले यांचा प्रवेश

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेला अमरावती जिल्ह्यात नवी ताकद मिळाली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेला रामराम ठोकत प्रशांत प्रमोदराव शिरभाते आणि दिनेश अण्णा आमले यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेत प्रवेश केला. संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.



या प्रवेशानंतर प्रशांत शिरभाते यांची क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या अमरावती जिल्हा उपाध्यक्षपदी, तर दिनेश अण्णा आमले यांची चांदूर रेल्वे तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे यांनी प्रशांत शिरभाते यांना नियुक्तीपत्र देऊन जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत, संघटनेचे संपर्कप्रमुख अमित अढाऊ यांच्या शिफारशीवरून शिरभाते यांची नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, दिनेश अण्णा आमले यांच्यावर चांदूर रेल्वे तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने तालुक्यात संघटनेच्या विस्ताराला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शेतकरी प्रश्न, कृषीविषयक समस्या आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या अडचणींसाठी संघटनेच्या माध्यमातून संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रवेशावेळी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर, मुख्य समन्वयक महाराष्ट्र सचिन पांडुळे, प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, संपर्कप्रमुख अमित अढाऊ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिरभाते व आमले यांच्या प्रवेशाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले.

# पावसामुळे नेहरू मैदान चिखलमय; गणेशमूर्ती विक्रेत्यांचे नुकसान

## अचलपूर-परतवाडा बाजारपेठेत गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांची गर्दी; खड्डे आणि वाहतूक कोंडीने वाहनचालक त्रस्त

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरात लाडक्या गणपती बाप्पांच्या आगमनाची तयारी सुरू असतानाच रविवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावली. पावसाची पर्वा न करता गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांनी शहरातील बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी केली होती. मात्र, परतवाडा शहरातील नेहरू मैदान परिसरात पावसामुळे चिखल झाल्याने गणेशमूर्ती विक्रेते तसेच ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

परतवाडा शहरातील नेहरू मैदान येथे दरवर्षी अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या अंतर्गत गणेशमूर्ती विक्रीची विविध दुकाने थाटली जातात. यंदाही मोठ्या संख्येने दुकाने उभारण्यात आली आहेत. मात्र, पावसामुळे संपूर्ण मैदान चिखलमय झाले. अनेक ठिकाणी नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले होते.

गणेशमूर्ती विक्रेत्यांनी लाखो रुपयांची गुंतवणूक करून दुकाने थाटली असताना पावसामुळे झालेल्या चिखलाचा मोठा फटका त्यांच्या व्यवसायाला बसला. प्रशासनाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यायी व्यवस्था किंवा आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित होते.



मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याने दुकानदारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, गांधीपूल, देवडी, चावलमंडी तसेच नगर परिषद नेहरू मैदान परिसरात गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होती. शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर नागरिकांनी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी केल्याने वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण झाली. त्यातच शहरातील अनेक ठिकाणी रस्त्यांवरील खड्डे जैसे थे असल्याने वाहनचालकांना पावसाळ्यात मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने बाजारपेठ, रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असताना अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून पुरेशी तयारी करण्यात आली नसल्याची नाराजी नागरिक आणि दुकानदारांकडून व्यक्त होत आहे.

■ परतवाडा शहरातील नेहरू मैदान परिसरात गणेशमूर्ती खरेदीसाठी दरवर्षी नागरिकांची मोठी गर्दी होते. यंदा पावसामुळे परिसर चिखलमय झाल्याने नागरिकांसह दुकानदारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. अचलपूर नगर परिषद प्रशासनाने याबाबत आधीच ठोस उपाययोजना करणे आवश्यक होते.

**पंजाब बेदरकर, अचलपूर**

■ पावसामुळे नेहरू मैदान परिसरात चिखल झाल्याने नागरिकांनी गणेशमूर्ती खरेदीसाठी अनेक दुकानांकडे पाठ फिरवली. लाखो रुपयांची गुंतवणूक करूनही प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे ग्राहक दुकानापर्यंत पोहोचू शकले नाहीत. त्यामुळे आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**उद्धव मगरे, दुकानदार,**

## संक्षिप्त

### खा.वानखडे यांच्या हस्ते राष्ट्रीय विजेत्या खेळाडूंचा सत्कार




**अमरावती** - सेपक टकरा (Sepak Takraw) सब-ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळवून चॅम्पियन ठरलेल्या अमरावतीच्या खेळाडूंचा अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खा.बळवंत वानखडे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण कामगिरी करत जिल्ह्याचे नाव उंचावणाऱ्या संघात अंजली राठोड, तृप्ती बोजे, प्राची जयस्वाल, गौरी जोहारे आणि वैष्णवी जीवतोडे या खेळाडूंचा समावेश आहे. खासदार वानखडे यांनी सर्व गुणवंत खेळाडूंचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला आणि त्यांच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये अफाट गुणवत्ता असून, खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अमरावतीचा झेंडा असाच फडकत ठेवावा, असा विश्वास यावेळी खा.वानखडे यांनी व्यक्त केला.या सत्कारप्रसंगी अमरावती जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही खेळाडूंचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाला क्रीडा प्रशिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काजल खडे यांची शिक्षकसेवकपदी निवड

**खल्लार** - दर्यापूर तालुक्यातील भामोद येथिल काजल हरिदास खडे हिची जळगाव खान्देश येथे शिक्षणसेवक पदी निवड झाली आहे.काजल खडेचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण भामोद येथे पूर्ण केले. पुढे पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण प्रबोधन विद्यालय, दर्यापूर येथे ये-जा करून पूर्ण केले. त्यांनी बारावीपर्यंत विज्ञान शाखेतून शिक्षण घेतले. उच्च शिक्षणासाठी अकोला येथील आर.एल.टी. महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे त्यांनी बी.एस्सी.च्या प्रथम व द्वितीय वर्षाचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एम.एस्सी.च्या प्रथम वर्षाचे शिक्षणही पूर्ण केले आहे. विविध अडचणींवर मात करत काजलने शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवत मिळविलेले यश उल्लेखनीय मानले जात आहे.जळगाव खान्देश येथे झालेल्या निवडीमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या यशाबद्दल कुटुंबीय, शिक्षक, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून कौतुक केल्या जात आहे.



### हरविलेले मोबाईल शोधून मूळ मालकांच्या स्वाधीन



**खल्लार** - दर्यापूर शहर व परिसरातील नागरिकांचे हरविलेले मोबाईल फोन शोधून ते मूळ मालकांच्या स्वाधीन करण्याची कौतुकास्पद कामगिरी दर्यापूर पोलिसांनी केली आहे. पोलिसांच्या या कार्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, दर्यापूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.उपविभागीय पोलिस अधिकारी सतिश कुलकर्णी स तसेच दर्यापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार अजित राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन जाधव सह इतर पोलिसांनी हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी आवश्यक तांत्रिक तपास व पाठपुरावा केला. या प्रयत्नांतून हरवलेले मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले.त्यानंतर संबंधित मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. अचानक हरविलेला मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी दर्यापूर पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी दर्यापूर पोलिस प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या कारवाईतून दिसून आले. पोलिसांच्या या कामगिरीमुळे 'हरविले तरी परत मिळण्याची आशा' नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# परंपरा परिवर्तनाचीच हवी!

**'समाजात बदल घडवायचा असेल, तर त्यात मिसळावे लागते, परिवर्तनाला काही पिढ्या लागतात', हे सगळे खरे असले, तरी बदलासाठी कुणीतरी पहिले पाऊल टाकावे लागते, पुढाकार घ्यावा लागतो, कधीकधी दंडशक्तीची किंवा न्यायव्यवस्थेची दुरून का होईना, पण भीती दाखवावी लागते. अर्थात, समाजातही विवेकी मन असते, यावर विश्वास असणाऱ्यांपैकी आपण आहोत.**

पुण्यातील गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी आणि नागरिकांच्या बैठकीत स्पीकरच्या कर्णकर्कश्य आवाजाविरोधात दाद मागणाऱ्या नागरिकाला विरोध होऊन त्याला सुरक्षारक्षकांनी बाहेर काढण्याच्या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटतात. सोलापूरमध्ये त्याआधीच डीजे बंदी जाहीर झालेली असते. नागपूरला पोलिस आयुक्त ती जाहीर करतात आणि पुण्यात डीजेबंदी असा शब्द न उच्चारता ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची घोषणा होते... कोणत्याही उत्सवात, परंपरेत सकारात्मक बदल करायचा असेल, तर समाजाच्या कलाने घेऊन, त्याच्या बौद्धिक पातळीची सरासरी काढून प्रबोधनाच्या माध्यमातून त्याच्या पोटात शिरावे लागतेच; पण त्याचबरोबर कुणीतरी बदलाचे पहिले पाऊल टाकावे लागते, कुणीतरी प्रवाहाविरोधात पहिला हात मारावा लागतो. उत्सवाचा इतिहास याला साक्षी आहे. समाजाने असे बदल कौतुकास्पदरीत्या स्वीकारले आहेत. त्यामुळेच यापुढेही परंपरेत परिवर्तन घडवण्याऐवजी काळानुरूप परिवर्तनाचीच परंपरा समाजपुरुष विवेकबुद्धीने स्वीकारेल आणि त्यामुळे हा शतकोत्तर चाललेला जनउत्सव अधिक रसरशीत, त्रासाऐवजी आनंद देणारा, नानाविध समाजघटक एकत्र आणणारा नक्कीच होईल.

सार्वजनिक गणेशोत्सव आता जगाच्या कानाकोपऱ्यात लहान-मोठ्या प्रमाणात साजरा होत असला, तरी पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला वेगळेच महत्त्व आहे. पारतंत्र्याचे जोखड फेकून देण्यासाठी या उत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आणि समाजाला एक करून ब्रिटिशांना देशाबाहेर घालवून दिले. ब्रिटिश गेल्यानंतर हा उत्सव बंद झाला नाही, तर तो आजपर्यंत वेगवेगळी वळणे घेत दिमाखदाररीत्या सुरूच राहिला आहे. 'महाराष्ट्रातला उत्सव पारंपरिकरीत्याच पार पडेल', हे म्हणणे योग्य असले, तरी या विधानातील भाव शब्दशः घ्यायचा नसतो, याचे भान सर्वांना नक्कीच आहे. काळाबरोबर काही जुन्या, कालबाह्य परंपरा सोडून द्याव्या लागतात, काही नव्या निर्माण कराव्या लागतात आणि त्यांची उपयुक्तता तपासत राहावी लागते. पुण्यातील उत्सवाला आता एकशेबत्तीस वर्षे झाली आहेत. सार्वजनिकरीत्या उत्सव पहिल्यांदा साजरा झाला तो १८९३ मध्ये. (आता प्रत्येक गोष्टीत वाद झालाच पाहिजे, हे खऱ्या पुणेकरांचे व्यवच्छेदक लक्षण असते. त्यामुळे १८९३ च्या काही वर्षे आधीपासून काही मंडळे सार्वजनिक झाली, असे काही जणांकडून मांडले जाते.

वास्तविक समाजाला एकत्र आणण्यासाठी गणेश पूजन ही या उत्सवामागील खरी धारणा समजली, तर गाढवाचा नांगर फिरवलेल्या कसबे पुण्यातील एका कोनाड्यात लपवलेल्या गणेशमूर्तीचे पूजन करणाऱ्या आणि 'देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा' या पंक्तीप्रमाणे त्या पूजनाच्या माध्यमातून अवघ्या मराठमंडळाला एकत्र आणण्याचा वसा घेणाऱ्या जिजाऊसाहेब याच पुण्यातील सार्वजनिक गणेशपूजनाला सुरूवात करणाऱ्या आद्य उत्सव संस्थापक ठरतात...) उत्सवाच्या पहिल्या काही दशकांत त्याचे सादरीकरण ज्या पद्धतीने झाले, तंतोतंत त्याच पद्धतीने एकशेबत्तीस वर्षांनीही करावे, असा हट्ट कुणी धरला, तर तो वेडगळपणा ठरेल, तरीही 'लोकमान्यांचा उत्सव कुठे आणि आजचा उथळ उत्सव कुठे?' असे उसासे सोडण्यात येतात, ते पाहून गंमत वाटते. त्या पद्धतीने उत्सव आज साजरा करायचाच नाही. ब्रिटिशांना घालवणे, हा त्यावेळचा उद्देश सुफळ संपन्न होऊन तब्बल ऐंशी वर्षे होत आली. 'उत्सवाचा उद्देश त्यावेळी स्वराज्य होता आता स्वातंत्र्यानंतर सुराज्यासाठी उत्सव' अशीही ठोकळेबाज वाक्ये आता फेकली जातात. आपण उत्सवाचा उपयोग सुराज्यासाठी करूही; पण निव्वळ रंजनासाठीही उत्सव का नको? वर्षभर कामात पिचलेल्या मानवी मनाला चार घटका रंजनाची गरज असतेच ना? रंजन होऊन पुन्हा ताज्या दमाने दुप्पट काम करायला समाजाने तयार होणे, म्हणजेच सुराज्य नव्हे काय?

सुराज्य, सामाजिक कामांत सहभाग, रंजन या वेगवेगळ्या कारणांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची नितांत आवश्यकता आहे. 'उत्सव आता बंद करा', ही हाकाटी निरर्थक आहे; मात्र असे असले, तरी काळानुसार बदलण्याचा मानसिक खुलेपणा उत्सव साजरा करणाऱ्या घटकांमध्ये असला पाहिजे. 'परंपरा, परंपरा' असा जप करून ज्या रुढी अर्थहीन झाल्या आहेत, त्या सोडून न दिल्यानेच अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. अर्थात, या शतकोत्तर वाटचालीत उत्सव स्वतःहून अनेकदा बदलला, त्याची नोंद घ्यावीच लागेल. दर दहा वर्षांनी पिढी बदलते. त्यामुळे उत्सवाच्या वाटचालीत किमान तेरा पिढ्या बदलल्या.

पुढची पिढी दरवेळेस काहीतरी नवे घेऊन येते. त्याचे प्रत्यंतर उत्सवातही का दिसणार नाही? पहिल्या काही वर्षांत मेळे, रस्त्यावरील संगीत मैफिली, देशभक्तीपर व्याख्याने यावर भर होता. नंतर साधी आरास, देखाव्यांना सुरुवात, विद्युत रोषणाईवर भर आणि आता जिवंत देखाव्यांची म्हणजेच प्रसंग नाट्यांची रेलचेल असे सादरीकरणात बदल झाले. मंडळांची संख्या प्रचंड वाढली. एका आळीत एक गणपती होता. आता अवघ्या शंभर-दीडशे मीटरवर दुसरे मंडळ उभे राहू लागले. पुणे परिसरात नोंदलेली-न नोंदलेली अशी किमान साडेचार हजार गणपती मंडळे



असल्याचे दाखले मिळतात. उत्सवाला असे भव्य-दिव्य रूप येत असताना, त्याचा आकार वाढत असताना काही बाबतीत स्वाभाविकपणाने बदल होत गेले; परंतु काही गोष्टी मात्र नागरिकांना त्रासदायक ठरू लागल्या. उत्सवाच्या देखणेपणाला गालबोट होऊ लागले, तरी त्यांचा हट्ट कायमच असल्याने उत्सवाबाबत नकारात्मक प्रतिक्रिया उमटण्यास सुरुवात झाली. विद्यानंद बापट यांनी ध्वनिप्रदूषणाच्या विरोधात उठवलेला आवाज आणि त्याला मिळालेला पुण्यातील नागरिकांचा प्रत्यक्ष, तर राज्यातील नागरिकांचा दूरस्थ पाठिंबा जनमताचा कौल कुठे चालला आहे, हेच दाखवतो आहे.

'समाजात बदल घडवायचा असेल, तर त्यात मिसळावे लागते, परिवर्तनाला काही पिढ्या लागतात', हे सगळे खरे असले, तरी बदलासाठी कुणीतरी पहिले पाऊल टाकावे लागते, पुढाकार घ्यावा लागतो, कधीकधी दंडशक्तीची किंवा न्यायव्यवस्थेची दुरून का होईना, पण भीती दाखवावी लागते. अर्थात, समाजातही विवेकी मन असते, यावर विश्वास असणाऱ्यांपैकी आपण आहोत. साम-दंडाच्या या साधनांनी समाज योग्य दिशेकडे वळतो, हा इतिहास आहे. रात्री तीन-चार (रात्र कसली? दुसऱ्या दिवशीची पहाटच) वाजेपर्यंत देखावे पाहत, विद्युत रोषणाईच्या तालावरील संगीत ऐकत मुक्तपणे फिरायचे असे उत्सवाचे रंग अनुभवलेली पिढी फारशी ज्येष्ठ झालेली नाही; परंतु आता मात्र रात्री दहाला देखाव्यांचे आवाज बंद करायचा न्यायालयाचा आदेश विनातक्रार पाळला जातोच ना? हा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने १८ जुलै २००५ ला दिला, तो 'इन रे नॉईज पोल्युशन' या नावाने दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीनंतर. हा निकाल केवळ गणेशोत्सवाबाबत नव्हता, तर सार्वजनिक ठिकाणी रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत सार्वजनिक ध्वनिव्यवस्था बंद ठेवण्याचे बंधन त्यात होते. विवेकी समाजमन या आदेशाचा तंतोतंत मान ठेवते. कायद्याचा बडगा न दाखवताही अनिष्ट गोष्ट उत्सवाने स्वतःहून बंद केली, याचे एक उदाहरण म्हणजे गुलालाची उधळण. गुलाल उधळल्याने आरोग्यावर होणारे अनिष्ट परिणाम जाणत्यांनी समजावून सांगितल्याने आता गणेशोत्सवात अभावानेच एखादे मंडळ गुलाल उधळते. पुण्यातील मानाच्या पहिल्या कसबा गणपतीसमोर तर आता केशरी टिळा लावला जातो.

या दहा-बारा दिवस चालणाऱ्या रंगतदार उत्सवाला लागलेले आणखी एक गालबोट म्हणजे ध्वनिप्रदूषण. मोठमोठ्या स्पीकरच्या भिंती मुख्यतः मिरवणुकीत येतात आणि त्यामुळे कायमचा बहिरेपणा येतो. अनेकविध आजार त्यापाठोपाठ येतात. त्या त्रासाबाबत सामान्यजन अनेक वर्षे नाराजी व्यक्त करीत आली असली, तरी मंडळे आपला हट्ट सोडत नाहीत. सामान्यांचा हा आवाज जाहीरपणाने मांडण्याचे धाडस विद्यानंद बापट यांनी दाखवले आणि सामान्यजन त्यांच्या मागे एकवटले. लोकभावनेची दखल सत्तेतील पदाधिकाऱ्यांना घ्यावीच लागते, याचे अनेक दाखले असले, तरी ताजा दाखला जेन झीच्या आंदोलनाचा होता. सोलापूर, नागपूरमधील डीजेबंदीनंतर पुण्यातील दहीहंडीसमोरच्या कर्णकटू आवाजाच्या मंडळांवर गुन्हे ठोकून पोलिस यंत्रणेने आणि पर्यायाने सरकारने आपला इरादा दाखवून दिला आहे. खुल्या मैदानात लांबवर ऐकू जाईल, यासाठी तयार केलेल्या स्पीकरच्या भिंतीच्या भिंती पन्नास फुटी रुंदीच्या आणि पाच फुटांवर उभ्या असलेल्या गर्दीच्या समोर आणल्या, तर ऐकणाऱ्यांचे कान शिल्लक राहतील का? विद्येची, बुद्धीची देवता म्हणून गणेशाकडे पाहिले जाते. सर्वजनांस त्रासदायक नव्हे, तर आनंददायक, कानभंजक नव्हे, तर मनोरंजक असा उत्सव साजरा करण्याची बुद्धी उत्सवातील सर्वच घटकांना येईल आणि शहाणपणाच्या विसर्जनाऐवजी आडमुठेपणाच्या, विकृतीत आनंद शोधणाऱ्या चुकीच्या वृत्तीचे विसर्जन होईल, अशी सदिच्छा बाळगून येणाऱ्या उत्सवाचे स्वागत करूयात!

सार्वजनिक ठिकाणी ५५ ते ६५ डेसिबलचा आवाज हा निकष असताना शंभराच्या पुढे डेसिबलचा आवाज करणाऱ्या स्पीकरने होणारा त्रास या जनआंदोलनाने थांबेल का, या प्रश्नाचे उत्तर उत्सवाच्या नव्या कार्यकर्त्यांकडे विवेकी मन आहे का, या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून असेल. काळानुसार उत्सवात बदल करण्याची लवचिकता सर्व मुद्द्यांबाबत हवी. मुंबईत भल्यामोठ्या उंचीच्या गणेशमूर्तींची परंपरा आहे; मात्र जुन्या मुंबईतले रस्ते तेवढ्याच रुंदीचे आणि लोकसंख्या झपाट्याने वाढणारी यामुळे होणारी गैरसोय टाळता यायला हवी. सार्वजनिक गणेशमूर्तींची उंची कमी केल्यास मूर्तींना होणारे अपघातही टळतील.

**-सुनील माळी**

## गणपती बाप्पाचे वैश्विक रूप!

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या लाडक्या गणपती बाप्पांचे आज घरोघरी आगमन होत आहे. चैतन्याच्या आणि आनंदाच्या या मराठी मनाच्या महाउत्सवात गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले आहे. गणपती हा चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती मानला जातो. बुद्धीच्या या देवाची सर्वत्र मनोभावे पूजा केली जाते. गणेश सूक्तात आणि श्री गणपती अथर्वशीर्षामध्ये बाप्पाला 'त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वं इन्द्रस्त्वं अग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चन्द्रमा त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम्' असे म्हटले आहे. याचाच अर्थ सूर्य, चंद्र, अग्नी, वायू या सर्व नैसर्गिक शक्ती म्हणजेच गणपतीचे रूप आहेत. आपल्या देशातील विविध भागात गणेशोत्सव साजरा होत असला तरी महाराष्ट्रात या उत्सवात सर्वाधिक उत्साह ओसंडून वाहत असतो. इतकेच नव्हे तर जगभरात विविध देशात स्थलांतरित झालेली मराठी माणसे एकत्र येऊन तेथे गणेशोत्सव उत्साहात साजरा करतात. त्यासाठी आपल्या मूर्तिकारांनी घडवलेल्या बाप्पाच्या सुंदर मूर्ती परदेशात पाठविल्या जातात. जगातील अफगाणिस्तान, व्हिएतनाम,



थायलंड, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, लाओस, नेपाळ, बांगला देश, म्यानमार, पाकिस्तान, श्रीलंका अशा अनेक देशांमध्ये गणपतीच्या संगमरवरी, दगडी, धातूंच्या, काष्ठाच्या स्वरूपात विविध मनमोहक मूर्ती सापडल्या आहेत. यावरून गणपती बाप्पाचे वैश्विक रूप दिसून येते. विशेष म्हणजे जगातली सगळ्यात मोठी ३९ मीटर उंच गणपतीची कांस्याची मूर्ती थायलंडच्या ख्लॉन्ग ख्वान्ग शहरामध्ये स्थित आहे. या मंगलमय वातावरणात पर्यावरण आणि सामाजिक सुरक्षिततेचे भान जपत यंदाचा गणेशोत्सव उत्साहाने साजरा करूया!

**-प्रदीप मोरे**

## गणेशोत्सवाचे व्यापक स्वरूप

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला येणारी गणेश चतुर्थी आणि गणेशोत्सव हा आम्हा सर्वांचा आवडता सण. गणपती हा सकल कलांचा अधिपती. बुद्धीची देवता. गणेशाचे आगमन होणार म्हटल्यावर घरात आनंदाचे, मांगल्याचे वातावरण असते. पृथ्वीपासून म्हणजे मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तीचे आपण पूजन करतो, म्हणून त्याला पार्थिव मूर्ती असे म्हणतात. येणाऱ्या सर्व संकटांचे हरण करावे अशा संकल्पाने आपण गणेशाच्या मूर्तीची स्थापना आणि पूजा करत असतो. आपल्या महाराष्ट्र राज्याचा गणेशोत्सव या जागतिक आकर्षणाचा विषय होण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच्या ब्रिटिश सरकारच्याविरोधात जनजागृती करण्याकरिता आणि लोकांमध्ये आपली सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्याबरोबरच देशासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले होते. आज स्वातंत्र्यानंतरही हा उत्सव जनजागृती, सांस्कृतिक अस्मिता आणि समाज म्हणून एकत्र येण्याच्या उद्देशाने खूप मोठे योगदान देणारा ठरला. लोक स्वयंस्फूर्तीने एकत्र येतात आणि एकमेकांच्या सहकार्याने गणरायाचे अतिशय भक्तिपूर्ण वातावरणात स्वागत करत असतात. या तीन हेतूंचा जनमानसावर इतका प्रचंड प्रभाव आहे.

गेल्यावर्षी गणेशोत्सव हा राज्य उत्सव म्हणून घोषित झाला.विघ्नविनाशक गणराय आपल्याला अनेक अर्थांनी सदबुद्धी देणारा आणि आपले संरक्षण करणारादेखील आहे. याबद्दल त्यांच्या मनात पूर्ण निष्ठा असते. ज्यावेळेला लोक स्वयंस्फूर्तीने असे सामाजिक उपक्रम करतात, तेव्हा त्यामध्ये त्यांच्या उद्दिष्टांविषयी खूप पारदर्शकता असते. अशावेळी सरकारला त्याची दखल घ्यावी लागते. आणि राजकारणीदेखील अशा उपक्रमांचा राजकीय वापर करून घेण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. तोच प्रकार हा गणेशोत्सवात होत असतो. गणेशोत्सव हा सार्वजनिक म्हणजे व्यापक आहेच. तोच सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला पाहिजेत. आज गणेशोत्सव म्हटल्यानंतर सरकारला सुरक्षिततेची सर्वाधिक काळजी असते. मग गणरायाच्या आगमन मिरवणुकांपासून तर त्याचे सुरळीतपणे विसर्जन होण्यापर्यंत सुरक्षा यंत्रणा प्रचंड तणावाखाली असतात. हा जर राज्यउत्सव असेल तर समाजातल्या प्रत्येक घटकाला मग तो कुठल्याही विचाराचा संप्रदायांचा असू शकेल, पण त्याला गणेशोत्सवाची सामाजिक सौहार्दता लक्षात आणून दिली पाहिजे.

गणेशोत्सवाची ही प्रदीर्घ चालणारी परंपरा खरे तर सामाजिक स्तरावरसुद्धा एक मंगलमय वातावरण निर्माण करणारी ठरते. एकूणच या दहा दिवसांच्या या उत्सवाचे पावित्र्य आणि मांगल्य जपले जाणे ही सर्वांची जबाबदारी आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक मंडळांकडून अनेक सामाजिक उपक्रमही राबविले जातात. अगदी व्याख्यानमालांपासून ते गरजू लोकांना अनेक प्रकारची मदत करण्यापर्यंत उपक्रम राबवले जातात. अत्यंत व्यापक असा सामाजिक हेतू साध्य करण्याचा तितकाच प्रामाणिक प्रयत्नही होत असतो. परंतु काही अतिउत्साही गणेशमंडळांमुळे जर या उत्सवाच्या मूळ हेतूलाच गालबोट लागत असेल तर तेदेखील अयोग्य ठरते. विशेषतः ध्वनी प्रदूषणाच्या मुद्यावर वेळोवेळी न्यायालयाकडून काही निर्बंध लादले गेले. जसे कुठेही रात्री दहानंतर ध्वनिवर्धक म्हणजेच लाऊडस्पीकर चालू ठेवण्यासाठी मर्यादा घातली गेली. त्यातदेखील ध्वनी प्रदूषण हाच महत्वाचा मुद्दा होता. याच हेतूने इतर धर्मियांनीही या आदेशाचे पालन करावे असा आग्रह धरला गेला. एकूणच उत्सव किंवा सार्वजनिक उपक्रमांमधून सार्वजनिक हितालाच प्राधान्य राहिले पाहिजे. केवळ समाज एकत्र येतो आहे म्हणून कायदे, नियम बाजूला ठेवून चालणार नाही. किंवा त्याचा गैरवापर होऊ नये. त्याची खबरदारी सरकारी स्तरावर घेतली गेली पाहिजे.

**प्रा.मधुकर चुटे**
नागपूर
मो.९४२०५६६४०४

## साहित्य सम्मेलने – दृष्टीक्षेप

जाती पातीच्या
सम्मेलनांचा
वाढत चाललाय बाजार
वास्तव साहित्याच्या
खुमारीला
समाज विन्मुख तर नाही
होणार ?

हम सब एक है
संकल्पनेला
अशी सम्मेलने देती छेद
समता बंधुता मानवता
स्विकारता मिटेल भेदाभेद

सर्वांना मिळावे व्यासपिठ
म्हणून
बाल, कृषी,संत,विज्ञान,
भाषिक साहित्य
सम्मेलनात
समाज विकासाचे हवे
सातत्य



**प्रा अशोक सारडा मेहकर**
(९४२१३९४३३९)

## बाप्पा तुझं येणं....

पाहताच तुला बाप्पा
विसरून गेले भान,
डोळ्यातून आनंदाश्रू वाहत
शब्दांचे हरवले भान...

डोळ्यात तुझ्या आपुलकीचे
दिसतात मला भाव,
विसरून जाते देवा,
माझा मलाच लागत नाही ठाव...

रूप तुझे सुंदर
वर्णन करू तरी मी काय,
शब्दांच्या पलीकडचे सौंदर्य
तू वात्सल्याची माय...

तुझ्या येण्याच्या चाहुलीने
वेदनांचे हरवते पान,
तुझ्या दर्शनाने होते
माझे मन बेभान...

खूप काही सांगायची असते
बाप्पा माझ्या मनाची व्यथा,
तुला पाहताच विसरते
माझ्या सर्व दुखमय कथा...

बाप्पा तुझं येणं
म्हणजे माझं तुझ्यात गुंतनं
सर्व काही बाजूला सारून
माझं मला विसरणं...

**ज्योती रावराणे**

# मोठ्या गणेशमूर्तींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत उंचीवर मर्यादा हव्यात का?

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथून जळगावला आणली जात असलेली १२ फूट उंच गणेशमूर्ती प्रवासादरम्यानच दुभंगल्याने मोठ्या मूर्तींच्या सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा पुन्हा समोर आला आहे. मूर्तीची निर्मिती, सुकविण्याची प्रक्रिया, वाहतुकीदरम्यानची खबरदारी आणि प्रतिष्ठापनेपर्यंतची सुरक्षितता याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे.

### गणेशमूर्तीचे नुकसान का झाले?

जळगावातील जय महाराष्ट्र मित्र मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवासाठी बऱ्हाणपूर येथील मूर्तिकाराकडून १२ फूट उंचीची गणेशमूर्ती तयार करून घेतली होती. यासाठी सुमारे ४७ हजार रुपये खर्च करण्यात आल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले. गणेशमूर्ती तयार झाल्यानंतर ती जळगावकडे रवाना करण्यात आली. मात्र, प्रवासादरम्यानच मूर्तीला मोठा तडा जाऊन ती दुभंगली. मूर्तीवर आवरण असल्याने हा प्रकार तत्काळ लक्षात आला नाही. जळगावमध्ये पोहोचल्यानंतर मूर्ती उघडली असता तिची अवस्था समोर आली. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मूर्तिकाराने पूर्ण रक्कम घेतल्यानंतरही मूर्तीचे काम व्यवस्थित पूर्ण केले नसल्याचा आरोप केला आहे. मूर्ती घाईघाईने आणि ओली अवस्थेत मंडळाच्या ताब्यात देण्यात आल्याचेही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मोठ्या आकाराची मूर्ती तयार करताना तिच्या प्रत्येक भागाला पुरेसा वेळ देणे, ती योग्य पद्धतीने सुकवणे आणि अंतर्गत मजबुती तपासणे आवश्यक असते. या प्रक्रियेत घाई झाल्यास मूर्तीची वाहतूक करताना तडे जाण्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे या प्रकरणात मूर्ती तयार करण्याच्या प्रक्रियेपासूनच काही त्रुटी राहिल्या होत्या का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

### ओल्या मूर्तीची वाहतूक कितपत योग्य?

मोठ्या गणेशमूर्तींच्या निर्मितीत सुकण्याचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. बाहेरून मूर्ती कोरडी दिसत असली तरी आतील भाग पूर्णपणे सुकलेला असेलच असे नाही. अशा स्थितीत लांब अंतराची वाहतूक केल्यास रस्त्यातील खड्डे, धक्के, वाहनाची कंपने आणि अचानक ब्रेक यांचा मूर्तीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मूर्ती पूर्णपणे स्थिर आणि वाहतुकीस योग्य झाल्याची खात्री केल्यानंतरच ती हलविणे आवश्यक आहे. मूर्तीची उंची वाढली की तिच्या वाहतुकीचे आव्हानही वाढते. वाहनाची क्षमता, मूर्तीचा समतोल, आधारासाठी वापरण्यात येणारी रचना, बांधणीची पद्धत आणि रस्त्याची परिस्थिती यांचा विचार करावा लागतो. उंच मूर्तीवर एका ठिकाणी जास्त ताण पडल्यास किंवा योग्य आधार न मिळाल्यास तिच्या संरचनेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा मूर्तींच्या वाहतुकीसाठी केवळ मोठे वाहन पुरेसे नसून तांत्रिकदृष्ट्या योग्य पद्धतीचे नियोजन आवश्यक आहे. वाहतुकीदरम्यान मूर्ती झाकल्यामुळे धूळ, पाऊस किंवा अन्य बाह्य घटकांपासून संरक्षण मिळू शकते. मात्र, त्याच वेळी मूर्तीची प्रत्यक्ष स्थिती दिसत नसल्याने प्रवासादरम्यान तडे गेले आहेत का, आधार हलला आहे का किंवा मूर्तीचा समतोल बिघडला आहे का, हे लक्षात येणे कठीण होऊ शकते. त्यामुळे लांब पल्ल्याच्या वाहतुकीत ठराविक अंतराने मूर्तीची स्थिती तपासणे आवश्यक ठरते.

### मोठ्या मूर्तींच्या स्पर्धेचा पुनर्विचार गरजेचा?

गणेशोत्सवात मंडळांमध्ये आकर्षक आणि भव्य मूर्ती उभारण्याची स्पर्धा दिवसेंदिवस वाढत आहे. भक्ती, कलात्मकता आणि उत्साह यामुळे मोठ्या मूर्तींना विशेष पसंती दिली जाते. मात्र, मूर्ती जितकी मोठी तितका तिच्या निर्मितीचा खर्च, वेळ, वाहतूक आणि स्थापनेची जबाबदारीही वाढते. त्यामुळे मंडळांनी मूर्तीची उंची ठरवताना केवळ आकर्षणाचा विचार न करता उपलब्ध जागा, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षिततेच्या बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. मोठ्या मूर्ती दूरवरून वाहून आणण्याऐवजी मंडपाच्या ठिकाणीच त्यांची निर्मिती करण्याचा पर्याय काही गणेशभक्तांनी सुचवला आहे. यामुळे लांब पल्ल्याची वाहतूक टाळता येऊ शकते आणि मूर्तीला अंतिम स्वरूप त्याच ठिकाणी देता येऊ शकते. विशेषतः मोठ्या आकाराच्या मूर्तींसाठी हा पर्याय भविष्यात विचारात घेता येऊ शकतो. मात्र, त्यासाठी मंडळाकडे पुरेशी जागा, आवश्यक कालावधी आणि अनुभवी मूर्तिकार उपलब्ध असणे गरजेचे आहे.

### मूर्तींच्या नुकसानीची जबाबदारी कोणाची?

गणेशमूर्ती वाहतुकीदरम्यान दुभंगणे किंवा कोसळणे हा केवळ आर्थिक नुकसानाचा विषय नाही. मूर्ती उभारताना किंवा कारखान्यातून आणताना तसेच विसर्जनावेळी कोसळल्यास कार्यकर्ते आणि भाविकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. यापूर्वी मोठ्या मूर्ती कोसळून नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे अशा घटना घडल्यानंतर जबाबदारी निश्चित करण्यापेक्षा त्या घडूच नयेत यासाठी आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. मूर्ती ताब्यात घेण्यापूर्वी तिच्या बांधकामाची स्थिती, तडे, जोडणी, अंतर्गत आधार आणि सुकण्याची अवस्था तपासणे गरजेचे आहे. मूर्तीमध्ये काही त्रुटी आढळल्यास ती तातडीने वाहतुकीस काढण्याऐवजी मूर्तिकाराकडून आवश्यक दुरुस्ती करून घेणे योग्य ठरेल. मोठ्या रकमेचा व्यवहार झालेला असल्याने मंडळांनी मूर्तीची गुणवत्ता तपासणे आणि आवश्यक असल्यास कामाची जबाबदारी स्पष्टपणे निश्चित करणेही महत्त्वाचे ठरते.

### मूर्तिकारांची जबाबदारी किती?

मूर्तिकारांसाठीही जळगावची घटना विचार करण्यासारखी आहे. मोठी गणेशमूर्ती तयार करण्याची ऑर्डर स्वीकारल्यानंतर ती वेळेत पूर्ण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तिची मजबुती आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ग्राहकाकडून पूर्ण रक्कम मिळाल्यानंतर मूर्ती घाईने ताब्यात देण्यापेक्षा ती वाहतुकीसाठी योग्य आहे की नाही, याची खात्री करणे ही मूर्तिकाराचीही जबाबदारी आहे. जळगावातील घटनेने गणेशोत्सवातील मोठ्या मूर्तींच्या आकर्षणामागील सुरक्षिततेचा महत्त्वाचा पैलू समोर आणला आहे. मूर्तीची उंची, बांधकाम, सुकण्याचा कालावधी, वाहतुकीची पद्धत आणि प्रतिष्ठापनेची व्यवस्था या सर्व बाबींचा एकत्रित विचार करण्याची गरज आहे. मंडळे, मूर्तिकार आणि संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने सुरक्षिततेचे निकष निश्चित केले, तर अशा घटना टाळण्यास मोठी मदत होऊ शकते.

**-जितेंद्र पाटील**

# एमएसईबीची ॲल्युमिनियम तार चोरणारी टोळी जेरबंद

## सहा आरोपी अटकेत ; टाटा एससह ३.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

**माना ते जितापूर शेतशिवारातील महावितरणच्या लघुदाब वीजवाहिनीवरील ॲल्युमिनियमची तार चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा माना पोलिसांनी छडा लावला. कोणतेही सीसीटीव्ही फुटेज अथवा तांत्रिक पुरावे उपलब्ध नसतानाही पारंपरिक तपास पद्धती आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सहा जणांना अटक केली. आरोपींकडून चोरीची १०१ किलो ॲल्युमिनियमची तार आणि गुन्ह्यात वापरलेले टाटा एस वाहन असा एकूण ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**



माना येथील कनिष्ठ अभियंता पवन पातालबंसी यांनी २ सप्टेंबर रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. माना ते जितापूर शेतशिवारातील लघुदाब वीजवाहिनीच्या खांबावरील अंदाजे १ लाख ७ हजार रुपये किमतीची ॲल्युमिनियमची तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीवरून माना पोलिसांनी गुन्हा क्रमांक ३४२/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता तसेच कलम १३६ वीज कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज किंवा अन्य तांत्रिक पुरावा उपलब्ध नसल्याने पोलिसांसमोर आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी पारंपरिक तपास पद्धतीचा अवलंब करीत गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढला. गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सहा जणांना ताब्यात घेण्यात आले.

अब्दुल रईस अब्दुल शहीद (४६), भारत श्रीकृष्ण सूर्यवंशी (३३), लखन श्रीकृष्ण सूर्यवंशी (२७), धीरज दिलीप पांडे (२६), रूपराव किसनराव टोपे (५६), सर्व रा. नवीन घरकुल, मूर्तिजापूर, तसेच शेख आसीम शेख साबीर (२४, रा. सोनखेडी, मूर्तिजापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपींकडून चोरीच्या ॲल्युमिनियम तारेपैकी १०१ किलो वजनाची तार, अंदाजे १ लाख ७ हजार रुपये किमतीची, तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा एस वाहन, अंदाजे २ लाख रुपये किमतीचे, असा एकूण ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक आरोपींना १२ सप्टेंबर रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिल्यानंतर त्यांना अकोला जिल्हा मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.

### माना पोलिसांच्या तपास पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि मूर्तिजापूर उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मूळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. माना पोलीस ठाण्याचे ठाणेदार गणेश नावकार, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप जोगदंड, पोलीस हवालदार सर्वेश कांबे, पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर राणे, जावेद खान आणि प्रमोद हिवराळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# बसस्थानकावरील पाकीट चोरीची घटना उकल

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील बसस्थानकावर प्रवाशाच्या खिशातील सुमारे ५० हजार रुपये असलेले पाकीट चोरून नेल्याच्या गुन्ह्याची सिव्हील लाईन पोलिसांनी उकल केली. या प्रकरणात एका २५ वर्षीय आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीच्या रकमेपैकी ३८ हजार ५०० रुपये रोख जप्त करण्यात आले.

आत्माराम ज्ञानेश्वर ब्राह्मण (४९, रा. सुधीर कॉलनी, रेवी नगर, अकोला) यांनी ११ सप्टेंबर रोजी सिव्हील लाईन पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ते सायंकाळी बसस्थानकावर बसची वाट पाहत असताना त्यांच्या खिशातील पाकीट अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. पाकिटात सुमारे ५० हजार रुपयांची रोख रक्कम होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा क्र. ६१७/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना



### ३८ हजार ५०० रुपये जप्त ; एक ताब्यात

पोलिसांनी गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे संशयिताचा शोध घेतला. तपासादरम्यान शेख वकील शेख हाफिज (२५, रा. रऊफनगर, सोहेल टॉवर प्लॉट, अकोला) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर आरोपीच्या अंगझडती व घरझडतीमध्ये चोरीस गेलेल्या रकमेपैकी ३८ हजार ५०० रुपये रोख जप्त करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास सिव्हील लाईन पोलिस करीत आहेत. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मालती कायटे यांच्या नेतृत्वात पोहेकॉ प्रदीप शिरसाट, पोहेकॉ प्रदीप पवार, पोहेकॉ यादव तसेच इतर अधिकारी व अंमलदारांनी ही कारवाई केली.

## जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५२५/२०२६ — प्रोसेस नं. ११४५५/२०२६
चौ.ता. ०५/११/२०२६ — दिनांक : ०७/०९/२०२६

**अर्जदार :** सुलोचना नारायण अरोरा रा. १२, गोविंद अपार्टमेंट, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुमित नारायण अरोरा
**पत्ता :-** रा. १२, गोविंद अपार्टमेंट, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमित नारायण अरोरा यांचे दि. १३/०४/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२३/२०२६ — प्रोसेस नं. १२०३/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ — दिनांक : ०४/०९/२०२६

**अर्जदार :** १. शांताबाई अमृता चोंडकर (लग्नानंतरचे नाव), वय ८८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. शिर्ला ता. पातुर, जिल्हा अकोला ह.मु. सोनुना, पो. चोंढी, ता. पातूर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : गावनाबाई तुकाराम गिऱ्हे
**पत्ता :-** रा. मौजा शिर्ला, ता. पातूर, जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गावनाबाई तुकाराम गिऱ्हे यांचा मृत्यु दि. १४/०४/१९९८ रोजी मौजे शिर्ला, ता. पातूर, जि. अकोला येथे झाला. मयत यांचा मुलगा व पती मयत हे सुध्दा मयत आहेत. वरील अर्जदार हया त्यांच्या कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२४/२०२६ — प्रोसेस नं. १२००/२०२६
चौ.ता. १९/१०/२०२६ — दिनांक : ०४/०९/२०२६

**अर्जदार :** १. नारायण संपत राव, वय - ५८ वर्षे, धंदा मजुरी

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : चिंतामण सोनाजी राव,
**पत्ता :-** रा. कोसगांव, पो. माळराजुरा, ता. पातुर जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चिंतामण सोनाजी राव यांचा मृत्यु दि. ०३/०३/१९९६ रोजी माळराजुरा, ता. पातुर जि. अकोला येथे झाला. मयताची आई व भाउ हे सुध्दा मयत आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

# श्रीकृष्ण जन्माष्टमीचा जल्लोष संपन्न

■ प्रतिनिधी | अकोल ■

गीता नगर सखी मंडळाच्या वतीने श्री रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात कृष्ण जन्माष्टमी उत्सव संपन्न झाला. या उत्सवात चंदना लटूरिया यांनी नंदबाबा व नेहा साहू यांनी यशोदा मैय्या यांची झाकी साकारली. बालकृष्णाच्या रूपात साकारलेल्या किायारा गुप्ता यांचे सर्व सख्यांनी फुलांच्या वर्षाव करून स्वागत केले. सर्वात प्रथम सरला शर्मा व सरिता शर्मा यांनी सर्व सख्यांचे टिळक व पुष्पवर्षा करून स्वागत केले. अर्चना अग्रवाल व सरला गाडोदिया यांनी कामात सहकार्य केले. वैशाली सोनी, चंदना लटूरिया व रूपा अग्रवाल यांनी सर्व सख्यांना टेबल गेम खेळवले. मुलांची फॅन्सी ड्रेस स्पर्धा दोन श्रेणीमध्ये घेण्यात आली. तर पगडी सजाओ स्पर्धेत भाग घेतला.

# सण-उत्सवांच्या काळात मूलभूत सुविधांना प्राधान्य द्या

## महापौर शारदा खेडकर यांचे प्रशासनाला निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, असे निर्देश महापौर शारदा रणजित खेडकर यांनी गुरुवारी प्रशासनाला दिले.

गणेशोत्सव, नवदुर्गोत्सव तसेच विविध धर्मीय सणांच्या काळात शहरातील सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, बाजारपेठा आणि उत्सव मंडळांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे या काळात पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे आणि रस्ते यासारख्या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

### पाणी, स्वच्छता, पथदिवे व रस्ते दुरुस्तीवर भर



सणांच्या काळात पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता असल्याने शहरातील प्रत्येक भागात पुरेसा व शुद्ध पाणीपुरवठा वेळेवर होईल, यासाठी पूर्वतयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उत्सव मंडळे, विसर्जन मार्ग, मंदिरे आणि गर्दीच्या ठिकाणी कचरा साचू नये यासाठी अतिरिक्त सफाई पथके तैनात करण्याबरोबरच कचरा संकलन वाहनांच्या फेऱ्याही वाढविण्यात याव्यात, असे सांगण्यात आले.

रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुख्य रस्ते, गल्लीबोळ आणि उत्सव मंडळांच्या परिसरातील बंद पथदिवे तातडीने दुरुस्त करून सुरू करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच मिरवणुका आणि नागरिकांची ये-जा सुरळीत होण्यासाठी प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवून रस्ते दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. 'सण-उत्सव हा आनंदाचा काळ आहे.

# फिजिओथेरपी असो.चा वार्षिक सोहळा



■ प्रतिनिधी | अकोला ■

जागतिक फिजिओथेरपी दिनाच्या पूर्वसंध्येवर औद्योगिक वसाहतीतील बारोमास सभागृहात अकोला असो. ऑफ फिजिओथेरपिस्ट व सन्मती फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या सहकार्याने फिजिओमीट २०२६ हा संवादात्मक कार्यक्रम संपन्न झाला. असो.चे अध्यक्ष डॉ दर्शन लड्ढा यांच्या अध्यक्षतेत संपन्न या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ नेत्रतज्ञ व जीवन प्रेरक अमरावती येथील डॉ अनुराधा तोटे, महा ओटीपीटी कौन्सिलचे माजी अध्यक्ष डॉ. सुदीप काळे मुंबई, हे वर्चुअल उपस्थित होते, तर मंचावर असो.चे सचिव डॉ प्रणव पाथरकर, सहसचिव डॉ दुर्गा लड्ढा, कोषाध्यक्ष डॉ विद्याधर वनवे, पिआरओ डॉ मेघना बगडिया गांधी, सन्मती फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष बेले आदी उपस्थित होते. डॉ. हेमंत लोंढे यांच्या गणेश वंदना व सन्मती फिजीओथेरपी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीं च्या स्वागत नृत्याने या कार्यक्रमाचा रंगारंग प्रारंभ झाला.

# भूषण देशमुख राष्ट्रीय गुणगौरव पुरस्काराने सन्मानित



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातील सामाजिक वनीकरण विभाग, अकोला येथे वनरक्षक म्हणून कार्यरत असलेले अकोल्याचे रहिवासी भूषण दत्तात्रय देशमुख यांना सामाजिक, पर्यावरण, वन्यजीव व वृक्षसंवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार २०२६'ने सन्मानित करण्यात आले. बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने ६ सप्टेंबर रोजी शिर्डी येथील श्री साईनाथ पालखी निवारा येथे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात भूषण देशमुख यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, श्री साई पादुका, शाल व श्रीफळ प्रदान करून गौरविण्यात आले.

भूषण देशमुख हे गेल्या १२ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रमांमध्ये त्यांनी योगदान दिले आहे. शासकीय सेवेसोबतच वृक्षांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती येथे सुमारे सात वर्षे त्यांनी केलेल्या कार्याचीही या पुरस्कारासाठी दखल घेण्यात आली.


# जागेच्या वादातून रक्तरंजित संघर्ष

## पिकअपने धडक दिल्याने ७० वर्षीय वृद्धेचा मृत्यू

■ प्रतिनिधी | अकोला ■

बार्शीटाकळी तालुक्यातील जांभवासू येथे जमीन व जागेच्या जुन्या वादातून झालेल्या संघर्षाला शुक्रवारी हिंसक वळण मिळाले. बोलेरो पिकअप वाहनाने घराच्या परिसरात धोकादायक पद्धतीने धडक दिल्याने मनाबाई मकरम जाधव (७०) या गंभीर जखमी झाल्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेत वाहनचालकही जखमी झाल्याची माहिती आहे. घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जांभवासू गावात दोन गटांमध्ये जमीन व जागेवरून मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता. १० सप्टेंबर रोजी पोळा सणाच्या दिवशीही याच



### जांभवासू येथे थरारक घटना; व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल, तीन संशयित ताब्यात

कारणावरून दोन्ही गट आमनेसामने आले होते. याप्रकरणी बार्शीटाकळी पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. मात्र, तक्रारीनंतरही वादाची धग कायम राहिल्याचे या घटनेवरून दिसून आले.

घटनेच्या व्हायरल व्हिडिओमध्ये बोलेरो पिकअप वाहन चालक घराच्या परिसरात वाहन मागे-पुढे वेगाने नेत असल्याचे दिसून येते. वाहन थांबविण्यासाठी ग्रामस्थांनी आरडाओरड करीत चालकाला रोखण्याचा प्रयत्न केला. काही तरुणांनी वाहन थांबविण्यासाठी दगडफेकही केल्याचे व्हिडिओत दिसत आहे. मात्र, वाहनचालकाने वाहन न थांबविता वृद्धेला धडक दिल्याचे समोर आले आहे. या धडकेत मनाबाई जाधव गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच बार्शीटाकळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. गावातील तणावाची स्थिती लक्षात घेऊन अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, घटनेमागील नेमका हेतू, वाहनचालकाची भूमिका तसेच या वादामागील अन्य व्यक्तींचा सहभाग याबाबत तपास सुरू आहे.

जमीन-जागेच्या वादातून घडलेल्या या गंभीर घटनेने गावातील जुना वाद आता रक्तरंजित संघर्षात परिवर्तित झाल्याचे चित्र आहे. प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

# गोवंश तस्करीवर 'ऑपरेशन प्रहार'ची कारवाई ; आठ गोवंशांना जीवदान

■ प्रतिनिधी | अकोला ■

कत्तलीच्या उद्देशाने गोवंशांची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध अकोला पोलिसांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत शहर विभागातील उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने कारवाई करीत आठ गोवंशांची सुटका केली. या कारवाईत गोवंश तस्करीसाठी वापरण्यात आलेले महिंद्रा बोलेरो वाहनासह एकूण ७ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रविवारी (१३ सप्टेंबर) रामदासपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तेलीपुरा चौक परिसरातून कत्तलीच्या उद्देशाने गोवंशांची वाहतूक होणार असल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या पथकाला मिळाली. माहितीची खातरजमा करून त्यांच्या परवानगीने रामदासपेठ पोलिस ठाणे आणि आरसीपी प्लाटूनच्या मदतीने परिसरात छापा

### ७ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; आरोपी फरार



टाकण्यात आला.

यावेळी एमएच ३० एए ३४९४ क्रमांकाच्या महिंद्रा बोलेरो वाहनातून तसेच परिसरात कत्तलीसाठी घेऊन जाण्याच्या उद्देशाने निर्दयतेने कोंबून ठेवलेले आठ गोवंश आढळून आले. यातील काही जनावरे जखमी अवस्थेत होती. पोलिसांनी तातडीने सर्व गोवंशांची सुटका करून त्यांना उपचार व देखरेखीसाठी सुरक्षित ठिकाणी हलविले. या प्रकरणात आठ गोवंश आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेले वाहन असा एकूण ७ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कारवाईनंतर आरोपी फरार झाले असून, त्यांच्याविरुद्ध रामदासपेठ पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक कायदा तसेच मोटार वाहन कायद्यातील विविध तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि रत्नदीप पळसपगार, पोलिस कॉन्स्टेबल मोहम्मद नदिम, प्रफुल्ल बांगर, रामदासपेठ पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार सुरेश लांडे, रोशन पटले, संतोष सुराशे, आरसीपी-०३चे पथकप्रमुख विजय दुबे व त्यांच्या पथकाने केली.

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# संगणकशास्त्र व परमाणुशास्त्र विभागात 'फ्रीलान्सिंग' विषयावर अतिथी व्याख्यान



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील संगणकशास्त्र व परमाणुशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी 'Freelancing' या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर सर होते, तर आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा.एस. ए. वाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. योगेश खंडारे सर व प्रो. अश्विनी अंबाडकर मॅडम, संगणकशास्त्र विभाग, विनायक विज्ञान महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. कुनिका रोंघे, परमाणुशास्त्र विभाग यांनी करून दिला.

प्रमुख वक्ते प्रा. योगेश खंडारे व .प्रा. अश्विनी अंबाडकर यांनी विद्यार्थ्यांना फ्रीलान्सिंग क्षेत्रातील विविध संधींबाबत सविस्तर व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन केले. फ्रीलान्सिंग म्हणजे काय, विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सचा वापर करून तांत्रिक कौशल्यांच्या आधारे स्वतंत्रपणे काम कसे मिळवता येते, याबाबत त्यांनी माहिती दिली.

व्याख्यानाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांची विविध फ्रीलान्सिंग प्लॅटफॉर्म्सवर प्रोफाइल तयार करून देण्यात आली. प्रोफाइलचा प्रभावी वापर कसा करावा, स्वतःची कौशल्ये योग्य पद्धतीने कशी मांडावी, प्रोजेक्ट्स व कामाच्या संधी कशा शोधाव्यात, त्यासाठी अर्ज कसा करावा तसेच ग्राहकांशी व्यावसायिक पद्धतीने संवाद कसा साधावा, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना फ्रीलान्सिंग क्षेत्रात काम करण्याच्या प्रत्यक्ष प्रक्रियेची प्राथमिक ओळख झाली.

यावेळी आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. एस. ए. वाणी सर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. डिजिटल युगात ज्ञानासोबत कौशल्यांना महत्त्व असून फ्रीलान्सिंगच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या ज्ञानाचे व कौशल्यांचे रोजगाराच्या संधींमध्ये रूपांतर करू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर सर यांनी तंत्रज्ञान क्षेत्रातील वेगवान बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत, असे सांगितले. केवळ पदवी प्राप्त करणे पुरेसे नसून व्यावहारिक ज्ञान, तांत्रिक कौशल्य, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि संवादकौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फ्रीलान्सिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यांच्या आधारे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात, त्यामुळे अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये प्रा. पल्लवी देशमुख, प्रा. भाग्यश्री बेलसरे, प्रा. वेदिका सरोसरे व प्रा. कुनिका रोंघे यांनी विशेष भूमिका बजावली. संगणकशास्त्र व परमाणुशास्त्र विभागाच्या संयुक्त प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेल्या या अतिथी व्याख्यानास B.Sc. च्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अतिथी व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना फ्रीलान्सिंग क्षेत्रातील विविध प्लॅटफॉर्म्स, प्रोफाइल तयार करण्याची पद्धत, कामाच्या संधी शोधणे आणि डिजिटल माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याबाबत प्रत्यक्ष व उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.

# शहरात आता प्रौढ बेपत्ता झाल्यास अपहरणाचा गुन्हा होणार दाखल

## सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर पोलिसांची कारवाई

### १० पोलीस ठाण्यातील ५५ बेपत्ता प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** आतापर्यंत अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी बेपत्ता झाल्यासच अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला जात होता. प्रौढ व्यक्ती बेपत्ता झाल्यास केवळ मिसिंग तक्रार दाखल करून शोध घेतला जात होता. मात्र, आता हा नियम बदलला आहे. सुप्रीम कोर्टाच्या नव्या आदेशानंतर प्रौढ व्यक्ती बेपत्ता झाल्यासही पोलिसांना अपहरणाचा गुन्हा दाखल करावा लागणार आहे.सुप्रीम कोर्टाने २२ मे २०२६ रोजी आदेश दिला होता की, बेपत्ता व्यक्तीची माहिती मिळताच तात्काळ एफआयआर दाखल करावी. मात्र काही राज्यांनी 'व्यक्ती' या शब्दाचा अर्थ केवळ 'लहान मुले' असा लावला. यावर ५ ऑगस्ट रोजी खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. खंडपीठाने स्पष्ट केले की, 'व्यक्ती' म्हणजे प्रत्येक व्यक्ती, मग ती महिला असो, पुरुष असो, मूल असो वा वृद्ध. हा आदेश सर्वांसाठी लागू आहे. आदेशाचे अक्षरशः पालन न केल्यास संबंधित राज्याच्या मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांच्यावर अवमाननेची कारवाई केली जाईल, असा इशाराही कोर्टाने दिला आहे. सुप्रीम कोर्टाचा आदेश थोड्या उशिराने अमरावती पोलिसांना प्राप्त झाला. आदेश मिळताच पोलिसांनी शहरातील सर्व दहा पोलीस ठाण्यांमधील प्रौढ व्यक्ती बेपत्ता प्रकरणांची माहिती गोळा केली. यामध्ये सुमारे ५५ जण बेपत्ता असल्याचे आढळून आले.पोलिसांनी संबंधित तक्रारदारांना पोलीस ठाण्यात बोलावून बेपत्ता व्यक्ती घरी परत आली आहे का, याची खात्री केली.जी व्यक्ती अद्याप घरी परत आलेली नाही, अशा सर्व ५५ प्रकरणांमध्ये शनिवार संध्याकाळपर्यंत अज्ञात आरोपींविरुद्ध अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.जी व्यक्ती घरी परत आली आहे, त्यांच्या प्रकरणांमध्ये चौकशी पूर्ण करून कोर्टात बी-फायनल रिपोर्ट सादर केला जाणार आहे.आता अल्पवयीनांप्रमाणेच प्रौढांच्या बेपत्ता प्रकरणांचाही पोलिसांकडून गांभीर्याने तपास केला जाणार असून, बेपत्ता व्यक्ती परत आल्यास तिच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवली जाणार आहे.

# जी.एच. रायसोनी विद्यापीठात आंतरिक हॅकथॉन संपन्न



**अमरावती/प्रतिनिधीः-** जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे नुकतीच स्मार्ट इंडिया हॅकथॉन (एसआयएच) २०२६चा अंतर्गत आंतरिक हॅकथॉन यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी त्यांची सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि उद्योजक विचारसरणी दाखवण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरला. त्यात त्यांनी वास्तविक आव्हानांवर उपाययोजना सादर केल्या.

देशव्यापी स्मार्ट इंडिया हॅकथॉन २०२६ उपक्रमांतर्गत आयोजित या अंतर्गत हॅकथॉनचा उद्देश विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वोत्तम संघांची निवड करणे हा होता. एकूण ३४ संघांतील २०४ उत्साही सहभागींनी बहु-विषयक गट तयार करून आरोग्यसेवा, शाश्वतता, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, शिक्षण, सायबर सुरक्षा आणि डेटा सायन्स यांसारख्या विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण उपाययोजना सादर केल्या.

स्पर्धेची सुरुवात प्रेरणादायी उद्घाटन समारंभाने झाली. एसआयएच २०२६चे एसपीओसी डॉ. अमोल झाडे यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक मर्यादा ओलांडून विचार करण्यास आणि समाजासाठी प्रभावी उपाय विकसित करण्यास प्रोत्साहित केले. यावेळी जी एच रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता डॉ. अमित गायकवाड यांची उपस्थिती लाभली. सहभागींना संबोधित करताना डॉ. स्नेहिल जायसवाल यांनी प्रेरणादायी भाषण दिले. तर कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी नवाचार, सहकार्य आणि तंत्रज्ञान-आधारित उपायांच्या महत्त्वावर भर देत असे मंच विद्यार्थ्यांना जागतिक नवप्रवर्तक बनण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार आणि सर्जनशील समस्या-निराकरण स्वीकारण्याचे आवाहन केले.

दिवसभर सहभागींनी सखोल विचारमंथन, प्रोटोटाइप विकास आणि आपल्या प्रकल्पांचे थेट प्रदर्शन केले. निर्णायक मंडळात डॉ. महिप बरतरे, डॉ. स्नेहा बोहरा, डॉ. नागार्जुन यादव, डॉ. राजश्री वानखडे, डॉ. भुमाई जुला आणि प्रा. नावेद हक यांचा समावेश होता. त्यांनी नवाचार, व्यवहार्यता, तांत्रिक गुंतागुंत आणि सामाजिक प्रभाव या निकषांवर प्रविष्ट्यांचे मूल्यमापन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुंधरा आणि अतुफा यांनी केले. एसआयएच अंतर्गत हॅकथॉनचे यशस्वी आयोजन जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती यांच्या उद्योजकता आणि तांत्रिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याच्या वचनबद्धतेचे दर्शन घडवते. हे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील एसआयएच २०२६च्या ग्रँड फिनालेत सहभागी होण्याचा मार्ग मोकळा करते.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६

## गणेश मंडळांना सहभागाचे आवाहन -लाखो रुपयांची पारितोषिके

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती तालुका, जिल्हा, राज्य यासोबतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढविण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र मंडळांना पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या ganeshotsav.pldmka.co.in या अधिकृत पोर्टलवर अर्ज सादर करता येणार आहे. स्पर्धा पूर्णपणे विनामूल्य असून, केवळ संबंधित शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असलेल्या संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाच यामध्ये भाग घेता येईल.

या संपूर्ण स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई कार्य पाहत आहे. स्पर्धेतील विजेत्यांना विविध स्तरांवर आकर्षक रोख बक्षिसे व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये रोख.जिल्हा स्तर: प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३० हजार रुपये रोख. तर राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे ७ लाख ५० हजार रुपये, ५ लाख रुपये आणि २ लाख ५० हजार रुपये रोख असे आहे.

याशिवाय, जिल्हास्तरावरून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडल्या जाणाऱ्या इतर मंडळांनाही शासन निर्णयानुसार प्रोत्साहनपर पारितोषिके दिली जातील. विजेत्यांची निवड प्रत्येक स्तरावर गठीत करण्यात आलेल्या विशेष निवड समितीमार्फत अत्यंत पारदर्शक पद्धतीने केली जाईल.अमरावती जिल्ह्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी त्वरित अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी आणि विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे .

# भरत नगर येथील रस्ता भूमिपूजन उपमहापौर सचिन भेंडे यांच्या हस्ते संपन्न



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगर पालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांच्या प्रयत्नाने साई नगर प्रभागातील विविध भागात विकास कामे होत असून भरत नगर येथील रस्ता बांधकाम भूमिपूजन करण्यात आले.

असाच निरंतर विकास सुरू राहील असे आश्वासन त्यांनी दिले. सदर प्रसंगी देवा शेंडे, अमोल इंगळे , प्रशांत कावरे, श्याम कथे, प्रमोद चिंचमलातपुरे, संजय रागुवांशी, दिलीप पानझडे, प्रशांत साखरे, जगदीश सोमवंशी, सतीश गुल्हणे, पराते सर, ठोकळ , काकडे काका, भानुसे मॅडम, करडे मॅडम, वरघट, तथा प्रभागातील असंख्य नागरिक, माता भगिनी, तरुण मंडळी उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यात 'श्रीगणेश आरोग्याचा' उपक्रम

## गणेशोत्सव मंडळांच्या सहभागातून आरोग्य शिबिरे, आरोग्याची लोकचळवळ' उभारण्याचा संकल्प

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणरायाच्या आगमनासोबतच समाजामध्ये आरोग्याचा जागर करण्याच्या उद्देशाने 'श्रीगणेश आरोग्याचा' हा अभिनव उपक्रम अमरावती जिल्ह्यात व्यापक स्तरावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांच्या समन्वयाने हा उपक्रम लोकचळवळीचे स्वरूप घेणार आहे.

सचिवालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात 'श्रीगणेश आरोग्याचा' हा उपक्रम उत्स्फूर्तपणे राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर अमरावती जिल्ह्यातही गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'आरोग्य सर्वांसाठी' हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्था, महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्था, धर्मादाय संस्थांतर्गत नोंदणीकृत रुग्णालये तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व आयुष्मान भारत योजनेशी संलग्न रुग्णालये सक्रियपणे सहभागी होणार आहेत.

जिल्ह्यातील विविध गणेशोत्सव मंडळांशी समन्वय साधून त्यांच्या कार्यक्षेत्रात आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी, विविध आजारांचे प्राथमिक निदान, आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच पात्र नागरिकांना विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती देण्यात येणार आहे. या माध्यमातून आरोग्यसेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासोबतच आजारांचे वेळेवर निदान आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियोजनाला गती-

निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबंधित अधिकारी तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना 'श्रीगणेश आरोग्याचा' उपक्रमाबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक संबंधित आरोग्य संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य शिबिरांचे नियोजन करून त्याचा आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत बोलताना जिल्हाधिकारी आशिष येरेकर म्हणाले, 'संपूर्ण राज्यात ज्या उत्साहाने आणि भावनेने 'श्रीगणेश आरोग्याचा' हा उपक्रम राबविला जात आहे, त्याच उत्साहाने अमरावती जिल्ह्यातही हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित आरोग्य संस्थांना या उपक्रमात सहभागी होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा केवळ आरोग्य शिबिरांचा उपक्रम न राहता, नागरिकांच्या सहभागातून उभी राहणारी 'आरोग्याची लोकचळवळ' म्हणून हा उपक्रम पुढे यावा, हा आमचा संकल्प आहे.'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. नागरिकांनी आपल्या परिसरातील आरोग्य शिबिरांमध्ये सहभागी होऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे आणि पात्रतेनुसार उपलब्ध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतार दिन साजरा



**अमरावती :** जिल्हाधिकारी कार्यालयात महानुभाव पंथाचे प्रवर्तक, समाजसुधारक व तत्त्वज्ञ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा अवतार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी गोविंदा दानेज यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्य, समाजसुधारणेतील योगदान तसेच मानवतावादी विचारांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ११
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## जाहीर नोटीस

नमुना क्रमांक - १

**अमरावती येथील मा.वि.प्र.पाटकर, प्रमुख न्यायाधीश, कौटुंबीक न्यायालय यांच्या न्यायालयातील**

**पिटीशन क्र. अ-२६२/२०२५** — **पेशी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२६**

**सौ. सरोज जगदिश देशमुख** — वादी

**विरुध्द**

**जगदिश चंद्रशेखर देशमुख** — प्रतिवादी

**प्रति,**

**जगदिश चंद्रशेखर देशमुख रा.लोहारा ता.जि.यवतमाळ.**

ज्याअर्थी उपरनामित अर्जदारांनी आपल्या विरुध्द वाद पत्रात नमुद केल्या प्रमाणे दावा दाखल केला आहे.

आपणास हे समन्स बजावल्यापासुन ३ आठवडयाच्या आत न्यायालयाच्या परवानगीसह व्यक्तीश आपली उपस्थिती याव्दारे आवश्यक आहे, आणि त्याअर्थी सदरहू दावा निर्देशाकरीता दिनांक १४ **ऑक्टोंबर २०२६** दिवशी न्यायाधीशांच्या बोर्डावर ठेवण्यात येईल.

आपणास या व्दारे फर्माविण्यात येते की, आपण वादीच्या दाव्याला उत्तर देण्याकरीता न्यायाधीशांच्या समोर दिनांक **१४ ऑक्टोंबर २०२६** याा दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित पक्षकाराचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायाधीश, कौटुंबीक न्यायालयाचे समूपदेशक यांचे समोर सुनावणीच्या तारखे संबंधी आणि पिटीशन संबंधातील अन्य प्रकरणाबाबत निर्देश देतील याची नोंद घ्यावी.

आपणास अधिक अशीही सूचना देण्यात येते की, आपणावर निर्देश दिल्या प्रमाणे व्यक्तीगत आपली उपस्थिती दाखल करण्या कामी कसुर केल्यास किंवा वर नमूद केलेल्या दिवशी न्यायाधीशा समोर उपस्थित राहण्यास कसुर केल्यास पिटीशन त्याच दिवशी किवा कोणत्याही पुढील दिवशी बचाव दिलेला नाही या मथळयाखाली बोर्डावर ठेवण्यात येईल आणि आपणा विरुध्द हुकूमनामा किंवा आदेश संमतपात्र राहाल.

मुख्य न्यायाधिश कौटुंबिक न्यायालय, अमरावती यांचे साक्षेने आज दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**प्र. प्रबंत्रक,**
**कौटुंबिक न्यायालय, अमरावती**

## कार्यालय अचलपूर नगर परिषद, जि. अमरावती

**निविदा क्रमांक :- साबावि/११/२०२६-२७**

**-: निविदा रद्दबाबत सूचना :-**

**विभाग :- नगर परिषद बांधकाम विभाग**

**नगर परिषद निधी अंतर्गत** विविध ठिकाणी नाली, रपट्याचे बांधकाम करणे व छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाच्या आवार भिंतीला रंगरंगोटी करणे, नगराध्यक्ष यांचे दालनात सी.सी.टी.व्ही. सह मॉनिटर बसविणे, गणपती विसर्जनाकरीता पाच ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे इत्यादी कामे करण्याकरीता ऑफलाईन या निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर निविदा सुचनेमध्ये नजरचुकीने कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करून घेण्याचा व सादर करण्याचा कालावधी दिनांक १५/०९/२०२६ ते १८/०९/२०२६ असा नमुद करण्यात आला होता. सदर कालावधी तांत्रिकदृष्ट्या विसंगत असल्याने प्रशासकीय कारणास्तव निविदा रद्द करण्यात येत आहे.

**दिनांक :- १०/०९/२०२६**

**(धिरजकुमार गोहाड)**
**मुख्याधिकारी**
**अचलपुर नगर परिषद**

## संक्षिप्त

### फ्रीजच्या वादातून भावाने भावाच्या डोक्यात डबा मारला

**अल्लीपूर** - फ्रीज नेण्यावरून झालेल्या वादात भावाने भावाच्या



डोक्यावर स्टीलचा डबा मारून जखमी केल्याची घटना पिंपळगाव हाते येथे घडली. आशीष पुरुषोत्तम चिखले हे शेतमजुरीचे काम करतात. त्यांचा मोठा भाऊ सचिन चिखले हा बाहेरून घरी आला. फ्रीज घेऊन जाण्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. फ्रीज वडिलांनी घेतला असल्याचे आशीष यांनी सांगितले. यावरून सचिन याने आशीष यांच्याशी वाद घातला. त्यानंतर फ्रीजला लाथ मारली. लाथ का मारतोस असे विचारल्यावर सचिन याने स्वयंपाकघरातील स्टीलचा डबा उचलून आशीष यांच्या डोक्यावर मारला. यात त्यांच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाला. आशीष यांनी आईला आवाज दिल्यानंतर कुटुंबीयांनी धाव घेतली आणि सचिनला तेथून दूर केले. यावेळी सचिन याने जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तक्रारीवरून अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### दारू पिण्यासाठी न आल्याने मित्रावर चावीने हल्ला

**हिंगणघाट**-दारू पिण्यासाठी सोबत येण्यास नकार दिल्याने मित्राने तरुणाच्या डोक्यावर दुचाकीची चावी मारून जखमी केल्याची घटना रामनगर परिसरात घडली. स्वागत इनप्रसाद चादर वय २६ वर्षे रा. रामनगर हिंगणघाट यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. स्वागत हे घरी असताना त्यांचा मित्र आदर्श रंजीत गोलाईत याने दारू पिण्यासाठी बाहेर जाण्यास फोन केला. स्वागत यांनी फोन न घेतल्याने त्याने पत्नीच्या फोनवर संपर्क साधला. त्यानंतर आदर्श हा स्वागत यांच्या घरासमोर आला आणि बाहेर जाण्यास सांगितले. स्वागत यांनी नकार दिल्याने आदर्श याने धमकी देत दुचाकीची चावी काढली आणि त्यांच्या डोक्यावर तसेच डोळ्याजवळ मारहाण केली. शेजाऱ्यांनी हस्तक्षेप करून वाद सोडविला. जखमी स्वागत यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आदर्श गोलाईत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### जुन्या वादातून महिलेच्या डोक्यात काठीने प्रहार

समुद्रपूर - जुन्या वादातून महिलेच्या डोक्यात लाकडी काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना सावरखेडा येथे घडली. गजानन मनोहरराव कुजमते रा. सावरखेडा यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली आहे. जुन्या वादातून आरोपी रोशन कुजमते याने गजानन यांच्या आईला डोक्यात लाकडी काठीने मारहाण केली. या मारहाणीत महिला गंभीर जखमी झाली. दरम्यान आरोपी भूषण कुजमते आणि सुनिता कुजमते यांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर जखमी महिलेला उपचारासाठी सेवाग्राम येथे हलविण्यात आले. वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली आहे. फिर्यादीच्या तोंडी तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध मारहाण शिवीगाळ आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# दोन वर्षांपासून घोषणा हवेतच

## वृत्तपत्र विक्रेत्यांचा ९ ऑक्टोबरला राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा

### कल्याणकारी मंडळाच्या अंमलबजावणीसाठी परिवारासह रस्त्यावर उतरण्याचा निर्धार

**वर्धा/जनमाध्यम**

वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची घोषणा होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. सरकारच्या या दिरंगाईविरोधात महाराष्ट्रातील वृत्तपत्र विक्रेत्यांनी आता आरपारच्या लढाईचा निर्धार केला आहे. वर्ध्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांत ९ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयांवर परिवारासह मोर्चा काढण्यात येणार आहे. सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या राज्य कार्यकारणी बैठकीत आंदोलनाची हाक देण्यात आली.




राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर येथील समृद्धी गार्डनमध्ये बैठक झाली. कार्याध्यक्ष बालाजी पवार आणि सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत राज्यभरातील पदाधिकाऱ्यांनी कल्याणकारी मंडळाच्या प्रश्नावर सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या स्वतंत्र कल्याणकारी मंडळासाठी गेल्या अनेक वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून निवेदने आंदोलने आणि बैठका घेण्यात आल्या. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षांपूर्वी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची घोषणा केली होती. मात्र घोषणा झाली तरी मंडळाच्या अंमलबजावणीचा मार्ग अद्याप मोकळा झालेला नाही. त्यामुळे आता केवळ आश्वासनांवर समाधान न मानता रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

९ ऑक्टोबरचा मोर्चा केवळ जिल्हास्तरावर मर्यादित न ठेवता तालुका आणि जिल्हा पातळीवर व्यापक करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तसेच तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वृत्तपत्र विक्रेता आणि त्यांच्या परिवाराने मोठ्या संख्येने सहभागी होऊन सरकारचे लक्ष वेधावे असे आवाहन सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी केले.

बैठकीत संघटनेच्या स्वावलंबी कल्याणकारी कोषाबाबतही चर्चा झाली. या कोषासाठी विविध माध्यमांतून निधी संकलित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच नोव्हेंबर ते डिसेंबरदरम्यान राज्य संघटनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवड सभा घेण्याचे ठरविण्यात आले. १५ ऑक्टोबर या वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधून राज्य संघटनेचे सभासद नोंदणी अभियान राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला. आता सरकारच्या घोषणेचे रूपांतर प्रत्यक्ष कल्याणकारी मंडळात कधी होते याकडे राज्यातील हजारो वृत्तपत्र विक्रेत्यांचे लक्ष लागले आहे. ९ ऑक्टोबरचा मोर्चा हा या प्रश्नावर सरकारला दिलेला थेट इशारा मानला जात आहे.

## डागा रुग्णालयातून चोरीला गेलेली दुचाकी जप्त

### वर्धा शहर पोलिसांची कारवाई,आरोपी महेश वांढरे अटकेत

**वर्धा/जनमाध्यम**

डागा रुग्णालय परिसरातून चोरीला गेलेली दुचाकी वर्धा शहर पोलिसांनी अवघ्या काही वेळात शोधून काढत आरोपीला अटक केली. शादाब मन्सुरी इकबाल मन्सुरी वय २३ वर्षे रा. सेलू हे १० सप्टेंबर रोजी दुपारी कामानिमित्त डागा रुग्णालयात गेले होते. त्यांनी रुग्णालय परिसरात उभी केलेली हिरो कंपनीची स्पेंडर एक्सटेक काळ्या रंगाची दुचाकी क्रमांक एमएच ३२ एव्ही ०४२७ किंमत ७५ हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



गुन्हा दाखल होताच ठाणेदार नागेशकुमार चतरकर यांनी विशेष पथकाला आरोपीचा शोध घेण्याचे निर्देश दिले.

पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच गोपनीय माहितीच्या आधारे महेश अंबादास वांढरे वय ४२ वर्षे रा. वालदूर ता. हिंगणघाट ह.मु. काटवे यांच्या घरी भाड्याने गोंड प्लॉट केजाजी चौक वर्धा येथे राहत असल्याचे निष्पन्न केले. त्याला अटक करून न्यायालयातून पोलिस कोठडी मिळविण्यात आली. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली. पुढील तपास प्रशांत वंजारी करीत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यास मदत होणार असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे,

## नंदीच्या सजावटीतून संस्कृतीचे दर्शन; हिंगणघाटात तान्हा पोळ्याचा जल्लोष

### ६१० नंदींसह बालगोपालांचा उत्स्फूर्त सहभाग

**हिंगणघाट/जनमाध्यम**

बैल आणि शेतकऱ्याच्या नात्याची आठवण जपणारा तान्हा पोळा हिंगणघाटच्या तेलीपुरा चौकात भक्तिभाव आणि उत्साहात साजरा झाला. नवयुवक शिवाजी दुर्गा मंदिराच्या वतीने व वणा नागरिक सहकारी बँकेच्या सौजन्याने आयोजित महोत्सवात ६१० नंदीसह बालगोपाल सहभागी झाले.



विविध रंगांची वेशभूषा परिधान करून सजविलेले नंदी घेऊन आलेल्या बालगोपालांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उत्कृष्ट वेशभूषा आणि नंदी सजावट करणाऱ्या बालगोपालांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्व बालगोपालांना वणा नागरिक बँकेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आल्या. महोत्सवाला हृदयरोगतज्ञ डॉ. निर्मेश कोठारी, समाजसेवक डॉ. उमेश वावरे, नगरसेवक धनंजय बकाने, माजी नगरसेवक दिलीप उजवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कला शिक्षक किशोर उके‍कर, किशोर भांदककर, प्रमोद चौधरी आणि प्रफुल्ल कासार यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. हभप मोहनकाका गंडाईत यांनी संचालन केले. मंदिर समितीच्या नियोजनामुळे उत्सव शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

## पोळा गणेशोत्सवापूर्वी ५३ गुन्हेगारांना हद्दपार; वर्धा पोलिसांचा दणका

### प्रवेशबंदीमुळे पोळा आणि तान्हा पोळा शांततेत

**वर्धा जनमाध्यम:** पोळा आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वर्धा शहर पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगार आणि दारूविक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई केली. शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तब्बल ५३ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशबंदी करण्यात आली. त्यामुळे पोळा आणि तान्हा पोळा उत्सव कोणत्याही अनुचित घटनेशिवाय शांततेत पार पडला.पोलीस ठाणेदार नागेशकुमार चतरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. हद्दीत प्रवेशबंदी करण्यात आलेल्यांमध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगारांसह दारूविक्रेत्यांचा समावेश आहे. उत्सव काळात या व्यक्तींमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक पावले उचलली.पोळा उत्सव शांततेत पार पडल्यानंतर आता गणेशोत्सवासाठीही पोलिसांनी बंदोबस्ताची तयारी केली आहे. संशयित हालचालींवर पोलिसांची नजर राहणार असून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.ही कारवाई गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड तसेच पोलीस अंमलदार हाडके बन्सोड पाटील आणि वंजारी यांच्या डीबी पथकाने केली.

## तान्हा पोळ्यातून संस्कृतीचे जतन; बालकांनी जपली मातीशी नाळ



**सालोड/जनमाध्यम**


मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात नव्या पिढीची मातीशी नाळ तुटत असताना सालोड येथील प्रहार इंग्लिश मीडियम स्कूलने तान्हा पोळ्याच्या माध्यमातून कृषी संस्कृतीची आठवण जागवली. तान्हा पोळ्यात बालकांचा सहभाग म्हणजे भारतीय संस्कृतीचे जतन करणे होय असे प्रतिपादन विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते यांनी केले. प्रहार समाज जागृती संस्थेच्या वतीने आयोजित बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन मोहन गुजरकर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप दाते आणि संतोष तुरक उपस्थित होते. वेशभूषा स्पर्धेत स्वरूप ईश्वरकर नमन लोहे आणि नक्षीता बेले यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. नंदीबैल सजावट स्पर्धेत स्वराज उपरकर त्रिशा साखरकर आणि माही अमृतकर यांनी बाजी मारली. बैलाचे महत्त्व आणि शेतकऱ्याचे कष्ट नव्या पिढीला समजणे गरजेचे असल्याचे दाते यांनी सांगितले. सहभागी बालक आणि पालकांना भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिक्षक आणि संशोधकांनी स्वतःची लेखनशैली विकसित करावी

### साहित्यिक चोरी ओळख, प्रतिबंध आणि बचाव या विषयावर व्याख्यान

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथे 'साहित्यिक चोरी : ओळख, प्रतिबंध आणि बचाव' या विषयावर आयोजित ऑनलाइन व्याख्यानात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू), नवी दिल्ली येथील शिक्षण विभागाचे आचार्य प्रा. गौरव सिंह यांनी शिक्षक आणि संशोधकांना संशोधन लेख, प्रबंध, पुस्तके किंवा लेखनासाठी स्वतःची स्वतंत्र लेखनशैली विकसित करण्याचे तसेच साहित्यिक चोरीपासून दूर राहण्याचे आवाहन केले.




प्रा. सिंह म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या युगात विविध स्त्रोतांमधून साहित्यिक चोरी करून ती स्वतःच्या नावाने प्रकाशित करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. शैक्षणिक क्षेत्रात हे गंभीर गैरप्रकार मानले जातात. दुसऱ्यांचे विचार स्वतःच्या नावाने प्रकाशित करणे किंवा त्यांचा मूळ स्त्रोत लपविणे हे देखील साहित्यिक चोरीच्या कक्षेत येते. यापासून बचाव करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत.

ते पुढे म्हणाले की, साहित्यिक चोरीचा इतिहास सुमारे २२०० वर्षांपूर्वीचा असला तरी आज प्रकाशित, अप्रकाशित, मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील साहित्य, शब्द, वाक्ये किंवा इतरांचे लेखन मूळ लेखकाची परवानगी न घेता स्वतःच्या नावाने प्रकाशित करण्याच्या घटना वाढत आहेत. शैक्षणिक प्रामाणिकता आणि नैतिकता जपण्यासाठी अशा प्रकारांपासून दूर राहणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले. साहित्यिक चोरी शोधण्यासाठी उपलब्ध सॉफ्टवेअरची माहिती देताना त्यांनी या विषयावर नियमित जनजागृती मोहीम राबविण्याची गरज व्यक्त केली. कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांच्या संरक्षकत्वाखाली संशोधन व विकास प्रकोष्ठच्या वतीने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन प्रकोष्ठचे संचालक प्रा. शंभू जोशी यांनी केले. या व्याख्यानासाठी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पंजाब, हिमाचल प्रदेश, ओडिशा, दिल्ली, जम्मू-काश्मीर, तेलंगणा आदी राज्यांतील २९ संस्थांमधून सहभाग नोंदविण्यात आला. यामध्ये ८ केंद्रीय विद्यापीठे आणि १७ राज्य विद्यापीठांतील १०० हून अधिक शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग घेतला.

## चार दुचाकींसह चोरटा जेरबंद ; २ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

### वर्धा शहर डीबी पथकाची धडक कारवाई



**वर्धा/जनमाध्यम**

दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना वर्धा शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाने एका २१ वर्षीय संशयिताला अटक करून चार चोरीच्या दुचाकी जप्त केल्या. अनुराग प्रवीण धाबर्डे रा. तलोडी ता. सेलू असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून एकूण २ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नालंदा नगर महिला आश्रम परिसरातून ८ ऑगस्ट रोजी होंडा ॲक्टिव्हा चोरीला गेली होती. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. तपासादरम्यान ९ सप्टेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अनुराग धाबर्डे याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने वर्ध्यासह नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातून दुचाकी चोरल्याची माहिती दिली.

आरोपीकडून होंडा ॲक्टिव्हा होंडा शाईन रॉयल एनफिल्ड आणि हिरो होंडा स्प्लेंडर प्लस अशी चार वाहने जप्त करण्यात आली. आणखी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून वाहनांची विल्हेवाट आणि साथीदारांबाबत पोलिस तपास करीत आहेत.ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने केली.

## गणेशोत्सवासाठी वर्धा पोलिसांचा रूट मार्च

### २१ अधिकारी २०० पोलीस २०० होमगार्ड मैदानात, संवेदनशील भागांसह विसर्जन मार्गाची पाहणी

**वर्धा/जनमाध्यम**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वर्धा शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वर्धा पोलिसांनी शनिवारी शहरातील प्रमुख मार्गांवर आणि गणपती विसर्जन मार्गावर भव्य रूट मार्च काढून शक्तिप्रदर्शन केले. गणेशोत्सव आनंदाचा आणि भक्तीचा उत्सव असला तरी उत्सवाला गालबोट लागू नये यासाठी पोलीस दलाने आतापासूनच कंबर कसली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या रूट मार्चमध्ये अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्यासह २१ पोलीस अधिकारी २०० पोलीस अंमलदार २०० होमगार्ड दोन दंगल नियंत्रण पथके एक जलद प्रतिसाद पथक आणि एक एसआरपीएफ प्लाटून सहभागी झाले होते. शहरातील प्रमुख बाजारपेठा गर्दीची ठिकाणे संवेदनशील भाग प्रमुख चौक



तसेच गणपती विसर्जनासाठी निश्चित करण्यात आलेल्या मार्गाची पोलिसांनी पाहणी केली. उत्सवादरम्यान गर्दीचे नियोजन वाहतूक नियंत्रण विसर्जन मिरवणुकीची सुरक्षितता ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण आणि संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपणारा उत्सव आहे. त्यामुळे वर्धेकरांनी उत्साहासोबतच संयम आणि शिस्त राखावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे. गणेश मंडळांनी प्रशासन आणि पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेला बाधा येईल असे कोणतेही कृत्य करू नये असे पोलिसांनी स्पष्ट केले.

**अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन**

सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा किंवा आक्षेपार्ह संदेश वेगाने पसरू शकतात. त्यामुळे नागरिकांनी चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये आणि अशा संदेशांचा प्रसार करू नये. संशयास्पद व्यक्ती वस्तू किंवा अनुचित प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी केले.

**उत्सव आनंदाचा मात्र कायदा हातात घेऊ नका**

गणेशोत्सव आनंदाने साजरा करा मात्र कायदा हातात घेऊ नका अशी स्पष्ट भूमिका वर्धा पोलिसांनी घेतली आहे. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

वर्धा जिल्हा पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी चोवीस तास सज्ज असून गणेशोत्सव शांतता सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा राखून साजरा करण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## पैशांवरून वादानंतर तरुणाला गजाने मारहाण

**पुलगाव/जनमाध्यम**

तीस रुपये देण्यावरून झालेल्या वादातून तरुणाला लोखंडी गजाने मारहाण करून जखमी केल्याची घटना घोडेगाव येथे घडली. उमेश राजू उपासे वय २८ वर्षे हे घरासमोर असताना गंगाधर उपासे त्यांच्याकडे पैसे मागण्यासाठी आले होते. उमेश यांनी सध्या पैसे नसल्याचे सांगून नंतर देतो असे सांगितले. त्यानंतर गंगाधर तेथून निघून गेले. काही वेळाने त्यांचा मुलगा शैलेश गंगाधर उपासे आणि वैशाली गंगाधर उपासे हे उमेश यांच्या घरासमोर आले. वडिलांना पैसे का दिले नाहीत असा जाब विचारत त्यांनी उमेश यांच्याशी वाद घातला. यावेळी मारहाणीत उमेश यांच्या डोक्याला दुखापत झाली. आरोपींनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कोंडेश्वर येथे उजव्या सोंडेच्या गणपतीचे एकमेव मंदिर

## २७५ वर्षे जुने ऐतिहासिव 'सिद्धिविनायक' मंदिर

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

विदर्भाची काशी- म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोंडेश्वर तीर्थक्षेत्रातील तब्बल २७५ वर्षे जुने ऐतिहासिक गणपती मंदिर भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. 'सिद्धिविनायक' म्हणून प्रसिद्ध असलेल्या या मंदिरात गणेश चतुर्थीच्या काळात परिसरातील भाविकांची मोठी गर्दी होत असते. कोंडेश्वर येथील हे मंदिर पश्चिमाभिमुख असून, मंदिरातील गणपतीची सोंड उजव्या बाजूस असल्याने या गणरायाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परिसरात उजव्या सोंडेच्या गणपतीचे हे एकमेव मंदिर असल्याचे सांगितले जाते. मंदिराभोवती असलेले कोरीव दगडी बांधकाम त्याच्या ऐतिहासिकतेची साक्ष देत आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केल्यानंतर या मंदिराचे महत्त्व अधिकच वाढले. मनोकामना पूर्ण व्हावी, या श्रद्धेने भाविक गणरायाला साखळे अर्पण करण्याची परंपरा येथे रूढ झाली आहे. काही काळ हे मंदिर सुमारे दोनशे वर्षे दुर्लक्षित अवस्थेत होते. त्यानंतर बडनेरा (रेल्वे) येथील रहिवासी राजू तेटू यांनी पुढाकार घेत स्वखर्चाने मंदिराच्या



जीर्णोद्धाराला सुरुवात केली. पुढे भाविकांच्या मोठ्या लोकवर्गणीतून मंदिर परिसराचा विकास करण्यात आला.

आज मंदिर परिसरात भाविकांसाठी भक्तनिवास, सभामंडप, स्वयंपाकगृह तसेच मंदिराचे प्रथम पुजारी श्री संत नाथ महाराज यांची समाधी उभारण्यात आली आहे. परिसराचे फळे-फुलांनी सुशोभीकरण, गार्डन आणि पथदिव्यांची सुविधाही करण्यात आली आहे. कोंडेश्वर येथे भगवान शिवाचे प्राचीन मंदिर आणि त्याच परिसरात असलेले हे ऐतिहासिक गणपती मंदिर भाविकांच्या श्रद्धेला अधिक बळकटी देत आहे. श्रावण महिन्यात महादेवाच्या दर्शनासाठी येणारे भाविक गणरायाचेही दर्शन घेतात. त्यामुळे संपूर्ण श्रावण महिनाभर या परिसरात भाविकांची वर्दळ पाहायला मिळते.

# गणेशोत्सव आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी काढले आदेश

**अमरावती/का.प्र.**

अमरावती शहर आणि परिसरात आगामी गणेशोत्सव, मोर्चे आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश १४ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्री पासून ते २८ सप्टेंबर २०२६ रोजी पर्यंत लागू राहतील. या आदेशानुसार, अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांच्या अंमलदारांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कसे वागावे, मिरवणुका कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढाव्यात, याचे अधिकार पोलिसांना राहतील. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर गाणी गाणे, ढोल-ताशे व इतर कर्कश वाद्ये वाजविण्यावर पोलिसांचे नियंत्रण असेल. सर्व मिरवणुका,जमाव आणि पूजा-अर्चनेच्या ठिकाणी रस्त्यावर वाहतुकीस अडथळा होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. आदेशाच्या कालावधीत पोलीस आयुक्तालय परिसरात मिरवणुका, मोर्चे, निदर्शने, सभा किंवा पदयात्रा आयोजित करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याची किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. यामध्ये तारीख, वेळ, जागा, मार्ग आणि दिल्या जाणाऱ्या घोषणांची माहिती आधीच निश्चित करावी लागेल.गणेशोत्सव स्थापना मिरवणूक किंवा शोभायात्रेत केवळ महोत्सवाला साजेशा घोषणा देता येतील. शांतता व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या घोषणा देण्यास पूर्ण बंदी असेल. १४ सप्टेंबरपासून सुरू होणारा गणेशोत्सव आणि २५ सप्टेंबर रोजी असणारी अनंत चतुर्दशी यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात जनसमुदाय एकत्र येणार आहे. यासोबतच, बेमुदत उपोषण,अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी आंदोलन, तसेच मराठा-ओबीसी व आदिवासी-धनगर आरक्षणाचा संवेदनशील मुद्दा आणि सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी हे खबरदारीचे पाऊल उचलण्यात आले आहे. हा आदेश लग्नप्रसंग आणि प्रेतयात्रेला लागू असणार नाही. मात्र, इतर कोणत्याही व्यक्तीने या आदेशाचे उल्लंघन केल्यास, तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३४ प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असे या आदेशात सांगण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र वायगावात १४ ते २६ सप्टेंबरदरम्यान गणेशोत्सवाचा जागर

## सिद्धिविनायक गणपती संस्थानचा वार्षिक उत्सव

**टाकरखेडा शंभू/वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील श्रीक्षेत्र वायगाव येथील प्राचीन व प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती संस्थानचा वार्षिक गणेशोत्सव यंदा १४ ते २६ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. गणेश चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या या उत्सवात भाविकांना श्रींचे दर्शन, भजन, प्रवचन, हरिकिर्तन आणि महाप्रसादाचा लाभ घेता येणार आहे.

सोमवार, १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीनिमित्त श्रींचा महाअभिषेक, कलश स्थापना आणि पार्थिव गणेशमूर्तीची



स्थापना सकाळी ११ वाजता विश्वेश्वरराव जगन्नाथराव इंगोले व संध्याताई इंगोले यांच्या हस्ते होणार आहे. उत्सवादरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते १० महाअभिषेक, सकाळी १० ते १२ भजन, दुपारी महाप्रसाद, सायंकाळी भजन-प्रवचन, हरिपाठ आणि रात्री हरिकिर्तन असे कार्यक्रम होणार आहेत.

मंगळवार २२ सप्टेंबरपासून सप्ताहारंभ होणार असून, २२ सप्टेंबर रोजी विलासराव महाराज वानखडे यांचे प्रवचन आणि भानुदास महाराज शेळके यांचे कीर्तन होईल. २३ सप्टेंबरला माधव महाराज ठाकरे, २४ सप्टेंबरला नारायण महाराज कुटे, तर २५ सप्टेंबरला हरिदास महाराज पिंपरे यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार २६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ११ गुरुवर्य पुरुषोत्तम महाराज बोबडे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर श्रींची विसर्जन मिरवणूक व महाप्रसाद होणार आहे.

उत्सवात भानुदास महाराज शेळके, अविनाश महाराज शेळके, विक्की महाराज शिंदे, स्नेहल महाराज शेळके, वैभव महाराज इंगोले, राजेश महाराज इंगोले, गौरव महाराज देशमुख, अमोल महाराज निंभोरकर यांच्यासह अनेक भजनी मंडळी सहभागी होणार आहेत. सिद्धिविनायक वारकरी हरिपाठ मंडळ वायगाव, वीर हनुमान वारकरी हरिपाठ मंडळ तसेच समस्त ग्रामस्थांनी भाविकांना उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# मोठ्या प्रतिक्षेनंतर, वरूणराजाचे आगमन

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील खरीप पिके, व्हेंटिलेटरवर लागली होती. सर्वच खरीप पिकांची अवस्था, अर्धमेल्या गत झाली होती.सोयाबीन, कापूस व तूर पिकांनी अक्षरशः माना टाकल्या होत्या. दोन-चार दिवसांत पाऊस न आल्यास, सोयाबीन पिक हातून जाणार.अशी की काय? अशी धास्ती शेतकऱ्यांनमध्ये निर्माण झाली होती. मात्र गौरी-गणपतीच्या आगमनात, पाऊस नक्की येईल.अशी अशा ठेऊन, शेतकरी धिर धरून होता.अखेर वरून राजाला शेतकऱ्यांवर कृपा झाली. ४० ते ४५ दिवसांच्या मोठ्या खंडानंतर, तालुक्यात वरूण राजाचे दमदार आगमन झाले. परिणामी खरीप पिकांना संजीवनी मिळाली. तालुक्यातील अंदाजे,४२ हजार हेक्टरवरील पिकांना जिवदान मिळाले आहे.या मध्ये खरीपातील कापूस १८ हजार ७७३ हेक्टर सोयाबीन १३ हजार हेक्टर व तूर ९ हजार ६०० हेक्टर.या प्रमुख खरीप पिकांचा समावेश आहे. तालुक्यातील अंदाजे ८० टक्के खरीप पिकाखालील क्षेत्र, पूर्णतः कोरडवाहू आहे. पावसातील दिर्घ खंडामुळे, कोरडवाहू शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते.मात्र झालेल्या या पावसामुळे, शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत.तसेच येणाऱ्या रब्बी हंमासाठी ही या पावसामुळे दिलासा मिळाला आहे.

> पावसाच्या मोठ्या उघडीप मुळे,यंदाचा खरीप हंगाम हातून जाणार.अशी भिती निर्माण झाली होती. मात्र या पावसामुळे सोयाबीन सह, संपूर्ण खरीप हंगाम हाती येणार.अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.
>
> **नरेंद्र देशमुख, शेतकरी**



# वऱ्हा येथे पोळयाच्या पाडव्यावर शोभा यात्रा

**कुऱ्हा**-तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथे पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारुती देवस्थान येथे महाअभिषेक व तिर्थस्थापना पूजा, आरती होऊन मंदिरामध्ये सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. असून दरवर्षीप्रमाणे काही वर्षे मारूती देवस्थान हे पुरातन असून या मंदिरामधून वऱ्हा ग्रामस्थांच्या उपस्थितीत सर्व गावातील वारकरी भजन मंडळ, इतर सर्व भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ तसेच सर्वच गावातील भाविकांच्या सहकार्याने वऱ्हा नागरीतून उदो उदो च्या गजरात व भजनाच्या तालावर आणि बॅन्ड बाज्याच्या स्वरात ही शोभा यात्रा (मिरवणूक) मोठ्या भव्य दिव्य अशा स्वरूपात वऱ्हा नगरी दुमदुमून जातात सुश्री तारामाय देवस्थान



वर जाऊन येथे महापूजा, अभिषेक, होमहवन व महाआरती करून प्रसाद वाटप करण्यात येते.नंतर ही शोभा यात्रा परत मारुती मंदिरामध्ये येऊन गावांमध्ये प्रत्येक घरोघरी प्रसाद वाटण्यात येतो.या कार्यक्रमामध्ये वऱ्हा ग्रामस्थ तर असतात परंतु परिसरातही या कार्यक्रमाला भाविक भक्त उपस्थित राहतात.अशा या पुरातन वर्षापासून सुरू असलेल्या असलेल्या कार्यक्रमाला वऱ्हा व ग्रामस्थ सर्व भजनी मंडळ उपस्थित राहून शांततेत यशस्वी सांगता झाली. व मारूती मंदिरामध्ये सप्ताह सुरू झाला आहे. या सप्ताहाला सुद्धा गावकरी उपस्थित राहून सहकार्य करतात.

## संक्षिप्त



### वऱ्हा येथे तान्हा पोळा साजरा

**कुऱ्हा**-श्री संत मारुती महाराज उर्फ घंटी वाले बाबा मंदिरामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांना पोळा साजरा केला आहेत त्यामध्ये वऱ्हा गावातील बालगोपाल बैलाच्या रूपामध्ये आपल्या अंगातील कला मातीच्या स्वरूपात साजरी करून बैल बनवतात आणि ते बैल म्हणून त्यांना पुढे या दिवशी मंदिरामध्ये आणतात त्यानंतर त्यांना बक्षीस दिले जातात त्यामध्ये प्रथम बक्षीस अतुल बद्रे यांच्याकडून ५०१ रु. दक्ष मलवार यांना देण्यात आले. द्वितीय बक्षीस गजानन समरीत यांच्याकडून ३५१रु अर्णव वसंत मलवार यांना देण्यात आले. तिसरे बक्षीस श सिताराम समरीत यांच्याकडून २५१रु श्रीजीत विनोद उमप देण्यात आले.तर चौथे बक्षीस सुरेश क्षीरसागर (पोलीस पाटील) यांच्याकडून २०० रु देवेश धीरज मानापुरे यांना देण्यात आले.तसेच प्रत्येक स्पर्धकाला खाऊवाटप करण्यात आला.यावेळी गावातील लहान मुलांसह गावकरी उपस्थित होते.



### विभागीय आयुक्त कार्यालयात सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतार दिन

**अमरावती**-विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे महानुभाव पंथाचे प्रवर्तक, समाजसुधारक व तत्त्वज्ञ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा अवतार दिन श्रद्धापूर्वक साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विभागीय आयुक्त कार्यालयातील स्वीय सहाय्यक चंद्रशेखर धकिते, लघुलेखक संतोष चव्हाण, नाझर आशिष अंबाडकर यांच्यासह कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



### श्रीचक्रधर स्वामी यांना मनपात अभिवादन

**अमरावती**-भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त अमरावती महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या शुभहस्ते भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या विचारांवर प्रबोधन करण्यात आले. तसेच त्यांनी समाजात रुजविलेली सामाजिक समता, अहिंसा आणि मानवतावादी विचारधारा याबाबत माहितीचे वाचन करण्यात आले. त्यांच्या कार्यातून समाजाला मिळालेला समतेचा आणि बंधुभावाचा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, मध्य झोन सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक मनिष बजाज, ॲड. प्रशांत देशपांडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भूषण खडेकार, अखिलेश खडेकार यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शिराळा येथील रेल्वे स्टेशन उध्वस्त

**शिराळा**-येथील अमरावती नरखेड रेल्वे मार्गावर असलेल्या रेल्वे लाईन वरील शिराळा रेल्वे स्टेशन उध्वस्त करण्यात आले. त्यामुळे रेल्वे प्रवाशांची गैरसोय होत आहे.शिराळा येथे रेल्वे स्टेशन सुरू करण्याची मागणी करण्यात आली.अमरावती नरखेड रेल्वे लाईन जेव्हा टाकण्यात आली. तेव्हा शिराळा रेल्वे स्टेशन होते स्टेशन चे बांधकाम करण्यात आले . शिवाय प्लेट फार्म बांधण्यात आले . कॉटर बांधले, स्टेशन वर जाण्यासाठी कॉकरेट चा रस्ता बांधण्यात आला तेव्हा अमरावती नरखेड पॅसिजर सुरू होती . प्रवासी शेगाव तसेच वरुड मोर्शी नरखेड रेल्वेनी प्रवास करीत होते दोन तीन वर्षापासुन रेल्वे स्टेशन बंद करण्यात आले शिवाय शेड उध्वस्त केले मात्र नेते मंडळींनी या बाबींकडे दुर्लक्ष केले. आणि रेल्वे स्टेशन प्रशासनाने उध्वस्त केले. अमरावती तालुक्यातील मोठे गाव असून येथे सुरू असलेले रेल्वे स्टेशन बंद केले. गावातील तरुण मुलांनी प्रयत्न केले.मात्र राजकीय नेत्यांनी या बाबींकडे दुर्लक्ष केले.त्या नंतर रिद्धपूर ला स्टेशन देण्यात आले.लहान लहान गावातील रेल्वे स्टेशन सुरू आहे मात्र शिराळा येथील रेल्वे स्टेशन बंद करण्यात आले.शिराळा परिसरातील वडुरा साऊर चिंचोली काळे, देवरा देवरी अंतोरा ब्राम्हणवाडा भगत सावंगा आसरा यावली शहिद पुसदा नांदुरा टेंभा रोहणखेडा, थुगाव खानापूर येथील रेल्वे प्रवाशांनी शिराळा रेल्वे स्टेशन सुरू करण्याची मागणी केली आहे.शिराळा गाव मोठे लक्षणं खोटे आहे. रेल्वे स्टेशन सुरू ठेवता आले नाही ही खेदाची बाब आहे.

# 'सात्त्विक गणपती' उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी 'सात्त्विक गणपती' उपक्रमांतर्गत मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा सांस्कृतिक भवन, अमरावती येथे उत्साहात झाली.

'सात्त्विक गणपती'च्या मयुरी दिपक खताडे यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यशाळेला अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती महानगरपालिका तसेच 'माझी वसुंधरा' अभियानाचे सहकार्य लाभले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या सहमती व मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यशाळेत नागरिकांना मातीपासून स्वतःच्या हाताने



गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, मातीच्या मूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच जल आणि पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता याबाबत जनजागृती करण्यात आली.

विशेष म्हणजे कार्यशाळा नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत ठेवण्यात आली होती. गणेशमूर्ती तयार करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य आयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात आले.मयुरी दिपक खताडे यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्ती निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष शिकविण्यात आली. त्यामुळे सहभागी नागरिकांना स्वतःच्या हाताने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचा अनोखा अनुभव मिळाला.

परंपरा आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर समन्वय साधत गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला. पर्यावरणाचे रक्षण करत पारंपरिक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे 'सात्त्विक गणपती' उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेला या उपक्रमामुळे निश्चितच बळ मिळाले आहे.

# ड्रीमलॅंडस्थित काउचपफीच्या भव्य लकी ड्रॉच्या विजेत्यांची घोषणा

## एक लाख चौरस फूट प्रीमियम फर्निचर आणि होम डेकोर मॉलला अमरावतीसह अकोला, यवतमाळ आणि नागपूरमधून उत्स्फूर्त प्रतिसाद

couchpuffy®
Architectural Choice Furniture!

**अमरावती :** ड्रीमलॅंड येथे स्थित काउचपफी एक लाख चौरस फूट प्रीमियम फर्निचर आणि होम डेकोर मॉल यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य लकी ड्रॉ योजनेच्या विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. काउचपफीतर्फे ही लकी ड्रॉ योजना १४ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात आली होती. या योजनेचा लकी ड्रॉ १ सप्टेंबर रोजी काढण्यात आला. या लकी ड्रॉला अमरावतीसह अकोला, यवतमाळ आणि नागपूर येथून येणाऱ्या ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने ग्राहकांनी या योजनेत उत्साहाने सहभाग घेतला होता.

यामध्ये पुढील विजेते ठरले आहेत प्रथम विजेते - राजेश अहिरवार रीक्लायनर चेअर, द्वितीय विजेत्या – नसरीन अल्ताफ सेंटर टेबल, तृतीय विजेते - पंकज गुप्ता - सेंटर टेबल, चतुर्थ विजेते - राजेश अहिरवार ऑफिस चेअर, पाचव्या विजेत्या नसरीन अल्ताफ ऑफिस चेअर, अमन दायमा होम डेहोकर हॅम्पर, मोहम्मद साजिद होम डेकोर हॅम्पर, मोहम्मद साजिद होम डेकोर हॅम्पर, मोहम्मद साजिद होम डेकोर हॅम्पर, दीप्ती लांके - होम डेकोर हॅम्पर, जुनैद खान – गृहसजावटीच्या भेटवस्तू, मोहम्मद अल्ताफ – गृहसजावटीच्या भेटवस्तू, राजेश अहिरवार - गृह सजावट भेटवस्तू, पीएसव्ही एंटरप्रायझेस - गृहसजावटीच्या भेटवस्तू, प्रल्हाद कांथले - होम डेकोर गिफ्ट

इटली, तुर्की, मलेशिया आणि चीनमधून आयात केलेले दर्जेदार फर्निचर ड्रीमलॅंडस्थित काउचपफीची खास ओळख म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फर्निचर आणि विशाल वैविध्यपूर्ण कलेक्शन. येथे इटली, तुर्की, मलेशिया आणि चीनमधून आयात केलेले दर्जेदार फर्निचर, तसेच आधुनिक आणि प्रीमियम फर्निचरची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. शोरूममध्ये सोफा, डायनिंग सेट, बेडरूम फर्निचर, रीक्लायनर, प्रीमियम तसेच इम्पोर्टेड फर्निचर यांसह घरासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या फर्निचरचे मोठे कलेक्शन उपलब्ध आहे.

काउचपफीची आणखी एक प्रमुख वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे 'ू ड्रिम उर्ल्हाू'. ग्राहकांना उत्तम दर्जाचे फर्निचर योग्य आणि स्पर्धात्मक किमतीत उपलब्ध करून देण्यावर काउचपफीचा विशेष भर आहे. होम डेकोरसाठीही विशाल कलेक्शन काउचपफीचा विशाल होम डेकोर विभाग ग्राहकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरत आहे. येथे लॅम्प्स, पेंटिंग्ज, मिरर्स, क्लॉक्स, प्लांटर्स, आर्टिफॅक्ट्स, डेकोरेटिव्ह पीसेस यांसह घराला आकर्षक आणि आधुनिक लुक देणाऱ्या विविध वस्तूंचे मोठे कलेक्शन उपलब्ध आहे.

### ऑफिस फर्निचरसाठी संपूर्ण सुविधा

काउचपफीमध्ये डेडिकेटेड ऑफिस फर्निचर मॉल देखील उपलब्ध असून, कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या फर्निचरचे पर्याय येथे मिळतात. यामध्ये एर्गोनॉमिक चेअर्स, वर्कस्टेशन्स, ऑफिस टेबल्स, कॉन्फरन्स टेबल्स, रिसेप्शन फर्निचर, व्हिजिटर चेअर्स, ऑफिस सोफाज तसेच संपूर्ण ऑफिस सेटअपचा समावेश आहे. फायनान्स आणि एक्सचेंजची सुविधाही उपलब्ध आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी काउचपफीमध्ये फायनान्स आणि एक्सचेंजची सुविधा देखील उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांना आपल्या आवडीचे फर्निचर खरेदी करणे अधिक सोपे आणि सुविधाजनक झाले आहे.

### ग्राहकांना शोरूमला भेट देण्याचे आवाहन

काउचपफीचे संचालक अनिलकुमार अग्रवाल आणि किरण अग्रवाल यांनी लकी ड्रॉमध्ये सहभागी झालेल्या सर्व ग्राहकांचे आभार मानले. ग्राहकांचा विश्वास आणि उत्स्फूर्त प्रतिसाद हीच काउचपफीची सर्वात मोठी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अमरावतीसह अकोला, यवतमाळ, नागपूर आणि आसपासच्या शहरांमधील ग्राहकांनी ड्रीमलॅंडस्थित काउचपफी शोरूमला भेट देऊन प्रीमियम फर्निचर, इम्पोर्टेड क्वालिटी फर्निचर, होम डेकोर आणि ऑफिस फर्निचरचे विशाल कलेक्शन अनुभवावे, असे आवाहन त्यांनी केले.

# शिक्षक मतदारसंघाच्या रणधुमाळीत अदिती पोहरे उतरणार

## संघटनेच्या आग्रहाला मान; निवडणूक लढविण्याचा निर्धार

### उच्चशिक्षित नेतृत्वामुळे राजकीय वर्तुळाचे लक्ष

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी काही महिन्यात होऊ घातलेल्या अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. इच्छुक उमेदवारांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झालेली असतानाच उच्चशिक्षित अदिती ऋषिकेश पोहरे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. एका शिक्षक संघटनेसह समर्थक शिक्षकांच्या आग्रहाला मान देत त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने अमरावती विभागातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला उधाण आले आहे.



शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्वाची गरज असल्याचे समर्थक शिक्षकांचे म्हणणे आहे. वेतन, सेवाशर्ती, पदोन्नती, अनुदान, शैक्षणिक धोरणे आणि विविध प्रशासकीय अडचणी यांसारखे प्रश्न सातत्याने शासनाच्या पातळीवर मांडण्याची गरज आहे. याच अपेक्षेतून अदिती पोहरे यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरावे, यासाठी शिक्षकांकडून आग्रह करण्यात आला. शिक्षकांच्या आग्रहातूनच निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न अग्रक्रमाने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत नवी चर्चा आणि नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**राजकीय बाळकडू अन् शिक्षण क्षेत्राचा वारसा-**


अदिती ऋषिकेश पोहरे या माजी कृषी मंत्री हर्षवर्धन उर्फ भैय्यासाहेब (पान २ वर)

**अध्यापन अन् संशोधनाचा प्रदीर्घ अनुभव**

शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रत्यक्ष अनुभव हीदेखील महत्त्वाची बाब मानली जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला येथे त्या २०१० पासून पदव्युत्तर स्तरावर भूकंप अभियांत्रिकी विषयाच्या विशेष प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. एम.ई. स्तरावरील विविध शोधप्रबंध तसेच संशोधन प्रकल्पांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे. याशिवाय देशोन्नतीमध्ये संचालक व महिलांचे व्यासपीठ मनस्वीनी'च्या संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्या कार्यरत असून, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.

# शहानुर धरणात ६२.९५ टक्के जलसाठा

## पाऊस सुरू राहिल्यास दोन दिवसांत पातळी वाढण्याची शक्यता



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी व दर्यापूर या दोन्ही तालुक्यातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवणाऱ्या अचलपूर तालुक्यातील शहानुर धरण प्रकल्पातील पाणी साठ्याची प्रशासनाच्या वतीने आज दि. १३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता तपासणी करण्यात आली.

यावेळी धरणाची पूर्ण जलाशय पातळी (एफआरएल) ४४९.५० मीटर असून सध्याची पाण्याची पातळी ४४२.८८ मीटर इतकी नोंदवण्यात आली आहे. धरणात सध्या २८.९८ घनमिमी जिवंत साठा असून एकूण साठ्याच्या ६२.९५ टक्के पाणी उपलब्ध आहे.

धरणाचे सर्व दरवाजे सध्या बंद असून विसर्ग ०.०००० क्युमेक इतका आहे. धरण क्षेत्रात आतापर्यंत एकूण ५५५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. दैनिक आवक ०.११ घनमिमी इतकी असून बाष्पीभवन तोटा शून्य घनमिमी नोंदवण्यात आला आहे.पाणलोट क्षेत्रातील गिरगोटी व तेंभुरसोंडा येथील पर्जन्यमानाची माहिती अद्याप संकलित होणे बाकी आहे. दैनिक जावक शून्य असून एकूण जावकाची आकडेवारी प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेली नाही.याबाबत शहानुर प्रकल्पाचे शाखा अभियंता मनोज पावरा यांनी सांगितले की, सध्या पाऊस सुरू असल्याने पुढील दोन दिवसांत धरणातील (पान २ वर)

# ३१ ठाण्यांत एकाचवेळी 'हाय बीम' तपासणी

## 'ऑपरेशन कवच'चा विस्तार; १५९ वाहनांवर पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाहतूक नियमभंगाविरोधातील अमरावती ग्रामीण पोलिसांचे 'ऑपरेशन कवच' आता रात्रीच्या वेळी वाहनांच्या प्रकाशझोतावरही लक्ष केंद्रित करीत आहे. जिल्ह्यातील ३१ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी विशेष तपासणी मोहीम राबवून नियमबाह्य हाय बीम, स्पॉट लाईट आणि सर्च लाईट वापरणाऱ्या १५९ वाहनांवर कारवाई करण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखा आणि अचलपूर वाहतूक शाखेच्या ४१ कारवायांसह एकूण २०० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई झाली. १२ सप्टेंबर रोजी राबविण्यात आलेल्या या विशेष



मोहिमेदरम्यान पोलिसांनी रात्रीच्या वेळी रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची तपासणी केली. समोरून येणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अतितीव्र प्रकाशाचा वापर करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. अनेक वाहनांमध्ये मूळ हेडलाईटव्यतिरिक्त अतिरिक्त एलईडी स्ट्रिप, स्पॉट लाईट किंवा सर्च लाईटचा वापर केला जातो. हे दिवे थेट समोरील वाहनचालकाच्या डोळ्यांवर पडल्यास काही काळ दृष्टी धूसर होऊन वाहन चालविण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. विशेषतः रात्रीच्या वेळी अशा प्रकारामुळे अपघाताचा धोका वाढतो. त्यामुळे पोलिसांनी वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली. या मोहिमेत एकूण १ लाख ७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. वाहनचालकांना नियम समजावून सांगत रात्रीच्या वेळी आवश्यकतेनुसार लो बीमचा वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# गणेशोत्सवासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांचा बंदोबस्त

## १५०९ गणपतींची होणार स्थापना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात सोमवारी, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश स्थापना होणार आहे. यावर्षी जिल्ह्यात एकूण १ हजार ५०९ श्री गणेश मूर्तींची स्थापना केली जाणार असून, यामध्ये ३९१ ठिकाणी 'एक गाव एक गणपती' उपक्रमांतर्गत बाप्पा विराजमान होणार आहेत. या गणेशोत्सवासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांचा चोख बंदोबस्त राहणार आहे.

गणेशोत्सव शांततेत आणि भयमुक्त वातावरणात पार पडावा यासाठी अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात वरिष्ठ अधिकारी व अंमलदार १, अपर पोलीस अधीक्षक, ६ उपविभागीय पोलीस अधिकारी, २० पोलीस निरीक्षक, ११७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि १ हजार ७०० पोलीस अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात राहतील. तसेच ३ दंगा नियंत्रण पथके आणि १ जलद प्रतिसाद पथक सज्ज ठेवण्यात आले आहे. नाशिक, अकोला, नागपूर, रेल्वे पोलीस आणि एसआरपीएफची १ कंपनी व १ प्लाटून अतिरिक्त तैनात केली आहे. त्यासोबत ६५० पुरुष आणि १५० महिला होमगार्डचे जवान या बंदोबस्तात सहभाग घेणार आहेत.

ध्वनी प्रदूषणाचा त्रास होऊ नये म्हणून



डॉल्बी व डीजे चालकांना कायदेशीर ध्वनी मर्यादेचे पालन करण्याचे स्पष्ट निर्देश पोलीस अधीक्षक यांनी दिले आहेत. तसेच सोशल मीडियावर धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या प्रक्षोभक पोस्ट आणि (पान २ वर)

# गणपती बाप्पांच्या मूर्ती खरेदीसाठी जुळया शहरातील बाजारपेठेत नागरिकांची प्रचंड गर्दि

## पावसाची हजेरी, नेहरू मैदानात चिखल

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा शहरात गणपती बाप्पांच्या मूर्ती खरेदीसाठी जुळया शहरातील बाजारपेठेत नागरिकांची प्रचंड गर्दि होती. पण पावसाने हजेरी लावल्यामुळे परतवाडा शहरातील नेहरू मैदान येथे चिखल झाल्याने विविध गणेश मूर्तीच्या दुकानात येणाऱ्या ग्राहकांना याचा मोठा फटका बसला .सोबतच अनेक दुकानदारांनी परतवाडा शहरातील मुख्य रस्त्यावर गणपती मूर्ती ची विक्रीसाठी दुकाने लावली .एकीकडे जुळया शहरातील गांधीपुल ,देवडी , चावलमंडी, नगर परिषद नेहरू मैदान परिसरात नागरिकांची प्रचंड गर्दी होती .मात्र अनेक ठिकाणी खड्डे जैसे थे असल्यामुळे वाहनचालक त्रस्त झाले होते.यामुळे नागरिकांनी अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन कारभाराबाबत नाराजीचा सूर पाहायला मिळाला.

अचलपूर - परतवाडा जुळया शहरातील नागरिक आपल्या घरी लाडक्या



गणपती बाप्पांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत होते . रविवारी सकाळपासूनच पावसाने हजेरी लावली होती .मात्र पावसात सुद्धा गणपती बाप्पांच्या मूर्ती खरेदीसाठी बाजारपेठे मध्ये नागरिकांची मोठी गर्दी होती. मात्र जागोजागी खड्डे असल्याने पावसाळ्यात चिखलातून नागरिकांना प्रवास करावा लागला .सोबतच अनेक वाहनचालकांनी मनमर्जी प्रमाणे वाहने मुख्य रस्त्यावर लावल्याचे चित्र पाहायला मिळाले.यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.परतवाडा शहरातील नेहरू मैदान येथे अनेक वर्षापासून अचलपूर नगर परिषद अंतर्गत विविध गणपती मूर्तीच्या विक्रीची दुकाने लागतात.यंदा ही पावसाने हजेरी लावल्याने नेहरू मैदान येथे चिखल (पान २ वर)

# गोवंशासह ८.८० लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा

### -मोर्शीत दोन वाहनांवर कारवाई

**मोर्शी/प्रतिनिधीः-** आखूड दोरखंडाने बांधून, कोंबून आणि चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता पाच गोवंश जनावरांची वाहतूक केली जात असताना मोर्शी पोलिसांनी दोन मालवाहू वाहने पकडली. मोर्शी–चांदूर बाजार मार्गावरील पेठे पेट्रोल पंपाजवळ पोलिसांनी नाकाबंदी करून केलेल्या या कारवाईत पाच गोवंश जनावरे आणि दोन वाहने



असा ८ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा (पान २ वर)

# तब्बल दीड वर्षानंतर सापडला आरोपी

### -यवतमाळात शोधमोहीम

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांच्या नजरेआड गेलेल्या आरोपीचा तब्बल दीड वर्षानंतर ठावठिकाणा शोधण्यात तळेगाव दशासर पोलिसांना यश आले. यवतमाळ शहरातील ताजनगर परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सादीक रज्जाक शेख (२६) याला ताब्यात घेत अटक केली. तळेगाव दशासर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, त्यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम



३०३(२), ३१७(२) आणि ३(५) अन्वये कारवाई सुरू आहे. या गुन्ह्यातील सादीक शेख हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते. ग्रामीण पोलिसांच्या अभिलेखावरील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिल्यानंतर तळेगाव दशासर पोलिसांनी जुन्या प्रकरणांतील फरार आरोपींची माहिती पुन्हा तपासण्यास सुरुवात केली. त्यातून (पान २ वर)

# पोहरा येथील तरुणाचा हिवरा शिवारात मृतदेह आढळला

### -आसेगाव पोलिसांकडून तपास सुरू

**आसेगाव पूर्णा /प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यातील पोहरा पूर्णा येथील २६ वर्षीय तरुणाचा मृतदेह अचलपूर तालुक्यातील हिवरा पूर्णा येथील गावालगतच्या कपाशीच्या शेतात रविवारी (१३ सप्टेंबर) सकाळी आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. चेतन दिलीपराव बोबडे (वय २६) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोहरा पूर्णा व हिवरा पूर्णा ही अचलपूर व भातकुली तालुक्यांच्या सीमेवरील गावे असून या परिसरातून पूर्णा नदी वाहते. चेतन हा हिवरा पूर्णा येथील (पान २ वर)



# 'ऑपरेशन कवच'मध्ये रेती तस्करीवर कारवाई

## सातनूर चौफुलीवर एलसीबीची नाकाबंदी; ट्रक ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांच्या 'ऑपरेशन कवच'ला आता अवैध रेती वाहतुकीवरही लक्ष्य करण्यात आले असून, स्थानिक गुन्हे शाखेने सातनूर चौफुलीवर नाकाबंदी करून रेतीची चोरटी वाहतूक करणारा ट्रक पकडला. ट्रकमध्ये सुमारे सात ब्रास रेती आढळून आली. या कारवाईत चालक व त्याचा साथीदार पोलिसांच्या ताब्यात असून, ट्रक मालक फरार आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम



यांनी ग्रामीण जिल्ह्यात विनापरवाना गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार पथकाने १२ सप्टेंबर रोजी शेघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त वाढविली होती. याचदरम्यान पुसला मार्गे शेघाटकडे रेतीचा ट्रक येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करण्यासाठी पथकाने सातनूर चौफुलीवर सापळा रचला. काही वेळातच पांढऱ्या रंगाचा टाटा सिग्ना ट्रक तेथे आला. पोलिसांनी तो थांबवून चालक (पान २ वर)

# भरती परीक्षा पद्धतीत होणार सुधारणा

## उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष व सदस्य गुरुवारी अमरावतीत

### अमरावती विभागातून सूचना व अभिप्राय पाठवण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाने राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. या समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ व इतर संबंधित हितधारकांशी चर्चा करून भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय प्राप्त करून घेतले जाणार आहेत. त्यानूसार अमरावती विभागातील संबंधित हितधारकांशी चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष व सदस्य गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ५.३० दरम्यान नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे भेट देणार आहेत.

या अनुषंगाने अमरावती




जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती व उपजिल्हाधिकारी (महसूल) अमरावती यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली विशेष कक्षामार्फत दि. १४ ते १६ सप्टेंबर या कालावधीत, कार्यालयीन वेळेत सूचना व अभिप्राय स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्यातील भरती परीक्षा पद्धत अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक व विश्वासार्ह करण्याच्या दृष्टीने अमरावती विभागातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने सादर करून या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी केले आहे.

दि. १४ ते १६ सप्टेंबर दरम्यान (पान २ वर)

